CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

लातूर | मंगळवार, १७ फेब्रुवारी २०२६ । वर्ष ३ रे अंक ३४८ । पाने १२ । किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## महत्त्वाचे

### रहमान यांच्या शपथविधीला मोदी नाही जाणार

**नवी दिल्ली :** बांगलादेशचे नूतन पंतप्रधान म्हणून तारिक रहमान बांगलादेशात १७ फेब्रुवारी रोजी पंतप्रधानपदाची शपथ घेणार आहेत. त्यांचा पक्ष २० वर्षांनंतर सत्तेत परतला आहे. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांच्यासह १३ देशांच्या नेत्यांना शपथविधी सोहळ्याचे आमंत्रण पाठवण्यात आले आहे. भारताकडून पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या ऐवजी स्पीकर ओम बिर्ला समारंभात सहभागी होणार असल्याचे वृत्त आहे.

### सातारा जिल्हा परिषदेत भाजपाचाच होणार अध्यक्ष

**सातारा :** जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत भाजप जिल्ह्यातील सर्वांत मोठा पक्ष ठरला असला तरी अपेक्षित यश मिळाले नाही, हे वास्तव आहे. एकहाती सत्तेसाठी सामूहिक प्रयत्न करूनही आम्ही कमी पडलो. जिल्ह्यात पक्षाची ताकद मोठी असतानाही बहुमताची संख्या गाठता आली नाही, तरी देखील जिल्हा परिषदेचा अध्यक्ष भाजपचाच होणार, असा ठाम विश्वास ग्रामविकासमंत्री गोरे यांनी व्यक्त केला.

### परदेशातील मुलांनाही मिळणार मराठीचे शिक्षण

**रत्नागिरी :** अनुवाद अकादमी तयार करुन त्याची अंमलबजावणी या अकादमीच्या माध्यमातून करण्याचा निर्णय विश्व मराठी साहित्य संमेलनात घेत आहेत. ज्या लेखकाला त्याचं साहित्य मराठीतून हिंदीत करायचं असेल, मराठीतून कन्नड मध्ये करायचं असेल, मराठीतून तमीळमध्ये करायचं असेल तर त्याला देखील निधी द्यायचा निर्णय मराठी भाषा विभागाने घेतलेला आहे. तसेच परदेशातील मराठी मुलांना ऑनलाईन मराठी भाषेचे शिक्षण देण्याचा उपक्रम पुढच्या वर्षापासून सुरु केला जाणार असल्याचे आश्वासन उद्योग, मराठी भाषा मंत्री सामंत यांनी दिली.

### आरटीई प्रवेशाला आजपासून सुरुवात

**मुंबई :** बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम ंतर्गत (आरटीई) दुर्बल आणि वंचित घटकातील बालकांना स्वयं अर्थसहाय्यित शाळा, विना अनुदानित शाळांमध्ये २०२६-२७ या वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया १७ फेब्रुवारीपासून ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येत आहे. पालकांना १० मार्चपर्यंत अधिकृत संकेतस्थळावरून अर्ज करता येणार आहे. सुधारित सूचना निर्गमित करण्यात आल्याची माहिती शालेय शिक्षण संचालक यांनी दिली.

# वाहनाच्या धडकेत दुचाकीवरील तिघेजण जागीच ठार; वाहनचालक फरार

- श्री रुपाभवानी मंदिर चौक परिसरातील काल पहाटेची घटना
- अपघात की घातपात याविषयीच्या चर्चांना उधाण



नागेश प्रज्ज्वल रोहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ फेब्रुवारी-**

एका अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत दुचाकीवरील तिघे जण जागीच ठार झाले आहेत. नागेश रेड्डी, रोहन कोरे, प्रज्ज्वल चनशेट्टी असे यातील मृतांची नावे आहेत. ही घटना सोलापूर शहरातील रुपाभवानी मंदिराजवळील मुख्य रस्त्यावर सोमवारी पहाटे घडली.

दरम्यान, अपघातानंतर 'त्या' अज्ञात वाहनाचा चालक घटनास्थळावरुन पसार झाला आहे. याबाबतचे वृत्त असे की, नागेश रेड्डी, रोहन कोरे आणि प्रज्ज्वल चनशेट्टी हे तीन तरुण दुचाकीवरुन जात असताना मागून आलेल्या एका अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. यात ते तिघे जागीच गतप्राण झाले. रेड्डी, कोरे व चनशेट्टी हे तिघे जीवलग मित्र होते. अपघात झालेली वेळ ही पहाटेची असल्याने परिसरात फारशी वर्दळ नव्हती.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ तिकडे धाव घेत घटनास्थळाचा पंचनामा केला. घटनास्थळासह परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करण्यात येत आहे. दरम्यान, अज्ञात वाहनाच्या चालकाचा शोध घेण्यासाठी पोलिस प्रशासनाकडून विशेष पथक नियुक्त करण्यात येणार असल्याचे समजते. अपघातात मयत झालेल्या तिघांपैकी एकजण गो-सेवक होता. यातील नागेश रेड्डी हा मित्रपरिवारात नाकाबंदी या टोपणनावाने परिचित होता. अपघाताचे नेमकं कारण अद्याप स्पष्ट झाले नाही. पहाटेच्या सुमारास घडलेली ही घटना अपघात की घातपात? याविषयी समाज माध्यमांतून चर्चांना उधाण आले होते.



**रस्ता सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर, वाहतूक नियमांचे पालन गरजेचे...**
सोलापूर शहर व परिसरात सतत घडत असलेल्या अपघातांमुळे रस्ते सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. नागरिकांनी वाहतूक नियमांचे पालन करणे, वेगावर नियंत्रण ठेवणे आणि विशेषतः पहाटे किंवा रात्रीच्या वेळी अधिक सतर्कता बाळगणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

## दुसऱ्या अपघातात आणखी एका दुचाकीस्वाराचा मृत्यू

**सोलापूर, दि.१६ फेब्रुवारी-**

दुचाकीवरुन जात असताना पाठीमागून आलेल्या एका वाहनाने धडक दिल्याने एकाचा मृत्यू झाला. रोहित नागनाथ होटगी (वय-२६, रा.भंडारकवठे, ता.दक्षिण सोलापूर) असे यातील मयताचे नाव आहे. रोहित होटगी हा रविवार, १५ फेब्रुवारी रोजी भंडारकवठेहून निंबर्गीकडे दुचाकीवरुन जात होता.

भंडारकवठे येथून दीड किलोमीटर अंतरावर असलेल्या बिराजदार वस्तीजवळ पाठीमागून आलेल्या एम.एच.११ ए.जी.४८९५ या क्रमांकाच्या छोटा हत्ती या वाहनाने धडक दिली. एका खासगी रुग्णालयात प्राथमिक उपचार करुन पुढील उपचारासाठी त्यांचे मामा सोमलिंग कमळे यांनी सिव्हील हॉस्पीटल येथे दाखल केले. याठिकाणी उपचार सुरु असताना सोमवार, १६ फेब्रुवारी रोजी त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.

### सरकारने मागवला थकीत शेतकरी कर्जदारांचा डेटा

# शेतकरी कर्जमाफीबाबत आगामी अर्थसंकल्पात मोठी घोषणा?

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि.१६ फेब्रुवारी-**

राज्यातील शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या प्रश्नावर राज्य सरकारने महत्त्वाची पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. राज्य सरकारकडून राज्यातील सर्व बँकांना थकीत कर्जदार शेतकऱ्यांची सविस्तर माहिती शासनाच्या शिंदे समितीकडे पाठवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनात शेतकऱ्यांसाठी काही सकारात्मक घोषणा होऊ शकतात, अशी चर्चा रंगू लागली आहे. विशेषतः थकीत कर्ज असलेल्या शेतकऱ्यांमध्ये या हालचालींमुळे आशेचे वातावरण निर्माण झाले आहे.

**जून २०२५ पर्यंत थकीत शेतकऱ्यांची माहिती होणार गोळा**

जून २०२५ पर्यंत थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांची माहिती गोळा करण्याचे काम विविध जिल्हा बँकांमार्फत सुरू आहे. नाशिक जिल्हा बँकेनेही या प्रक्रियेत पुढाकार घेतला असून सुमारे ७४ हजार शेतकऱ्यांची माहिती राज्य सरकारच्या अधिकृत पोर्टलवर अपलोड करण्यात आली आहे. उर्वरित शेतकऱ्यांची माहिती गोळा करण्याची प्रक्रिया अद्याप सुरू आहे. यामुळे संपूर्ण राज्यातील थकीत कर्जदारांचा अचूक आकडा शासनासमोर येणार आहे.

जिल्हा बँकेच्या अधिकाऱ्यांकडून यासंदर्भात मिळालेल्या माहितीनुसार, राज्य शासनाच्या मदतीसाठी एक समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीकडून ३० जून २०२५ ते ३० सप्टेंबर २०२५ या



कालावधीतील थकबाकीदार शेतकऱ्यांची माहिती मागवण्यात आली आहे. जिल्ह्यातील सेवा सहकारी सोसायट्या, त्यांचे सचिव, बँकेचे तपास अधिकारी आणि शाखाधिकारी यांच्या माध्यमातून माहिती संकलन सुरू आहे. तसेच सहनिबंधक आणि निबंधक कार्यालयातील अधिकाऱ्यांचेही सहकार्य मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

या संपूर्ण प्रक्रियेचा उद्देश म्हणजे राज्यातील खऱ्या अर्थाने थकीत असलेल्या शेतकऱ्यांची स्पष्ट यादी तयार करणे हा आहे. शासनाच्या पोर्टलवर माहिती अपलोड झाल्यानंतर पुढील निर्णय घेणे सोपे जाणार आहे. कर्जमाफीचा निर्णय घ्यायचा झाल्यास अचूक आकडेवारी महत्त्वाची ठरणार असल्याचे प्रशासनातील सूत्रांचे म्हणणे आहे. त्यामुळे बँकांकडून माहिती संकलन आणि पडताळणी या दोन्ही गोष्टींना प्राधान्य दिले जात आहे. दरम्यान, राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन २३ फेब्रुवारी २०२६ पासून सुरू होणार आहे. हे अधिवेशन २५ मार्च २०२६ पर्यंत चालणार असून ६ मार्च रोजी राज्याचा अर्थसंकल्प सादर केला जाणार आहे. राज्याच्या विधिमंडळाचे हे महत्त्वाचे अधिवेशन मुंबईत पार पडणार आहे. अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर कर्जमाफीचा विषय अधिकच चर्चेत आला आहे. शेतकरी वर्गाचे लक्ष आता अर्थसंकल्पाकडे लागले आहे. यंदाच्या अधिवेशनात एक वेगळी बाब घडणार आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनामुळे यावेळी अर्थसंकल्प सादर करण्याची जबाबदारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर असणार आहे. विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे आणि विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली कामकाज सल्लागार समितीची बैठक पार पडली. या बैठकीत अधिवेशनाची रूपरेषा निश्चित करण्यात आली. पहिल्याच दिवशी दोन्ही सभागृहांमध्ये शोक प्रस्ताव मांडण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे.

**शेतकऱ्यांच्या अपेक्षा उंचावल्या**

एकूणच, कर्जमाफीच्या दृष्टीने सरकारकडून सुरू असलेली माहिती संकलनाची मोहीम आणि आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशन यामुळे शेतकऱ्यांमध्ये अपेक्षा वाढल्या आहेत. ७४ हजार शेतकऱ्यांची माहिती आधीच पोर्टलवर अपलोड झाली असून उर्वरित माहिती लवकरच पूर्ण होणार असल्याचे संकेत आहेत. या पार्श्वभूमीवर ६ मार्च रोजी सादर होणाऱ्या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी कोणती गोड बातमी जाहीर होते, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरदचंद्र पवार

## राष्ट्रवादी विलीनीकरणाच्या चर्चांना पूर्णविराम!

**मुंबई, दि.१६ फेब्रुवारी-**

अजित पवारांच्या जाण्यानंतर दोन पक्ष विलीन होतील अशाही चर्चा रंगल्या होत्या. अजित पवारांनी १२ फेब्रुवारीला दोन पक्ष एकत्र येतील अशी तारीख ठरवली होती असंही राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षातर्फे सांगण्यात आलं. मात्र सुनील तटकरे आणि प्रफुल पटेल यांनी विलीनीकरणाची चर्चा झाली नव्हती. अजितदादा जे म्हणाले होते तो विषय महापालिका आणि पंचायत समिती, जिल्हा परिषद निवडणुकांपुरता मर्यादित होता, मात्र आता चर्चा करणारे प्रमुख नेतेच आपल्यात नाहीत, त्यामुळे जर-तर वर बोलण्यात अर्थ नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. असं वक्तव्य केलं आहे.

दरम्यान जयंत पाटील यांनी आज माध्यमांशी बोलताना विलीनीकरणाच्या मुद्द्यावर एक प्रकारे चर्चेला पूर्णविराम देण्याचा प्रयत्न केला. सुनेत्रा वहिनींच्या मार्गात अडचण निर्माण होईल असं आम्ही काहीही करणार नाही असं जयंत पाटील यांनी स्पष्ट केलं आहे.

### शाळांना अल्पसंख्यांक दर्जा प्रमाणपत्र वाटप प्रकरण

## मुख्यमंत्र्यांकडून स्थगिती; उच्चस्तरीय चौकशीचे निर्देश

**मुंबई, दि.१६ फेब्रुवारी**



गतवर्षी ऑगस्ट महिन्यापासून अशा प्रमाणपत्रांच्या वितरणावर स्थगिती लागू असतानाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर काही तासांतच शाळांना अल्पसंख्यांक प्रमाणपत्रे देण्यात आल्याच्या प्रकरणाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गंभीर दखल घेत प्रमाणपत्र वाटप प्रकरणाला स्थगिती देत उच्चस्तरीय चौकशीचे आदेश दिले आहेत.

संबंधित ७५ शाळांना देण्यात आलेल्या अल्पसंख्यांक दर्जाच्या प्रमाणपत्रांना स्थगिती देण्याचा निर्णय घेण्यात आला. दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाइचे निर्देश देण्यात आल्याचे वृत्त आहे. राज्याचे कर्तबगार नेते आणि माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनाने महाराष्ट्रावर शोककळा पसरली होती. बारामती येथे झालेल्या विमान दुर्घटनेत अजित पवार यांच्यासह पाच जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला.

या घटनेने राज्याच्या राजकारणाला मोठा धक्का बसला होता. या दुर्दैवी घटनेच्या दिवशीच मंत्रालयात एक धक्कादायक प्रकार घडल्याचे उघड झाले. अजित पवार यांनी स्थगित ठेवलेल्या काही फाईल्सवर त्यांच्या निधनानंतर सुमारे दुपारी चारच्या सुमारास सह्या करण्यात आल्याची माहिती समोर आली. त्यामुळे प्रशासनाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. शोकाकुल वातावरण असतानाच निर्णयप्रक्रिया पुढे ढकलण्याऐवजी ती गतीने पार पडल्याचे दिसून आले. या घटनेमुळे राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे. याच दिवशी अल्पसंख्याक विकास विभागाने ७५ शाळांना अल्पसंख्यांक दर्जाचे प्रमाणपत्र दिल्याचेही समोर आले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रमाणपत्र वाटप प्रकरणाला तात्काळ स्थगिती देत उच्चस्तरीय अधिकाऱ्यांकडून चौकशीचे आदेश दिले आहेत.

याप्रकरणातील दोषींवर कठोर कारवाईचे संकेत मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. दरम्यान राज्यात शासकीय दुखवट्याचे वातावरण असतानाच अल्पसंख्याक विभागाकडून अवघ्या चार दिवसांत तब्बल ७५ शिक्षण संस्थांना अल्पसंख्यांक दर्जाची प्रमाणपत्रे देण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आल्याने या विरोधकांनी सरकारवर टिकेची झोड उडवली आहे.

# अजित पवार विमान अपघात; खासगी गुप्तहेरांकडून चौकशीचे संकेत

### आ.रोहित पवार : घातपात असल्याचा संशय तर ब्लॅक बॉक्स खराब?

**मुंबई, दि.१६ फेब्रुवारी-**

राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत संशयाचे वातावरण कायम आहे. या दुर्घटनेमागे घातपात असू शकतो, अशी शक्यता व्यक्त करत शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी काही दिवसांपूर्वी पत्रकार परिषद घेतली होती. त्यांनी अपघाताच्या कारणांबाबत अनेक प्रश्न उपस्थित केले होते. सरकारने या प्रकरणी चौकशी सुरू केली असली तरी त्यापलीकडे कोणतीही ठोस हालचाल दिसून येत नसल्याचे त्यांनी म्हटले होते. त्यामुळे आता रोहित पवार स्वतः या प्रकरणाच्या मुळाशी जाण्यासाठी प्रयत्न करत आहेत.



तसेच ब्लॅक बॉक्स खराब झाल्याबाबत जी काही माहिती समोर येत आहे त्यावरून त्यांनी दिवसांपूर्वी वर्तवलेली शक्यता खरी होताना दिसत असल्याचे रोहित पवार यांनी म्हटले आहे. तर खासगी गुप्तहेर संस्थांकडून या प्रकरणाची चौकशीबाबतही त्यांनी चर्चा केल्याचे सांगण्यात येत आहे.

आमदार रोहित पवार सध्या दिल्लीमध्ये तळ ठोकून आहेत. विमान अपघातामागील खरे कारण शोधण्यासाठी ते हवाई क्षेत्रात वैमानिक किंवा इतर पदांवर काम केलेल्या अधिकाऱ्यांच्या भेटी घेत आहेत. तज्ज्ञांकडून माहिती गोळा करून अपघाताची शक्यता, तांत्रिक बाबी आणि नियमांचे पालन झाले होते का, याचा अभ्यास ते करत आहेत. अपघाताच्या चौकशीचा अधिकृत अहवाल येण्यास विलंब होत असल्याने त्यांनी स्वतंत्र पातळीवर माहिती संकलन सुरू केले आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, अधिकृत चौकशी अहवाल यायला अजून वेळ लागू शकतो, असे संबंधित अधिकाऱ्यांचे मत आहे. मात्र हा अहवाल लवकर मिळावा आणि अपघातामागील सत्य स्पष्ट व्हावे, यासाठी रोहित पवार यांनी खासगी गुप्तहेरांची मदत घेतल्याची माहिती समोर येत आहे. अपघातातील प्रत्येक पैलू तपासला जावा आणि कोणतीही बाब दडपली जाऊ नये, यासाठी त्यांनी हा निर्णय घेतल्याचे सांगितले जाते. दरम्यान, या दुर्घटनेला आज २० दिवस पूर्ण झाले आहेत. तरीही नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाकडून प्राथमिक चौकशी अहवाल जाहीर करण्यात आलेला नाही. त्यामुळे संशयाचे सावट अधिक गडद होत आहे. तसेच सर्व नियमांचे उल्लंघन करत विमाने चालवणाऱ्या तडठ कंपनीविरोधात कोणतीही कारवाई अद्याप झालेली नसल्याचा आरोपही केला जात आहे. या पार्श्वभूमीवर ऊऋउ ने तातडीने प्राथमिक अहवाल सादर करावा आणि संबंधित कंपनीवर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी रोहित पवार यांनी सोशल मीडियावरून केली आहे. अजित पवार यांचे विमान २८ जानेवारी रोजी सकाळी ८ वाजून १० मिनिटांनी त्यांचे चार्टर्ड बारामती विमानतळाच्या धावपट्टीवर उतरण्यापूर्वीच ते बाजूच्या शेतात जाऊन कोसळले. विमान खाली आदळल्यानंतर त्याचा स्फोट झाला. या भीषण अपघातात अजित पवार यांच्यासह विमानातील पाच जणांचा जागीच मृत्यू झाला.

### लग्नापूर्वी शारीरिक संबंध कसे ठेवू शकतात
#### सर्वोच्च न्यायालय

**नवी दिल्ली, दि.१६ फेब्रुवारी-**

सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी बलात्काराच्या आरोपांशी संबंधित एका प्रकरणात लग्नापूर्वीच्या शारीरिक संबंधांवर आश्चर्य व्यक्त केले. न्यायमूर्ती बी.व्ही. नागरत्ना म्हणाल्या की, आम्हाला हे समजत नाही की एक मुलगा आणि मुलगी लग्नापूर्वी शारीरिक संबंध कसे ठेवू शकतात.

न्यायमूर्ती नागरत्ना म्हणाल्या- कदाचित आम्ही जुन्या विचारांचे असू, पण लग्नापूर्वी मुलगा आणि मुलगी अनोळखी असतात. तुम्ही खूप सावध राहायला हवे. लग्नापूर्वी कोणावरही विश्वास ठेवू नये. एक मुलगा आणि मुलगी लग्नापूर्वी शारीरिक संबंध कसे ठेवू शकतात. न्यायमूर्ती नागरत्ना यांच्यासोबत न्यायमूर्ती उज्ज्वल भुइयां यांचे खंडपीठ एका व्यक्तीच्या जामीन अर्जावर सुनावणी करत होते, ज्याच्यावर एका महिलेशी लग्नाचे वचन देऊन शारीरिक संबंध ठेवल्याचा आरोप आहे. आरोप आहे की तो व्यक्ती आधीच विवाहित होता आणि नंतर त्याने दुसऱ्या महिलेशी लग्न केले.

## अबू सालेमची सुटकेची याचिका उच्च न्यायालयाने फेटाळली



**नवी दिल्ली, दि.१६ फेब्रुवारी-**

१९९३ च्या मुंबई साखळी बॉम्बस्फोटातील दोषी अबू सालेम ला सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी कोणताही दिलासा दिला नाही. न्यायालयाने सुटकेची मागणी करणाऱ्या याचिकेवर सुनावणी करण्यास नकार देत म्हटले की, तुम्ही समाजासाठी कोणतेही चांगले काम केले नाही. तुम्हाला टेररिस्ट अँड डिसरप्टिव्ह क्टिव्हिटीज प्रिव्हेंशन अॅक्ट अंतर्गत दोषी ठरवण्यात आले आहे.

न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या खंडपीठाने अबू सालेमला उच्च न्यायालयात जाण्याचा सल्ला दिला. न्यायालयाने म्हटले- मुंबई उच्च न्यायालयाने केवळ अंतरिम दिलासा देण्यास नकार दिला आहे. अशा परिस्थितीत सालेमने उच्च न्यायालयातच अंतिम युक्तिवाद करावा. अबू सालेमने आपल्या याचिकेत दावा केला होता की, चांगल्या वर्तणुकीच्या आधारावर मिळणारी माफी विचारात घेतल्यास, त्याने २५ वर्षांची शिक्षा पूर्ण केली आहे आणि १० महिन्यांहून अधिक काळ तो बेकायदेशीर कोठडीत आहे.

**२५७ लोकांचा मृत्यू**

महाराष्ट्रातील मुंबईत १२ मार्च १९९३ रोजी एकापाठोपाठ १२ बॉम्बस्फोट झाले होते. एकाच दिवशी झालेल्या या हल्ल्यांमध्ये २५७ लोकांचा मृत्यू झाला आणि १,४०० लोक जखमी झाले. जून २०१७ मध्ये एका विशेष न्यायालयाने अबू सालेम आणि इतर पाच जणांना १९९३ च्या स्फोटांचा कट रचल्याबद्दल आणि ते घडवून आणल्याबद्दल दोषी ठरवले होते.

**सालेमला पोर्तुगालहून २००५ मध्ये आणले भारतात**

अबू सालेमला ११ नोव्हेंबर २००५ रोजी पोर्तुगालहून भारतात प्रत्यार्पित करण्यात आले होते. प्रत्यार्पण करारानुसार, भारताने पोर्तुगाल सरकारला आश्वासन दिले होते की, सालेमला फाशीची शिक्षा दिली जाणार नाही किंवा २५ वर्षांपेक्षा जास्त शिक्षा दिली जाणार नाही. सप्टेंबर २०१७ मध्ये मुंबईतील न्यायालयाने सालेमला जन्मठेपेची शिक्षा सुनावली.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# आजपासून सीबीएसई बोर्डाची दहावी, बारावी परीक्षा

## परीक्षा कालावधीत इलेक्ट्रीक उपकरण व साहित्यांवर बंदी; पोलिस उपायुक्त अश्विनी पाटील यांचे आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

केंद्रीय माध्यमिक परीक्षा मंडळ २०२६ इयत्ता दहावी व बारावी परीक्षा कालावधीत विविध इलेक्ट्रीक उपकरण, साहित्य आणि इतर साधनांचे वापरास बंदी घालण्या आल्याचा आदेश पोलीस उपायुक्त अश्विनी पाटील यांनी काढला आहे.

केंद्रीय माध्यमिक परीक्षा मंडळ, नवी दिल्ली यांच्यामार्फत इयत्ता १२ वी व इयत्ता १० वीची परीक्षा दि. १७ फेब्रुवारी ते दि. २७ मार्च २०२६ या कालावधीत घेण्यात येणार आहे. परीक्षा कालावधीत सर्व परीक्षा केंद्राच्या परिसरात झेरॉक्स सेंटर, फॅक्स, ईमेल, रेडिओ, इंटरनेट अशा दळणवळण सुविधा यांचा परीक्षेच्या अनुषंगाने गैरवापर होण्याची शक्यता आहे. अशा सुविधा कार्यरत ठेवणे, वायरलेस सेट, ट्रांझिटर, मोबाईल फोन, टॅबलेट, स्मार्ट वॉच, कॅल्क्युलेटर, ई-मेल, इंटरनेट, झेरॉक्स सेंटर यासारख्या दळणवळण साधनांचा परीक्षा केंद्राच्या आवारात उपयोग केला जातो. तसेच परीक्षा प्रक्रियेशी संबंधीत नसलेली व्यक्तीं परीक्षा केंद्राच्या आवारात प्रवेश करणे. यामुळे शातंता व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. डॉ. अश्विनी पाटील, पोलीस उप आयुक्त, (गुन्हे/विशा), सोलापूर शहर भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १६३ अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन असा आदेश दि. १७ फेब्रुवारी ते दि. २७ मार्च २०२६ या कालावधीत सुट्टीचे दिवस वगळून सकाळी ९ वा. ते १४.00 वा. पर्यंत पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर हद्दीचे कार्यक्षेत्रातील केंद्रीय विद्यालय, मोदी रेल्वे पुलाजवळ, जांबवीर चौक (सोलापूर) केएलई इंग्लिश मिडीयम प्रशाला, नरसिंह नगर, डी-मार्टजवळ (जुळे सोलापूर), इंडीयन मॉडेल स्कुल, जानकी नगरजवळ (जुळे सोलापूर) व सिंहगड पब्लिक स्कुल (केगांव) या सर्व परीक्षा केंद्रावरील केंद्रीय माध्यमिक परीक्षा मंडळाचे इयत्ता १२ वी व इयत्ता १० वी च्या परीक्षा संपेपर्यंत परीक्षा केंद्रापासून १०० मीटर परिसरात खालील कृती करण्यास बंदी घातली आहे.

**परीक्षा केंद्राच्या परिसरात यावर असेल बंदी**
- ✻ कोणत्याही प्रकारच्या घोषणा देणे
- ✻ सार्वजनिक शांततेस बाधा निर्माण होईल असे कृत्य करणे.
- ✻ १०० मीटर परिसरात कोणत्याही वाहनांस प्रवेश करणे.
- ✻ परीक्षा प्रक्रियेशी संबंधित नसलेली व्यक्ती केंद्राचे १०० मीटर परिसरात प्रवेश करणे.
- ✻ १०० मीटर परिसरात पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्ती एकत्र येणे.

# विकासकामांसाठी अधिकाऱ्यांचा सन्मान राखा : आ. कोठे

### प्रभाग चलो अभियानात घेतली भूमिका

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

महापालिका अधिकाऱ्यांचा योग्य सन्मान राखून प्रभागाच्या विकासाची कामे करून घ्या. विनंती करूनही कामे होत नसतील तर ती कामे करून घेण्याची जबाबदारी माझी असेल, अशी ठाम भूमिका आमदार देवेंद्र कोठे यांनी घेतली.

त्यांच्या या भूमिकेला प्रतिसाद देत प्रभाग क्रमांक १५ आणि १६ मधील विकासकामांबाबत समस्या आणि उपायांवर चर्चा करण्यासाठी शुक्रवारी झालेल्या प्रभाग चलो अभियानात भाजपा कार्यकर्ते आणि नगरसेवकांचे काम पाहणारे श्रीकांत गायकवाड यांनी महापालिका अधिकाऱ्यांचा योग्य सन्मान राखून काम करण्याची ग्वाही दिली.

महापालिकेचे अधिकारी आणि भाजप कार्यकर्त्यांनी परस्परांचा सन्मान ठेवून शहर विकासाची कामे करावीत, सर्वसामान्यांच्या अडचणी सोडवाव्यात अशी ठाम भूमिका आमदार देवेंद्र कोठे या अभियानादरम्यान सर्वत्र मांडत आहेत. जनतेची कामे घेऊन येणाऱ्या भाजपाच्या कार्यकर्त्यांना प्रशासनाकडून सन्मान मिळाला पाहिजे असा आग्रह धरताना आमदार देवेंद्र कोठे हे कार्यकर्त्यांनीही प्रशासकीय अधिकाऱ्यांचा सन्मान ठेवावा, अशी सूचना कार्यकर्त्यांना करत आहेत.

शहरातील उर्वरित विकासकामांची माहिती घेऊन त्याबाबत भाजपचे बूथ स्तरावरील कार्यकर्ते, पदाधिकारी, शहर पदाधिकारी, नागरिक यांच्यासोबत चर्चा करण्यासाठी आमदार देवेंद्र कोठे यांनी प्रभाग चलो अभियान सुरू केले आहे. यावेळी महानगरपालिकेच्या विभागीय कार्यालयातील अधिकाऱ्यांनाही आमंत्रित करण्यात येत आहे. कार्यकर्त्यांना प्रभागात काम करताना येणाऱ्या अडचणी विचारून त्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी आमदार देवेंद्र कोठे यांच्याकडून मनपा अधिकाऱ्यांना सूचना देण्यात येत आहेत. यावेळी श्रीकांत गायकवाड या कार्यकर्त्याने प्रशासनातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा योग्य मान ठेवून आगामी काळात काम करणार असल्याचे आपल्या मनोगतात सांगताच आमदार देवेंद्र कोठे यांनी त्या कार्यकर्त्याचे जाहीरपणे कौतुक करत सर्वांना टाळ्यांचा कडकडाट करून अभिनंदन करण्याचे आवाहन केले. भाजपाच्या कार्यकर्त्यांना सन्मान मिळवून देण्यासाठी प्रशासनातील घटकांचा सन्मान राखत शहर विकासासाठी पुढाकार घेतल्याबद्दल आमदार कोठे यांचे अधिकारी वर्गातून कौतुक होत आहे.



# जलसंवर्धन आणि व्यवस्थापन विषयावर एकदिवसीय कार्यशाळा

**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

जलसंवर्धन आणि व्यवस्थापन या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा दिनांक १६ फेब्रुवारी रोजी युगंधर फाऊंडेशन सोलापूर आणि यू.ई.एस. महिला महाविद्यालय सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने उत्साहात संपन्न झाली. महाविद्यालयाच्या भूगोल विभागातर्फे या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यशाळेच्या समन्वयक म्हणून डॉ. जेनब नायब यांनी जबाबदारी पार पाडली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्या प्रा. डॉ. निखत शेख उपस्थित होत्या, तर प्रमुख पाहुण्या म्हणून युगंधर फाऊंडेशनच्या अध्यक्षा प्रा. रेश्मा माने यांची उपस्थिती लाभली. या कार्यशाळेसाठी प्रमुख वक्ते म्हणून आदीला नदी संवर्धन कृती समितीचे अध्यक्ष राजकिरण चव्हाण यांनी मार्गदर्शन केले. प्रा. रेश्मा माने यांनी आपल्या मनोगतात प्रत्येकाने घरातून 'वॉटर ऑडिट' करून पाण्याचा योग्य आणि काटकसरीने वापर करण्यास सुरुवात करावी, असे आवाहन केले. तर अध्यक्षीय भाषणात प्रा. डॉ. निखत शेख यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. सतीश पन्हाळकर, आभार डॉ. सदफ चोफदार यांनी मानले.

# महापालिकेत कुरुहिनशेट्टी समाजाला संधी द्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

लोकसभा, विधानसभा व महापालिका निवडणुकीत भारतीय जनता पक्षासाठी झटलेल्या कुरुहिनशेट्टी समाजाला महापालिकेच्या स्वीकृत नगरसेवकपदासाठी संधी द्यावी, अशी मागणी कुरुहिनशेट्टी ज्ञाती संस्थेने पालकमंत्री जयकुमार गोरे, भाजप शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर, आमदार विजयकुमार देशमुख, आमदार देवेंद्र कोठे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

कुरुहिनशेट्टी समाजाने गत अनेक वर्षांपासून भारतीय जनता पक्षाला विविध निवडणुकांमध्ये एकमुखी पाठिंबा दिला आहे. संधी द्यावी, अशी या समाजाने भाजपला कळकळीची विनंती केली आहे. यावेळी कुरुहिनशेट्टी ज्ञाती संस्थेचे अध्यक्ष नारायणराव संगा, सेक्रेटरी प्रा. संजय बुगडे, सहसचिव श्रीनिवास गडगी, खजिनदार श्रीनिवास जोगी व कुरुहिनशेट्टी समाज शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रभाकर गोरंटी उपस्थित होते.





# नवदुर्गा माता मंदिरातर्फे दीपोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

सालाबाद प्रमाणे यंदाही श्री नवदुर्गा माता मंदिराच्या वतीने महाशिवरात्री निमित्त दीपोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते त्याच बरोबर श्री मल्लिकार्जुन सिद्धेश्वर महाराजांची रांगोळी काढण्यात आले व तसेच महादेव लिंग देखील रांगोळीच्या स्वरूपात काढण्यात आले.

याकरिता जवळपास ३० किलो रांगोळी १५ किलो फुले लागले. समर्थ लोखंडे ,आरती पदमगोंडा, आरती पिसे, ऋतुजा वाघमोडे यांनी रांगोळी रेखाटली. याप्रसंगी मंडळाचे आधारस्तंभ सिद्धेश्वर नाडार, संजय होमकर, भीमाशंकर पदमगोंडा, शेखर सुरवसे, नारायण सुरवसे, बाळासाहेब वाघमोडे, बाळासाहेब होमकर, नागेश व्होड्राव, जगदीश व्होड्राव, चंद्रकांत कलशेट्टी, आप्पासाहेब पटणे,राजेश हवले, गणेश पांढरे, मनोज पाटील, गजानन खटके आदींची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सागर अतनूरे, गुरुराज पदमगोंडा,सूरज होमकार, ऋतुराज वाघमोडे, वरद होमकर, विवेक गावडे, मल्लिकार्जुन करजगी आदींनी परिश्रम घेतले.



# भारतीय जनता युवा मोर्चातर्फे छत्रपती शिवरायांना दुग्धाभिषेक

### हर्षवर्धन सपकाळ यांच्या प्रतिमेला घातला चपलांचा हार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती श्री शिवाजी महाराज आणि क्रूरकर्मा शासक असलेला टिपू सुलतान या दोघांना समकक्ष पाहिले पाहिजे असे अत्यंत आक्षेपार्ह वक्तव्य केल्याबद्दल भारतीय जनता युवा मोर्चातर्फे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचा निषेध करून हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला दुधाभिषेक करण्यात आला.

छत्रपती श्री शिवाजी महाराज चौकात झालेल्या आंदोलनाप्रसंगी भाजयुमोतर्फे हर्षवर्धन सपकाळ यांच्या प्रतिमेला चपलांचा हार देखील घालण्यात आला.

भारतीय जनता युवा मोर्चा शहर अध्यक्ष विजय कुलथे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन झाले. यावेळी भारतीय जनता युवा मोर्चाचे विश्वनाथ प्याटी, यतिराज होनमाने, निशांत सावळे, अंबादास पामू, सिद्धांत धोत्रे, ओंकार होमकर, शिवानंद कावडे, प्रतीक अग्रवाल,लक्ष्मण सरवदे, लखन भोसले, श्रीनिवास दासरी, योगेश कबाडे, डोंगरेश चाबुकस्वार, अनिकेत प्रधाने, गणेश पवार, विठ्ठल सरवदे, नरेश दासरी, श्रीनिवास दासरी, अप्पू माळी, मोहन बाडीवाले, साई सज्जे, सौमित्र शिर्के, अवधूत सुरवसे, कुणाल फडतरे, पृथ्वीराज घुले, अंकुर जाधव, स्वप्नील कांबळे, हरी शिंदे उपस्थित होते.

# तुती लागवडीकडे शेतकऱ्यांनी वळावे

## अपर जिल्हाधिकारी निऱ्हाळी; जिल्ह्यात महा-रेशीम अभियानची सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ फेब्रुवारी-**

जिल्ह्यात रेशीम उद्योगाच्या प्रचार-प्रसारासाठी १० फेब्रुवारी ते ११ मार्च या कालावधीत 'महा-रेशीम अभियान राबविण्यात येत असून या अभियानाचा शुभारंभ अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी व निवासी उपजिल्हाधिकारी अभिजित पाटील यांच्या हस्ते रेशीम रथाला हिरवा झेंडा दाखवून करण्यात आला. यावेळी बोलताना अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी सांगितले की, पारंपरिक शेतीसोबत तुती लागवड हा अत्यंत लाभदायक पूरक व्यवसाय ठरू शकतो. इतर पिकांच्या तुलनेत कमी खर्चात आणि कमी जोखमीमध्ये अधिक नफा मिळवून देण्याची क्षमता या व्यवसायात आहे. जिल्ह्यातील अनुकूल हवामान आणि उपलब्ध संसाधने लक्षात घेता रेशीम उद्योगाला मोठी संधी उपलब्ध आहे. शेतकऱ्यांनी उत्पन्नवाढीसाठी तुती लागवडीकडे गांभीर्याने वळावे, असे त्यांनी आवाहन केले.

'एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण अंतर्गत राज्य शासनाकडून रेशीम उद्योगाला चालना देण्यासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. कृषी व वनसंपत्तीवर आधारित असलेल्या या उद्योगात मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मितीची क्षमता असून ग्रामीण भागातील आर्थिक सक्षमीकरणासाठी हा उद्योग प्रभावी ठरू शकतो.

रेशीम विकास अधिकारी विनित सुनिता सुरेश पवार यांनी तुती लागवड पद्धती, अळी संगोपन, कोष उत्पादन, विपणन व्यवस्था तसेच शासनाच्या अनुदान योजनांची सविस्तर माहिती दिली. त्यांनी सांगितले की, योग्य तांत्रिक मार्गदर्शन आणि शासकीय सहाय्य मिळाल्यास शेतकरी अल्पावधीत चांगला नफा मिळवू शकतात. नवीन तुती लागवड करू इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांसाठी पंचायत समिती, तालुका कृषी अधिकारी कार्यालय तसेच जिल्हा रेशीम कार्यालय, सोलापूरमार्फत तुती लागवड योजना कार्यान्वित आहे. या योजनेअंतर्गत अनुदान, तांत्रिक मार्गदर्शन व इतर आवश्यक बाबींची पूर्तता करण्यात येणार आहे. निवासी उपजिल्हाधिकारी अभिजित पाटील यांनी शेतकऱ्यांना संबंधित कार्यालयांशी संपर्क साधून रेशीम शेतीविषयी अधिक माहिती घ्यावी व तुती लागवडीतून रेशीम कोष उत्पादन करून आर्थिक प्रगती साधावी, असे आवाहन केले. जिल्ह्यात रेशीम उद्योगाच्या माध्यमातून शाश्वत शेती, रोजगारनिर्मिती आणि उत्पन्नवाढीचा नवा मार्ग खुला होत असून 'महा-रेशीम अभियान या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल ठरत आहे.

# प्रा. दिनकर पटनायक यांना पीएच.डी. पदवी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**



वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन अभियांत्रिकी विभागातील प्रा. दिनकर आर. पटनायक (पटनायाकुनी) यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ येथून विद्यावाचस्पती पदवी (पीएच.डी.) संपादन केली आहे. प्रा. पटनायक यांनी डेव्हलपमेंट ऑफ इव्हेंट-बेस्ड हार्डवेअर-इन-द-लूप फ्रेमवर्क फॉर इंटरनेट ऑफ थिंग्ज प्लिकेशन्स या अत्याधुनिक विषयावर संशोधन केले आहे. डॉ. सचिन गेंगेज यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण झाले. बाह्य परीक्षक म्हणून पुणे येथील भारती विद्यापीठ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या डॉ. अरुंधती शिंदे आणि मध्यप्रदेशातील इंदूरच्या महू येथील मिलिटरी कॉलेज ऑफ टेलिकम्युनिकेशन इंजिनियरिंगचे प्रा. डॉ. राजेश बोदाडे यांनी प्रबंध परीक्षण केले. या यशाबद्दल वालचंद शिक्षण समूहाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी, विश्वस्त भूषण शहा, वैभव गांधी, पराग शहा व समस्त विश्वस्त, प्राचार्य डॉ. विजय आठवले, विभागप्रमुख डॉ. आशा थळंगे यांनी प्रा. पटनायक यांचे अभिनंदन केले.

## महत्वाचे...



### नालंदानगर बुद्ध विहार येथे नूतन नगरसेवकांचा सत्कार

**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

नालंदा नगर बुद्ध विहार येथे नूतन नगरसेवक, नगरसेविका यांचा सत्कार कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बुद्ध विहार समितीचे अध्यक्ष शरद वाघमारे हे होते तर प्रमुख पाहणे म्हणून समाजभूषण अण्णासाहेब भालशंकर है उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर व माता रमाई यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी प्रभाग १ चे नगरसेवक गौतम कसबे, प्रभाग ४ च्या नगरसेविका वंदना गायकवाड, प्रभाग २३ चे नगरसेवक सत्यजित वाघमोडे, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, आरती वाकसे व राजशेखर पाटील यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापिका मंजुश्री खंडागळे, अण्णासाहेब भालशंकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास विजयकुमार क्षीरसागर, नागोराव कांबळे, प्रा.शहाजी मादाळे, उत्तम भालेकर, सिद्धार्थ सिद्धगणे, सुशीलादेवी भालशंकर, आम्रपाली गाडे, मंजुश्री खंडागळे, सुरेखा वाघमारे, रुक्मिणी खंडागळे, सुषमा माने, राजश्री वाघमारे, वनमाला गायकवाड, बबिता बाबरे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुशिलचंद्र भालशंकर, कपिल क्षीरसागर, अमित सूर्यवंशी, सुमित चलवादी, चंद्रमनी वाघमारे, अशोक प्रधान, रणजीत काटे, अश्वजित दुपारगुडे, अक्षय किरात यांनी परिश्रम घेतले.




### हरळय्या नगर येथे संत रोहिदास महाराजांची जयंती साजरी

**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

हत्तुरे वस्ती येथील हरळय्या नगर येथील संत रविदास बहुउद्देशिय सामाजिक मागासवर्गीय संस्था व फ्रेंन्डस ग्रुप च्या संयुक्त विद्यमानाने संत रोहिदास महाराज यांच्या जयंतीनिमित्त प्रतीमा पूजन राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे जेष्ठ नेते सुधीर खरटमल यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर प्रभाग क्रमांक २५ चे नवनिर्वाचित नगरसेवक वैभव हतुरे, सुधीर खरटमल यांच्यासह सर्व मान्यवरांचे संस्थेच्या वतीने शाल, फेटा व पुष्पहार घालून सत्कार करण्यात आले. याप्रसंगी प्रभाग क्र. २५ राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे युवा नेतृत्व रितेश हतुरे, प्रा. राहुल बोळकोटे तसेच राष्ट्रवादी पक्षाचे नगरसेवक उमेदवार समाजसेवक राजू काळे, सोलापूर महानगरपालिका समूह संघटक अधिकारी शशिकांत वाघमारे, शक्ती कटकधोंड व्यासपीठावर उपस्थित होते. प्रारंभी सुधीर खरटमल यांच्या हस्ते संत रोहिदास महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता मंडळाचे संस्थापक अध्यक्ष राहुल कोरे, कार्याध्यक्ष शिवानंद कांबळे, सचिव राकेश कोरे, खजिनदार ज्ञानेश्वर बनसोडे यांचे सहकार्य लाभले. सूत्रसंचालन राकेश कोरे यांनी तर आभार शिवानंद कांबळे यांनी मानले.



### बीएमआयटी संस्थेत स्व.ब्रह्मदेव माने यांना अभिवादन

**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

स्व. ब्रह्मदेवदादा माने यांच्या ९७ व्या जयंतीनिमित्त बीएमआयटी कॅम्पसमध्ये अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी माजी आमदार तथा श्री सिद्धेश्वर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती दिलीपराव माने, बीएमआयटीचे सचिवा जयश्री माने, जिल्हा परिषद सदस्य डॉ. पृथ्वीराज माने, चेताली मुळे, पंचायत समिती सदस्य सुनील भोसले, सुनिता बारसकर, ऋतुजा बंडगर, नगरसेवक राजकुमार पाटील, ब्रह्मदेवदादा माने बँकेचे चेअरमन सोमनाथ गायकवाड, काशीनाथ माने मार्केट कमिटी संचालक अविनाश मार्तंडे, प्रथमेश पाटील उपस्थित होते. यावेळी बाळासाहेब माने, श्रीराम पाटील, शिवाजी पाटील, मधुकर शिंदे, बाळासाहेब सुरवसे, बाळासाहेब पाटील, सरपंच बालाजी येलगुंडे, गोवर्धन जगताप, मारुती इंजिनवारे, उमेश भगत, सुनील जाधव, शिवलिंग गौडा पाटील, आप्पासाहेब काळे, राम गायकवाड, सतीश दरेकर, शाम पाटील, अनिल पाटील, प्रताप टेकाळे, गणपत बचुटे, प्रभाकर अवताडे, चंद्रकांत कराळे, भास्कर सुरवसे, मैनुद्दिन शेख, विष्णू वाघमारे, ओंकार शिंदे, विशाल भोसले, जयकुमार जगताप, तानाजी भोसले, ज्ञानोबा साखरे उपस्थित होते.

### 'मि. फिट'मध्ये स्पेशल विंटर एंड ऑफर

**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

होटगी रोडवरील गांधीनगर जवळील मि. फिटमध्ये स्पेशल विंटर एंड ऑफरची धमाकेदार सुरुवात झाली आहे. या ऑफरमध्ये घरच्या घरी चालण्यासाठी अत्याधुनिक ट्रेडमिल, गुडघेदुखी कमी करण्यासाठी व वजन घटवण्यासाठी उपयुक्त मॅग्नेटिक सायकल, तसेच संपूर्ण कुटुंबासाठी उपयोगी होम जिम



आणि इतर विविध फिटनेस साहित्याचा समावेश आहे. विशेष म्हणजे, Hercules कंपनीच्या मशीनवर तब्बल ४० टक्के पर्यंत सूट आणि 0% फायनान्स सुविधा उपलब्ध आहे. तसेच Cosco कंपनीची ट्रेडमिल फक्त १६,५०० पासून उपलब्ध आहे. ही विशेष ऑफर २८ फेब्रुवारी या कालावधीतच मर्यादित राहणार असून, नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन मि. फिटतर्फे करण्यात आले आहे.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...

### मानसिक त्रासाला कंटाळून प्राशन केले पिकावरील फवारणीचे औषध

**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

सोलापूर - स्वतःच्या शेतात मानसिक त्रासाला कंटाळून एकाने पिकावर फवारणी करण्याचे औषध पिल्याने त्रास होत असल्याने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबतची अधिक माहिती अशी की, यशवंत शिवानंद बिराजदार व ४० राहणार बादोला ता. अक्कलकोट जि. सोलापूर याने स्वतःच्या शेतात मानसिक त्रासाला कंटाळून पिकावर फवारणी करण्याचे औषध पिल्याने त्रास होत असल्याने उपचारासाठी सरकारी दवाखाना अक्कलकोट येथे दाखल करण्यात आले होते. तेथून रेफरने भाची रसिका कौलगी यांनी शासकीय रुग्णालय सोलापूर येथे दाखल केले पेशंट शुद्धीवर असल्याची नोंद असेल पोलीस चौकीत झाली आहे.



### वडोली येथे संत गाडगे महाराज यांची जयंती उत्साहात; कीर्तनसेवा व फराळाचे वाटप

**टेंभुर्णी, दि.१६ फेब्रुवारी-**

माढा तालुक्यातील वडोली येथे समाज सुधारक संत गाडगे महाराज यांच्या जयंतीनिमित्त पुष्पवृष्टी करून जयंती साजरी करण्यात आली. पत्रकार सतीश काळे यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. यावेळी हभप वैशाली पाटील यांचे कीर्तन झाले. संत गाडगेबाबा यांनी आपले संपूर्ण आयुष्य समाजासाठी अर्पण करून अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी, परंपरा संपुष्टात आणण्यासाठी काम केल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समस्त परीट बांधवांनी परिश्रम घेतले. यावेळी तंटामुक्तीचे समितीचे अध्यक्ष भैरू पिसाळ, शिवाजी जाधव, विनायक गायकवाड, परशुराम पिसाळ, शशिकांत गायकवाड, किरण गायकवाड, माऊली गायकवाड, दिनेश गायकवाड, गणेश गायकवाड, दत्तात्रय शिंदे, बाळू राऊत, हेमंत गायकवाड, रमेश मोरे, सोनू पिसाळ उपस्थित होते.

### भाजप नेते रणजित शिंदे यांना विधानपरिषदेवर संधी द्या

**मोडनिंब, दि.१६ फेब्रुवारी-**



जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये माढ्यात भाजपला मिळालेल्या यशाच्या पार्श्वभूमीवर भाजप नेते तथा जिल्हा दुध संघाचे चेअरमन रणजित शिंदे यांना विधानपरिषद सदस्यपदाची संधी देण्यात यावी, अशी मागणी उदय माने यांनी केली. मोडनिंब (ता.माढा) येथे झालेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी पक्ष संघटन तसेच निवडणूक कामगिरीचा आढावा घेत ही मागणी केली. यावेळी माने यांनी सांगितले की, जिल्हा परिषदेवर भाजपची सत्ता आली असून पंचायत समितीवरही पक्षाने सत्ता मिळवली आहे. शिंदे यांच्या नेतृत्वाखाली भाजपला जिल्हा परिषदेत ४ जागा आणि पंचायत समितीत ११ जागा जिंकण्यात यश आले. या विजयात शिंदे यांचे नियोजन, जनसंपर्क आणि कार्यकर्त्यांचे संघटन महत्त्वाचे ठरल्याचे त्यांनी सांगितले. शिंदे यांना विधानपरिषदेवर संधी दिल्यास पक्षसंघटना अधिक मजबूत होईल तसेच विकासाला गती मिळेल, असे मत माने यांनी व्यक्त केले. संबंधित स्तरावर पालकमंत्री जयकुमार गोरे यांना भेटून शिष्टमंडळ निवेदन देणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



### हरी ओम संस्थेतर्फे लाडू वाटप

**सोलापूर, दि.१६ फेब्रुवारी-**

होटगी मठाचे वीरतपस्वी शाळेचे शोभायात्रा मल्लिकार्जुन मंदिर पासून अक्कलकोट रोड विरतपस्वी शाळेपार्यंत होता.शोभायात्रेत शंकर,पार्वती, गणेशचे सजीव देखावा उठून दिसत होता.त्याच बरोबर शोभायात्रेत महादेवाचे उत्सवमूर्ती रथात ठेवलेला होता.त्यांचा सर्व भक्तांना दर्शनाचा लाभ मिळत होता. मिरवणुकीत जवळजवळ शिक्षक विद्यार्थी मिळून दीड हजारांची संख्या होती. शोभायात्रेत विद्यार्थी लेझीम, नटराजाची वेशभूषा परिधान करून नृत्य करीत होते. सदर शोभायात्रा विणकर बाग येथे आल्यानंतर हरि ओम विणकर बाग बहुदेशीय संस्थेकडून शोभायात्रा मध्ये सहभागी झालेले विद्यार्थी व शिक्षकांना प्रसाद वाटप करण्यात आले. सदर कार्यक्रमावेळी संस्थेचे उपाध्यक्ष बालाजी जंगम, लक्ष्मीकांत दंडी, विनायक सिद्धम,हिरालाल धुळम, अशोक यज्जा, संजीव नादरगी, ईरना चंशेट्टी, श्रीधर अंबाल त्याच प्रमाणे वीरतपस्वी संस्थेचे सचिव स्वामी, संचालक शशिकांत रामपुरे उपस्थित होते.

### जीर मुन्शी यांचे निधन

**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**



येथील प्रख्यात सामाजिक व शैक्षणिक व्यक्तिमत्त्व, मोहम्मद अहसन नजीर मुन्शी (उर्फ नजीर मुन्शी, वय ७५) यांचे सोमवारी दुपारी सुमारे २.३० वाजता निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली व एक मुलगा असा परिवार आहे. नूर एज्युकेशन ट्रस्टचे संस्थापक म्हणून त्यांनी आयुष्यभर समाजसेवा केली. गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या माध्यमातून उभे करण्याचे कार्य त्यांनी शांतपणे व निःस्वार्थ भावनेने केले. गेल्या चाळीस वर्षांपासून 'नूर मॅरेज ब्युरो'च्या माध्यमातून समाजातील विवाह जुळवण्याचे महत्त्वपूर्ण कार्यही त्यांनी पार पाडले. तसेच सुमारे ९०० हून अधिक विधवा व गरजू महिलांना त्यांच्या हक्काचे पेन्शन मिळवून देण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. त्यांच्या सामाजिक व शैक्षणिक योगदानाबद्दल महाराष्ट्रातील विविध संस्थांकडून त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले होते.

## नियोजन शाश्वत विकासाचे

# सांगोला नगरपरिषदेचा शिलकी अर्थसंकल्प सादर

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १६ फेब्रुवारी -**

सांगोले नगरपरिषदेचे सन २०२६-२७ साठीची अर्थसंकल्पीय विशेष सर्वसाधारण सभा नगरपरिषदेच्या सभागृहामध्ये सोमवार दि.१६ फेब्रुवारी रोजी संपन्न झाली. यावेळी नगरपरिषदेचे सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या सुधारीत व सन २०२६-२७ च्या प्रस्तावित अर्थसंकल्पास सर्वानुमते मंजुरी प्रदान करण्यात आली. मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी यांनी तयार केलेला व स्थायी समितीने सुचविलेल्या दुरुस्त्या व शिफारशीसह अर्थसंकल्प विशेष सर्वसाधारण सभेसमोर नगराध्यक्ष आनंदा माने यांच्यावतीने नगरपरिषदेचे लेखापाल हरीभाऊ काळे व लेखापरिक्षक लहु लेंगरे यांनी अर्थसंकल्प सादर केला. सदर अर्थसंकल्पामध्ये जमा बाजूस आरंभीच्या शिल्लकेसह महसुली जमा व शासन अनुदाने अशी एकुण २२९ कोटी ७९ लाख ७४ हजार ५३९ रु. इतकी रक्कम जमा दर्शविण्यात आली आहे. तसेच खर्च बाजूस महसुली व शासन अनुदानामधुन खर्च २२९ कोटी ७८ लाख २३ हजार ७४० रु इतकी रक्कम दर्शविण्यात आली आहे व अखेर शिल्लक १ लाख ५० हजार ७९९ रु. इतकी रक्कम दर्शविणेत आलेली आहे.

> नगरपरिषदेस नगरोत्थान अभियान राज्यस्तर (भुयारी गटार योजना) अनुदान मंजुर असून सदर मंजुर अनुदानामधून सांगोला शहरातील सांडपाण्याची शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया केल्याने पर्यावरण सुधारण्यास मदत होणार आहे. त्यामुळे शहरामध्ये पर्यावरण पुरक उपक्रम जोपासला जात आहे.
>
> **- डॉ.सुधीर गवळी, मुख्याधिकारी**

अर्थसंकल्पामध्ये नगरोत्थान अभियान राज्यस्तर (भुयारी गटार योजना), अधिसुचित विशिष्ठ नागरी सेवा सुविधा पुरविणेसाठी अनुदान, नगरोत्थान अभियान जिल्हास्तर, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजना, दलितेत्तर योजना, वैशिष्ट्यपुर्ण योजना, विशेष वैशिष्ट्यपुर्ण योजना, विशेष रस्ता अनुदान, अल्पसंख्यांक बहूल क्षेत्र विकास योजना, रमाई आवास घरकुल योजना, शाश्वत विकास धोरण, स्वच्छ महाराष्ट्र अभियान, प्रधानमंत्री आवास योजना त्याचप्रमाणे शहरातील बगीचे, इमारती बांधकाम, स्मशानभुमी/दफनभुमी सुधारणा, नविन रस्ते व शहरातील रस्त्यांची दुरुस्ती, नविन पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन, आवश्यक विद्युत व्यवस्था, नागरीकांना शुध्द पिण्याचे पाणी मिळणेसाठी पाणीशुध्दीकरण यंत्रणा बसविणेसाठी तरतुद करण्यात आली आहे. तसेच महिला व बालकल्याण, दिव्यांग कल्याण व दुर्बल घटकांसाठी विधिवत तरतुद करण्यात आली आहे. शहरामध्ये राष्ट्र पुरुषांचे व समाज सुधारकांचे पुतळे सुशोभिकरण करणे या कामाची तरतुद करण्यात आली आहे. या सभेस अध्यक्ष आनंदा माने, उपाध्यक्ष नितीन इंगोले, मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी, सर्व विषय समित्यांचे सभापती व नगरसेवक, विविध विभागांचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

> सांगोला शहराच्या प्रगतीला नवी गती देण्यासाठी आणि नागरिकांच्या स्वप्नांना बळ देण्यासाठी नगरपरिषदेचा सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचा सुधारीत अर्थसंकल्प आणि सन २०२६-२७ या वित्तीय वर्षाचा प्रस्तावित अर्थसंकल्प सर्वानुमते मंजुर करण्यात आला आहे. शिक्षण, आरोग्य, रस्ते, पाणीपुरवठा आणि पर्यावरण या सोबतच विद्यार्थी, युवक, महिला, जेष्ठ मंडळी व दिव्यांग बांधवासाठी विशेष तरतुदींचा या अर्थसंकल्पात समावेश आहे. तरी समृध्द आणि स्मार्ट सांगोलेच्या निर्मीतीत सहभागी होऊया.
>
> **- आनंदा माने, नगराध्यक्ष**

### लातुरात किरकोळ वादावरून विद्यार्थ्याचा धारदार शस्त्राने खून; तिघे जखमी

**लातूर, दि. १६ फेब्रुवारी**

येथील पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतनच्या एका विद्यार्थ्याचा महाविद्यालयासमोरच धारदार शस्त्राने खून झाला. यावेळी अन्य तीन विद्यार्थी जखमी झाले. ही घटना सोमवार दि. १६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी पावणे सहा वाजण्याच्या दरम्यान घडली.

विक्रम नारायण पांचाळ (वय-२१) (रा. कुंभारवाडी ता. रेणापूर) असे मृत विद्यार्थ्याचे नाव आहे. नातेवाईकांनी विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयात एकच आक्रोश केला.

दुपारी झालेल्या किरकोळ वादाचे निरसन झालेले असतानाच पुन्हा अचानक उद्‌भवलेला वाद टोकाला जाऊन विद्यालयातीलच आरोपी विद्यार्थ्याच्या बोलावून घेतलेल्या मित्राने विक्रम नारायण पांचाळ (वय-२१) (रा.कुंभारवाडी ता. रेणापूर) या अभियांत्रिकीच्या तिसऱ्या वर्षात शिकत असलेल्या विद्यार्थ्याला धारदार शस्त्राने मारल्याने तो जागीच मृत झाला. हे भांडण सोडवण्यासाठी आलेल्या इतर तीन विद्यार्थ्यांना आरोपीने धारदार शस्त्राने मारले. मारहाणीत आदित्य भारत सगरे (वय-२०) (रा.सावरी), सुजल बलभीम रेड्डी, (वय-२० रा.निलंगा), शंतनू माणिक परांडे (रा. निलंगा) हे तिघे जखमी झाले. घटनास्थळावर दाखल पोलिसांनी फॉरेन्सिक लॅबच्या माध्यमातून तपासणी सुरू केली. तीन आरोपी पैकी दोघांना अटक केली असून गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे यांनी पत्रकारांना सांगितले.





### शंकरनगरच्या कुस्ती मैदानात इचलकरंजीचा श्रीमंत भोसले विजयी

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.१६ फेब्रुवारी-**

इचलकरंजी कोल्हापूरचा मल्ल श्रीमंत भोसले याने पुण्याचा मल्ल राहुल सुळ याच्यावर गुणांनी मात करीत विजय प्राप्त केला. विजेता व उपविजेता मल्लास रोख रुपये ५१ हजार बक्षीस देण्यात आले.

महाशिवरात्री यात्रा महोत्सव समिती चॅरिटेबल ट्रस्ट शंकरनगर यांच्यावतीने शिवतीर्थ आखाड्यात जंगी कुस्त्याचे भव्य मैदान आयोजित केले होते. या मैदानात मल्ल श्रीमंत भोसले व मल्ल राहुल सूळ यांच्यात अंतिम कुस्ती झाली. सुरुवातीला दोघांनी वीस मिनिटे एकमेकाची ताकद आजमावली. यानंतर पंचांनी त्यांना गुणावर कुस्ती साठी पाच मिनिटांचा वेळ दिला.या मध्ये प्रथम गुण प्राप्त करणाऱ्या मल्ल श्रीमंत भोसले यास विजेते घोषित करण्यात आले.

या कुस्त्यांच्या मैदानाचे उद्घाटन दुपारी ३ वाजता राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, समितीचे कार्याध्यक्ष मदनसिंह मोहिते पाटील व आखाडा प्रमुख सयाजीराजे मोहिते पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी समितीचे अध्यक्ष जयसिंह मोहिते पाटील प्रमुख उपस्थित होते. या आखाड्यात २०० निकाली कुस्त्या झाल्या. या मैदानात हर्षवर्धन गुरव पाणीव याने गजानन चव्हाण गारअकोले यावर मात केली. रणजीत पवार नातेपुते याने दादा कोकाटे माळशिरस यावर मात केली. मैदानात अनेक चुरशीच्या लढती प्रेक्षकांना पहावयास मिळाल्या. यावेळी सहकार महर्षी कारखान्याचे व्हा. चेअरमन शंकरराव माने देशमुख, रावसाहेब मगर,वसंत जाधव, महाराष्ट्र केसरी छोटा रावसाहेब मगर, संचालक सतीश शेंडगे, नानासाहेब मुंडफणे, विराज निंबाळकर, अमरदीप काळकुटे, रामचंद्र ठवरे, प्रकाशराव पाटील, सुरेश मेहेर, शिवाजी सिद, भीमराव काळे, महादेव घाडगे, केशव ताटे देशमुख, दत्ता मगर यांच्यासह असंख्य कुस्ती शौकीन उपस्थित होते.



### टेंभुर्णीत 'एफस्टीन फाईल्स' विरोधात वडार संघटनेचे निषेध आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.१६ फेब्रुवारी-**

जगात खळबळ माजवणाऱ्या 'एफस्टीन फाईल्स' प्रकरणाच्या निषेधार्थ अखिल महाराष्ट्र वडार समाज संघटनेच्या वतीने सोमवारी (दि.१६) सकाळी ११ वाजता टेंभुर्णी-कुर्डूवाडी रस्त्यावरील कुर्डूवाडी चौकात निषेध आंदोलन करण्यात आले. हे आंदोलन राजकुमार बाबा धोत्रे यांच्या नेतृत्वाखाली पार पडले.

यावेळी उपस्थितांना संबोधित करताना धोत्रे म्हणाले की, जेफ्री एफस्टीन प्रकरणातील न्यायालयीन कागदपत्रांमध्ये (एफस्टीन फाईल्स) काही भारतीय व्यक्तींची नावे आल्याची चर्चा विविध माध्यमांतून होत आहे. त्यामुळे संबंधित नावांची सखोल चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करावी, अन्यथा सोलापूर जिल्ह्यात व्यापक आंदोलन छेडले जाईल, असा इशारा त्यांनी सरकारला दिला. दरम्यान, सामाजिक कार्यकर्ते महावीर वजाळे यांनी सांगितले की, अमेरिकेतील महिला पत्रकार ज्युली ब्राउन यांनी २०१८ साली या प्रकरणाला नव्याने प्रकाशझोतात आणले. त्यानंतर जेफ्री एफस्टीन याला अटक करण्यात आली आणि हे प्रकरण संपूर्ण जगापुढे उघडे झाले.

'एफस्टीन फाईल्स'मध्ये जगातील नामवंत राजकीय नेते व उद्योगपतींची नावे असल्याची चर्चा आहे. तसेच भारतातील राजकीय व उद्योजक क्षेत्रातील काही लोकांची नावे देखील चर्चेत असल्याचे सांगण्यात आले. यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी, उद्योगपती अनिल अंबानी, केंद्रीय मंत्री हरदीप सिंग पुरी यांची नावे चर्चेत असल्याचा उल्लेख करून सरकारने याबाबत अधिकृत भूमिका स्पष्ट करावी व दोषींवर तातडीने कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.

या आंदोलनात समाधान धोत्रे, तानाजी धोत्रे, रानबा मासुळे, सचिन सीना ननवरे, शंभू पवार, रोहित धोत्रे, विकास बंदपट्टे, सुनील पवार, विलाज जगताप, राहुल धोत्रे, सुरज धोत्रे, अक्षय जगताप, सचिन तांदळे, अक्षय काळे, रोहिदास पवार, नितीन धोत्रे, बालाजी मोहिते, अभिषेक धोत्रे यांच्यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

### बेलीच्या महादेवा चरणी स्वरपूजा; रंगली भजनसंध्या

**अंजली गायकवाड, ज्योती गोराणे यांच्या गायनाला उदंड प्रतिसाद**



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १६ फेब्रुवारी-**

महाशिवरात्री निमित्ताने बेलीचा महादेव सेवा परिवारांच्या वतीने बेलीच्या महादेवाच्या मंदिरासमोर महाराष्ट्रातील ख्यातनाम गायिका अंजली गायकवाड, अंगद गायकवाड, ज्योती गोराणे यांची स्वर पूजा महादेवा चरणी संपन्न झाली.

सुरुवातीला शंभू महादेवाचे दर्शन घेऊन कार्यक्रमाला सुरुवात केली कार्यक्रमाचे प्रस्ताविक श्री ज्ञानेश्वर दुधाने यांनी करून श्री बेलीचा महादेव सेवा परिवाराच्या वतीने तीन दिवस सामाजिक बांधिलकी म्हणून विविध उपक्रम घेतले त्यामध्ये मोफत आरोग्य शिबिर मोफत नेत्र रोगनिदान शिबिर, रक्तदान शिबिर, आणि सांस्कृतिक चळवळ वाढावी या उद्देशाने महाराष्ट्रातील ख्यातनाम गायिका अंजली गायकवाड यांचा शिवशंभो हा भजन संधेचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

सुरुवातीला गायिका अंजली गायकवाड, अंगद गायकवाड,ज्योती गोराणे, यांचे स्वरात गणेश वंदना मंगलमूर्ती श्री गणराया,सोहम हर डमरू बाजे,ए भोळ्या शंकरा,शंभो शंकरा करुणा करा,भाग्यदा लक्ष्मी बारम्मा,आवडत बेलाच पान,वृंदावनी वेणू,आदी सुंदर अभंगरचना गात शेवटी अवघा रंग एक झाला या अजरामर भैरवी गायली. त्यांना तितकीच सुंदर साथसंगत तबला सोहम गोराणे शाम गोराने पखवाज ज्ञानेश्वर दुधाणे हार्मोनियम अंगद गायकवाड टाळ माऊली पिसे यांनी केली.

यावेळी हजारो शिवभक्तांनी या भजनसंध्येचा आनंद घेत ओम नमः शिवाय नामाचा गजर केला. सोमवार रोजी दुपारी बेलीचा महादेव सेवा परिवार वतीने सर्व भक्त भाविकांना महाप्रसाद आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री बेलीचा महादेव सेवा परिवार यांनी परिश्रम घेत कार्यक्रम यशस्वी केला.

## शिवजयंतीच्या पार्श्वभूमीवर वाहतूक मार्गात बदल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाकडून बुधवार दि. १८ फेब्रुवारी रोजी मध्यरात्री १२ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकात शिवजन्मोत्सव सोहळ्यानिमित्त पाळणा कार्यक्रम होणार आहे तर शिवजयंती उत्सवानिमित्त गुरुवार दि. १९ फेब्रुवारी रोजी मिरवणूक काढण्यात येणार आहेत त्या पार्श्वभूमीवर शहरातील वाहतूक मार्गात बदल करण्यात आला आहे असे आदेश पोलीस आयुक्त एम राजकुमार यांनी काढले आहेत. डाळिंबीआड येथून मुख्य मिरवणुकीची सुरुवात होऊन पुन्हा डाळिंबीआड तर अन्य ठिकाणांहून निघणाऱ्या मिरवणुकांची छत्रपती शिवाजी महाराज चौकात सांगता होते.

#### हे आहेत मिरवणुकी दिवशी बंद राहणारे मार्ग

डाळिंबआड - शिंदे चौक ते सरस्वती बुक डेपो - नवीपेठ येथील पारसी इस्टेट - मेकॅनिकल चौक - छत्रपती शिवाजी महाराज चौक - तरटी नाका पोलीस चौकी बाळीवेस - टिळक चौक - मधला मारुती - माणिक चौक - कसबा चौकी - खाटीक मज्जिद - दत्त चौक - राजवाडे चौक - जुने विठ्ठल मंदिर - चौपाड यासह डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक - सरस्वती चौक - मेकॅनिक चौक - छत्रपती शिवाजी महाराज चौक वाहतूक बंद राहणार

#### हे आहेत मिरवणुकी दिवशीचे पर्यायी मार्ग

जुना पुणे नाका ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक, रेल्वे स्थानकाकडे जाण्यासाठी, जुना पुणे नाका : हॉटेल म्बेसिडर - निराळे वस्ती - कल्पना कॉर्नर - लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक - रेल्वे स्थानक - सात रस्ता मार्गे विजापूर रोड विमानतळ व सात रस्त्याकडून हैदराबाद, तुळजापूर व पुण्याकडे जाण्यासाठी : सात रस्ता - रंगभवन चौक सिविल चौक पोटपाडी चौक - विवोको प्रोसेस - शांती चौक - जुना बोरामणी नाका - मार्केट यार्ड मागे पर्यायी मार्गे जाता येणार

#### हे मार्ग असणार बुधवारी वाहतुकीसाठी बंद

जुना पुणे नाका ते छत्रपती शिवाजी महाराज चौक
सम्राट चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक
निराळे वस्ती ते हॉटेल सुप्रभात छत्रपती शिवाजी महाराज चौक
मेकॅनिक चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक
तरटी नाका चौकी ते छत्रपती शिवाजी महाराज चौक
काळी मज्जिद ते हॉटेल दिलखुश, छत्रपती शिवाजी महाराज चौक

#### हे आहेत बुधवारी वाहतुकीसाठी पर्यायी मार्ग

पुणे रस्त्याने येणाऱ्या वाहनांसाठी : जुना पुणे नाका - अँबेसिडर हॉटेल - निराळे वस्ती - कल्पना कॉर्नर - भैय्या चौकमार्गे
सम्राट चौक - बाळवेस मार्गे थ
तरटी नाका - बाळवेस मार्गे
काळी मज्जिद - शिंदे चौक - दत्त चौक मार्गे
मेकॅनिकी चौक - सरस्वती चौक - लकी चौक - दत्त चौक मार्गे

### तांदुळवाडी गणात राष्ट्रवादीच्या मनिषा मदने यांचा निसटता विजय

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि.१६ फेब्रुवारी-**

माळशिरस तालुक्यातील तांदुळवाडी पंचायत समिती गणातून मनीषा मदने-पाटील यांनी भाजपच्या वैशाली फुलारे यांचा अवघ्या ३० मतांनी पराभव केला. खरे तर मनीषा मदने यांना स्वतःचा पिलीव जिल्हा परिषद गट सोडून तांदुळवाडी पंचायत समिती गणात देण्यात आली. खरेतर त्यांच्यासाठी हा नवखा मतदारसंघ होता. प्रचारासाठी अगदी थोडेच दिवस यामध्ये मळोली, तांदुळवाडी, फळवणी, काळमवाडी, साळमुखवाडी या गावांचा या पंचायत समिती गणात समावेश आहे. या नवख्या असणाऱ्या गावातही त्यांनी ३० मताने विजय खेचून आणला. मनीषा मदने यांचे पती अमोल मदने हे पिलीव ग्रामपंचायतमध्ये फक्त एका मतानी विजय खेचून आणला होता. त्यांनी अडीच वर्षे पिलीवचे सरपंच पद भूषविले होते. अमोल मदने यांचे आजोबा स्व. बाबुराव मदने_ पाटील यांनीही पंचायत समितीचे सदस्यपद भूषविले होते .मनीषा मदने यांच्या विजयाबद्दल गुलाल उधळून व फटाके वाजवून कार्यकर्त्यांतमधुन आनंद व्यक्त केला जात आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# भारताची 'एआय' क्रांती

**१४० कोटी भारतीयांच्या सामूहिक क्षमतेवर उभा राहिलेला भारत 'कृत्रिम बुद्धिमत्ता' क्षेत्रात आघाडी घेण्याच्या तयारीत आहे, असा ठाम विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला. 'इंडिया एआय इम्पॅक्ट समिट - २०२६'च्या निमित्ताने भारताने जगाला तंत्रज्ञान, संस्कार आणि सर्वसमावेशक विकासाचा नवा संदेश दिला.**

जग आज कृत्रिम बुद्धिमत्तेच्या नव्या पर्वात प्रवेश करत आहे. औद्योगिक क्रांती, माहिती तंत्रज्ञान क्रांतीनंतर आता 'एआय क्रांती' ही मानवजातीसमोरील सर्वात मोठी परिवर्तनशक्ती म्हणून उभी आहे. या पार्श्वभूमीवर भारताने केवळ सहभागी म्हणून नव्हे, तर दिशादर्शक म्हणून पुढे येण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. 'इंडिया एआय इम्पॅक्ट समिट - २०२६'मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १४० कोटी भारतीयांच्या सामूहिक बुद्धिमत्तेवर आधारलेले भारताचे 'एआय' भविष्य जगासमोर मांडले. ही परिषद निव्वळ तंत्रज्ञानविषयक चर्चेपुरती मर्यादित नाही. विविध देशांतील धोरणकर्ते, तंत्रज्ञ, संशोधक, उद्योगक्षेत्रातील प्रतिनिधी आणि स्टार्टअप-जगतातील नवोन्मेषक अशा अनेक स्तरांतील प्रतिनिधी भारतात एकत्र आले. ५०हून अधिक देशांचे प्रतिनिधी या परिषदेत सहभागी झाल्याची माहिती देण्यात आली. ही उपस्थिती भारतावरील वाढत्या विश्वासाची पावती आहे.

या परिषदेची संकल्पना 'सर्वजन हिताय, सर्वजन सुखाय' अशी मांडण्यात आली. 'एआय' ही काही मोजक्या कंपन्यांच्या हातातील शक्ती न राहता, ती समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत पोहोचावी, हा भारताचा दृष्टिकोन आहे. पाश्चिमात्य जगात 'एआय' प्रामुख्याने नफा, बाजारपेठ आणि तंत्रस्पर्धा या चौकटीत चर्चिला जातो; भारताने त्यात सामाजिक न्याय, समावेशकता आणि भाषिक वैविध्य यांचा धागा जोडला. हेच भारताचे वेगळेपण आहे. मागील 'एआय इम्पॅक्ट समिट'मध्ये पंतप्रधानांनी एक सूक्ष्म निरीक्षण नोंदवले होते आणि ते म्हणजे 'एआय'ने निर्माण केलेल्या चित्रांमध्ये बहुतेक वेळा डाव्या हाताने रेखाटन दाखवले जाते. या उदाहरणातून त्यांनी सांगितले की, तंत्रज्ञान हे ज्या डेटावर प्रशिक्षित होते, त्याच्याच छायेत विचार करते. डेटामध्ये विविधता नसेल, तर 'एआय'ची दृष्टीही एकांगी राहते. या विधानाने भारताचा 'एआय'कडे पाहण्याचा व्यापक दृष्टिकोन जगासमोर आला. 'एआय' म्हणजे केवळ अल्गोरिदम नव्हे; ती संस्कृती, भाषा आणि अनुभवांचे प्रतिबिंब आहे.

भारताची 'एआय' क्षेत्रातील कामगिरी गेल्या काही वर्षांत झपाट्याने वाढली आहे. सुमारे एक हजार, ५०० स्टार्टअप्स भारतात 'एआय' क्षेत्रात कार्यरत आहेत. या स्टार्टअप्सचे एकत्रित मूल्य अब्जावधी डॉलर्समध्ये पोहोचले आहे. आरोग्य, कृषी, शिक्षण, वित्त, संरक्षण, शहरी व्यवस्थापन अशा विविध क्षेत्रांत भारतीय स्टार्टअप्स नवोन्मेष घडवत आहेत. 'एआय मॉडेल्स'च्या विकासात भारतीय संशोधकांची उपस्थिती जागतिक पातळीवर वाढली आहे. सरकारी पातळीवर भारताने स्पष्ट धोरणात्मक चौकट उभारली आहे. 'इंडिया एआय मिशन' हे त्याचे केंद्रबिंदू. दहा हजार, ३७२ कोटी रुपयांच्या तरतुदीसह भारत 'एआय' निर्मितीसाठी ३८ हजारहून अधिक 'जीपीयू'च्या संगणकीय क्षमतेचा वापर करीत आहे. ही केवळ आकडेवारी नाही; ती स्वदेशी 'एआय' पायाभूत सुविधांची उभारणी आहे. जागतिक तंत्रज्ञान कंपन्यांवर पूर्ण अवलंबित्व न ठेवता, स्वतःचे मॉडेल्स, स्वतःचे डेटा सेंटर आणि स्वतःची संशोधनक्षमता उभारण्याचा प्रयत्न आहे.

भाषिक वैविध्याच्या दृष्टीने 'भाषिणी' हा उपक्रम विशेष उल्लेखनीय आहे. भारतासारख्या बहुभाषिक देशात 'एआय'चा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवायचा असेल, तर तंत्रज्ञानाला भारतीय भाषांमध्ये बोलता आले पाहिजे. 'भाषिणी' प्लॅटफॉर्म विविध भारतीय भाषांमध्ये अनुवाद, संवाद आणि माहितीप्रवेश सुलभ करतो. हेच 'सर्वजन हिताय' या संकल्पनेचे मूर्त रूप आहे. 'भारत जेन' आणि 'एलएलएम' विकासाच्या माध्यमातून भारतीय संदर्भातील मोठी भाषा मॉडेल्स विकसित करण्याचा प्रयत्न सुरू आहे. 'राष्ट्रीय शिक्षण धोरण - २०२०' अंतर्गत 'एआय' शिक्षणाचा समावेश करून शालेय पातळीवरच तंत्रज्ञानाची बीजे पेरली जात आहेत. नव्या पिढीला 'एआय' केवळ वापरकर्ता म्हणून नव्हे, तर निर्माता म्हणून घडवण्याचा प्रयत्न आहे.

'एआय'चा वापर भारतात अनेक क्षेत्रांत होत आहे. कृषी क्षेत्रात हवामान अंदाज, पीक व्यवस्थापन आणि रोगनियंत्रणासाठी 'एआय'चा उपयोग. आरोग्य क्षेत्रात निदान प्रक्रिया, टेलिमेडिसिन आणि रोग-नकाशे तयार करण्यासाठी साहाय्य. वित्तीय क्षेत्रात फसवणूक ओळखणे, डिजिटल व्यवहारांचे विश्लेषण. शहरी व्यवस्थापनात वाहतूक नियंत्रण, स्मार्ट सिटी उपक्रम. या सर्वांचा थेट परिणाम नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर होत आहे. 'डिजिटल इंडिया', 'आधार', 'यूपीआय', 'जनधन' यांसारख्या उपक्रमांनी डेटा आणि डिजिटल पायाभूत सुविधा तयार केल्या. त्याच पायावर 'एआय'ची उभारणी होत आहे. नागरिकांना शासनसेवा अधिक वेगाने आणि पारदर्शक पद्धतीने देण्यासाठी 'एआय'चा वापर वाढतो आहे. सरकारी कार्यालयांतील प्रक्रिया सुलभ करण्यापासून न्यायव्यवस्थेतील प्रकरणांचे वर्गीकरण करण्यापर्यंत 'एआय'चा विस्तार होत आहे.

'परीक्षा पे चर्चा' या कार्यक्रमात पंतप्रधानांनी विद्यार्थ्यांना 'एआय'चा सकारात्मक वापर कसा करावा, याचे उदाहरण दिले. 'एआय' ही शॉर्टकट नाही; ती शिकण्याचे साधन आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. माहिती गोळा करण्यासाठी, कल्पना विस्तारण्यासाठी आणि कौशल्यवृद्धीसाठी 'एआय'चा उपयोग करा; पण विचारशक्ती गमावू नका, हा संदेश नव्या पिढीला देण्यात आला. तंत्रज्ञान आणि मानवी मूल्ये यांचा समतोल साधण्याचा हा प्रयत्न आहे. भारताचे स्वतःचे संशोधनही वाढत आहे. 'आयआयटी', 'आयआयएससी' आणि इतर संशोधन संस्थांमध्ये 'एआय'वर मोठ्या प्रमाणात प्रकल्प सुरू आहेत. 'जागतिक जर्नल्स'मध्ये भारतीय संशोधकांची उपस्थिती वाढली आहे. स्टार्टअप्स आणि अकादमिक क्षेत्र यांच्यातील सहकार्यामुळे नवोन्मेषाला गती मिळत आहे.

'इंडिया एआय डेटा' आणि 'एआय लॅब' यांसारख्या उपक्रमांमुळे संशोधकांना आवश्यक डेटा आणि संगणकीय सुविधा उपलब्ध होत आहेत. 'एआय' क्षेत्रात नैतिकतेचा प्रश्नही महत्त्वाचा आहे. डेटा गोपनीयता, अल्गोरिदमिक पारदर्शकता आणि उत्तरदायित्व यांबाबत भारताने संतुलित भूमिका घेतली आहे. तंत्रज्ञानाची प्रगती आणि नागरिकांच्या अधिकारांचे संरक्षण या दोन्हींचा समन्वय साधण्याचा प्रयत्न दिसतो. या सर्व प्रक्रियेत भारताची सॉफ्ट पॉवरही ठळकपणे समोर आली. योग, आयुर्वेद, डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा आणि लोकशाही मूल्ये यांचा संगम भारताला वेगळेपण देतो. 'एआय इम्पॅक्ट समिट'मध्ये जगभरातील प्रतिनिधींनी भारताच्या या सर्वसमावेशक दृष्टिकोनाची दखल घेतली. केवळ तंत्रज्ञान नव्हे, तर तंत्रज्ञानाचा नैतिक वापर या विषयावर भारत नेतृत्व करू शकतो, असा संदेश गेला.

भारतासाठी या परिषदेचा लाभ बहुआयामी आहे. गुंतवणूक वाढ, संशोधन सहकार्य, स्टार्टअप्सना जागतिक बाजारपेठ आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे जागतिक धोरणनिर्मितीत सहभाग. 'एआय'चे भवितव्य केवळ काही मोजक्या देशांनी ठरवू नये; विकसनशील जगाचाही आवाज असावा, ही भारताची भूमिका आहे. १४० कोटी भारतीय ही लोकसंख्या एक विशाल डेटा, कौशल्य आणि नवोन्मेष शक्ती आहे. या शक्तीला योग्य दिशा मिळाली, तर भारत 'एआय' क्षेत्रात केवळ सहभागी नव्हे, तर मार्गदर्शक ठरू शकतो. पंतप्रधानांनी व्यक्त केलेला आत्मविश्वास हा घोषवाक्यापुरता मर्यादित नाही; तो धोरण, पायाभूत सुविधा आणि मानवी संसाधन यांच्या एकत्रित प्रयत्नांवर आधारलेला आहे. 'एआय'च्या या नव्या युगात प्रश्न हा नाही की, भारत यात सक्रिय सहभागी होणार का? प्रश्न असा आहे की, भारत याचे नेतृत्व किती प्रभावीपणे करणार. 'इंडिया एआय इम्पॅक्ट समिट - २०२६'ने जगाला स्पष्ट संदेश दिला आहे आणि तो म्हणजे भारत तंत्रज्ञानाचा वापर सत्तेसाठी नव्हे, तर सर्वांच्या प्रगतीसाठी करणार आहे आणि या प्रवासात १४० कोटी भारतीय, हीच त्याची सर्वात मोठी ताकद आहे.

# भविष्याच्या सुरक्षेसाठी...

**देशातील विद्यार्थ्यांच्या वाढत्या आत्महत्या हा देशासमोरचा गंभीर प्रश्न असून, यावर केलेले आजवरचे सर्व उपाय हे मृगजळच ठरले आहेत. विद्यार्थ्यांच्या आत्महत्या हा भविष्य अंधकारमय करण्याचा प्रकार असून, त्याचे गांभीर्य लक्षात घेऊनच सर्वोच्च न्यायालयाने काही उपाययोजना सुचविल्या आहेत. या सर्व घटनांचा घेतलेला आढावा...**



**शिक्षण**
**संदीप वाकचौरे**

देशातील विद्यार्थ्यांच्या आत्महत्येबाबत यापूव न्यायालयाने अनेकदा चिंता व्यक्त केली आहे. त्याचबरोबर देशातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आत्महत्येसंदर्भात, सर्वोच्च न्यायालयाने उच्च शिक्षण संस्थांमधील आत्महत्या कमी करण्यासाठी नुकत्याच महत्त्वपूर्ण सूचनाही केल्या. त्यासंदर्भाने तत्काळ कारवाईचे निर्देश देण्यात आले आहेत. जगात विद्यार्थ्यांच्या आत्महत्या घडतात, मात्र आपल्या देशातील वयवर्षे १५ ते २९ वयोगटातील विद्यार्थ्यांच्या आत्महत्या अधिक चिंताजनक आहेत. त्याचवेळी ते प्रमाणही चिंताजनक आहे. एकीकडे आपला देश सर्वाधिक तरुणांचा देश आहे. ज्या देशाचे भविष्य तरुणाईच्या आणि शिक्षणाच्या हाती आहे, त्या देशातील शिकत असलेल्या तरुणांच्या आत्महत्या या देशातील धुरिणांना विचार करायला लावणाऱ्या आहेत. एकीकडे देशात आरोप-प्रत्यारोप होत आहेत. शेतकऱ्यांच्या समस्यांचा अभ्यास करण्यासाठी विविध समित्या नेमल्या गेल्या आहेत. समित्यांनी प्रश्नांचा अभ्यास करत शिफारसी केल्या आहेत. अद्याप त्यांवर प्रभावी उपाययोजना करण्यात व्यवस्थेला पुरेसे यश आले नाही, हे वास्तव आहे. मात्र, त्याचवेळी या देशातील तरुणाई निराशेच्या छायेत आणि तणावात राहून जीवन संपवत असेल, तर परिस्थिती हाताबाहेर जाण्यापूवच विचार करण्याची गरज आहे, अन्यथा उद्याचे महासत्तेचे स्वप्न धुळीस मिळेल. शेवटी आत्महत्या या कोणत्याही व्यवस्थेचे अपयश असते. त्यामुळे शिक्षणातून काही पेरायचे राहिले आहेत काय? याचा शोध घेण्याचा प्रयत्न व्हायला हवाच. पण, त्याचवेळी हे विद्याथ आत्महत्या का करत आहेत, याचाही विचार करायला हवा.

राष्ट्रीय कृती दलाच्या सर्वेक्षणानुसार आजाराने जितके मृत्यू होत नाहीत, त्यापेक्षा अधिक मृत्यू हे १५ ते २९ वयोगटातील विद्यार्थ्यांचे आत्महत्येने घडत आहेत. राष्ट्रीय गुन्हे नोंद अहवाल सन २०२२ नुसार सुमारे १३ हजारांपेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याचे समोर आले आहे. सध्या देशातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण, २८ टक्क्यांच्या आसपास आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार हे प्रमाण २०३५ पर्यंत ५० टक्क्यांपर्यंत न्यायचे आहे. १०० टक्के विद्याथ उच्च शिक्षणात सहभागी करून घेण्यासाठी, अजून बराच काळ जावा लागणार आहे. अर्थात, आपल्याला स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांपर्यत, लोकसंख्येच्या २५ टक्के तरुणाईच सहभागी करून घेता आली आहे. १९९०च्या नंतर जागतिकीकरण, मुक्त अर्थव्यवस्था, उदारीकरणामुळे, खासगीकरणानंतर व्यापारीकरणाचा आलेख अधिक उंचावलेला दिसत आहे. त्याचबरोबर काही प्रमाणात राज्यातील सहकारी संस्थाच्या निर्मितीमुळे, ग्रामीण भागातही शिक्षण संस्था सुरू झाल्या. त्याचा हातभार म्हणजे उच्च शिक्षण संस्थांची संख्या वाढली. अर्थात त्याचा काहीसा परिणाम देशातील वंचित घटकातील विद्याथ, काही प्रमाणात उच्च शिक्षणात सहभागी होत आहेत. संख्यात्मक वाढ एकीकडे समाधान देत असली तरी, ही तरुणाई शिक्षणाने सक्षम होत आहे काय? याचाही शोध घ्यावा लागणार आहे.

सध्या तरी आपल्या उच्च शिक्षणासमोर अनेक मोठी आव्हाने आहेत. उच्च शिक्षणात गुणवत्तेचा एकीकडे प्रश्न आहे आणि त्याचवेळी या टप्प्यावर महाविद्यालयांमधून रॅगिंग, हाणामाऱ्या, गुन्हेगारी, विनयभंग, खून यांसारख्या घटना समोर येत आहेत. नीतिमूल्यांचा प्रश्न डोके वर काढत आहे. वारंवार शिक्षणाची गुणवत्ता, गळती, मूल्याधिष्ठित शिक्षण आणि आत्महत्या यांसारख्या प्रश्नांवर, उच्च शिक्षण विभागाच्या प्रशासनाच्यावतीने सातत्याने नियंत्रण आणण्यासाठी प्रयत्न होत आहेत. मात्र, त्यांच्या प्रयत्नांना किती यश येत आहे, हाही संशोधनाचाच विषय. त्यामुळे नुकतेच सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाकडे गंभीरपणे पाहण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांच्या आत्महत्येला केवळ शैक्षणिक कारणे कारणीभूत आहेत असे नाही, तर त्यामागे सामाजिक, आर्थिक समस्या, मानसिक, भावनिक आरोग्य, स्थानिक परिस्थिती, शिक्षकांचा अभाव यांसारखी अनेक कारणे आहेत. आपल्या राजकीय, सामाजिक परिस्थितीवर नजर टाकता विद्यार्थ्यांना भविष्य आशावादी वाटत नसेल, तर निराशेची छाया निश्चित मुलांच्या मनावर परिणाम करते. त्याचा परिणाम म्हणून विद्याथ आत्महत्येचा मार्ग निवडतात.

राष्ट्रीय कृती दलाने विविध कायदे, धोरण, विविध समित्यांच्या शिफारसी, राष्ट्रीय गुन्हे नोंद अहवाल, शैक्षणिक संस्थेतील विविध मनुष्यबळ, विद्याथ समूह, पालक, शैक्षणिक संस्था, ऑनलाईन वृत्तपत्रे नमुना नोंदणी सर्वेक्षणांचा अभ्यास केला. त्यानुसार संबंधित संस्थानी योग्य उपाय केल्यास चांगले नियंत्रण होऊ शकते, असे म्हटले आहे. त्यानुसार देशात सध्या उच्च शिक्षण संस्थामधून रॅगिंग प्रतिबंधक, महिलांच्या छळापासूनच्या उपाययोजनांसाठीच्या, विद्याथ कल्याण समित्या आस्तित्वात आहेत. इतके असूनही त्याचा किती परिणाम साधला जातो का, हे पाहणेही गरजेचे आहे. महाविद्यालय प्रशासनाच्या मते, या समित्यांना अत्यंत मर्यादित असे अधिकार आहेत. संस्थांची घडलेल्या घटना लपवण्याची मानसिकता आहे. या घटना समोर आल्यास संस्थांच्या बदनामीची भीती त्यांना असते. एकीकडे वास्तव आणि चिंता असताना उच्च शिक्षण संस्थांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पालन करावे, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाचे न्या. जे. बी. पारडीवाला व न्या. आर. महादेवन यांच्या पीठाने नुकतेच दिले आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने उच्च शिक्षण संस्थांमधून होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आत्महत्येसंदर्भात, चिंता व्यक्त केली आहे. त्यासंदर्भात काही उपाययोजना करायला हव्यात. उच्च शिक्षण संस्थांनी विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांबाबत त्वरित पोलिसांना कळवावे, संस्थांची ती नैतिक व कायदेशीर जबाबदारी आहे. या आत्महत्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याचा अभ्यासही महत्त्वाचा आहे. शैक्षणिक संस्थांमधील उपाययोजनांचा अभ्यास करण्यासाठी, सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रीय कृती दलाची स्थापना केली होती. अहवालानुसार शैक्षणिक संकुलातून विद्यार्थ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी व मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी केलेले प्रयत्न फारसे दखलपात्र नाहीत. उच्च शिक्षण संस्था विद्यार्थ्यांच्या आत्महत्येनंतर वैयक्तिक स्वायत्तता समजून, संस्थात्मक जबाबदारी झटकतात. विद्याथ आत्महत्येची समस्या फक्त मानसिक आरोग्याशीच संबंधित नाही, तर त्याचे सामाजिक, आर्थिक परिणामही आहेत.

न्यायालयाच्या निर्देशानुसार उच्च शिक्षण संस्थांनी , १५ ते २९ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांच्या आत्महत्येच्या आकडेवारीची नोंदणी करणारी यंत्रणा विकसित करावी. त्यासाठी सार्वजनिक आरोग्य व लोकसंख्याशास्त्रज्ञांची मदत घेण्यात यावी. राष्ट्रीय गुन्हे नोंद अहवालात शालेय व उच्च शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांच्या आत्महत्येची आकडेवारी वेगळी नमूद करावी. उच्च शिक्षण संस्थांनी त्यांच्या शैक्षणिक संकुलाशी संबंधित विद्यार्थ्यांच्या अनैसर्गिक मृत्यू व आत्महत्यांबाबत घटनेची माहिती पोलीस अधिकाऱ्यांना कळवण्याची जबाबदारी निश्चित केली आहे. उच्च शिक्षणांसी संबंधित यंत्रणेला अनैसर्गिक मृत्यूबाबत माहिती द्यावी, विद्यार्थ्यांना आपत्कालीन वैद्यकीय मदतीसाठी २४ तास वैद्यकीय सेवा उपलब्ध असावी, संकुलात सुविधा नसेल, तर परिसरात उपलब्ध असावी, सर्व उच्च शिक्षण संस्थांमध्ये प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, तसेच महत्त्वाची प्रशासकीय रिक्त पदे चार महिन्यांत भरली जावीत, विविध प्रवर्गांतील पदे प्राधान्याने भरली जावीत, रिक्त होणाऱ्या जागा या एका महिन्याच्या आत भरल्या जाव्यात, रिक्त जागांसंबंधीचा अहवाल केंद्र, राज्य सरकारला पाठवला जावा, विद्यार्थ्यांची थकीत शिष्यवृत्ती सरकारने चार महिन्यांच्या आत अदा करावी, एखाद्या संस्थेने विद्यार्थ्याला शिष्यवृत्ती वितरित केली नाही, तर दोन महिन्यांत संबंधिताना नोटीस देऊन कारणे जाणून घ्यावीत, परीक्षाशुल्क न मिळाल्यास संबधित विद्यार्थ्यांना वर्गातील उपस्थितीसाठी प्रतिबंध करता येणार नाही, तसेच परीक्षेला बसू देण्यापासून परावृत्त करता येणार नाही, उच्च शिक्षण संस्थामध्ये कार्यरत असलेल्या विविध समित्यांच्या अंमलबजावणीसंदर्भात काटेकोरपणे पालन करावे, असेही नमूद केले आहे.

उच्च शिक्षण संस्थामध्ये होणाऱ्या आत्महत्येचा आलेख कमी होण्यासाठी या उपाययोजना निश्चित हातभार लावू शकतील, यात शंका नाही. मात्र, अनेकदा केवळ आर्थिक परिस्थिती नाही, म्हणून विद्याथ उच्च शिक्षणापासून दुरावतात. समाजातील विषमतेचे चटके या विद्यार्थ्यांच्या मनाला तीव्र स्वरूपात बसतात. त्यामुळे आत्मविश्वास कमी होणे, निराशा येणे, न्यूनगंडाची भावना निर्माण होणे घडते. उच्च शिक्षण मोठ्या प्रमाणावर खासगी क्षेत्राच्या हाती गेले आहे. खासगीकरणामुळे शिक्षण महाग होत असून, वाढत्या महागाईचा विचार करता, शिक्षण परवडणारे राहिलेले नाही. त्यामुळे आपण आपल्या मातापित्याचे स्वप्न पूर्ण करू शकणार नाही, ही मनातील भावना मुलांना निराशेच्या खाईत लोटत आहे. त्याचाही परिणाम मुलांच्या मानसिक विकासाच्या प्रक्रियेवर होताना दिसत आहे. त्यातून मुले आत्महत्येचा मार्ग जसे चालतात, त्याप्रमाणे गळतीचा पर्यायदेखील समोर येतो. एकीकडे आपल्याला २०३५ पर्यंत ५० टक्क्यांच्या आसपास नोंदणी करण्याचे आव्हान आहे आणि त्याचवेळी शिक्षण महाग होत आहे. विद्याथ आत्महत्या करत आहेत, ही सारी परिस्थिती अधिक चिंताजनक आहे. आपण या प्रश्नांकडे आज गंभीरपणे पाहिले नाही, तर उद्याचे भविष्य अधिक अंधारलेले असेल, यात शंका नाही. तरुणाई आत्महत्येच्या दिशेने जाणार असेल, आपल्याला महासत्तेच्या दिशेने प्रवास करणे कठीण आहे.

## हिमरांगातील क्रीडापर्व

गुलमर्गच्या हिमाच्छादित डोंगररांगांमध्ये २३ फेब्रुवारी ते २६ फेब्रुवारीदरम्यान रंगणाऱ्या 'खेलो इंडिया हिवाळी क्रीडा स्पर्धा', क्रीडाआधारित अर्थव्यवस्थेच्या व्यापक चित्राचा भाग आहेत. या स्पर्धा गुलमर्गमध्ये होत असल्याने, स्थानिक पर्यटनाला चालना मिळण्याचा अंदाज तज्ज्ञांकडून वर्तवला जात आहे. केंद्र सरकारने क्रीडाक्षेत्राचा विकास केंद्रस्थानी ठेवण्याचा जो निर्णय घेतला, त्याचे ठोस परिणाम आता दिसू लागले आहेत.

'कलम ३७०' रद्द झाल्यानंतर काश्मीरमध्ये पायाभूत सुविधांच्या विकासाला वेग आला. रस्ते, बोगदे, रेल्वे संपर्क, पर्यटन सुविधा आणि गुंतवणुकीस पोषक वातावरण निर्माण करण्यासाठी केंद्राने सातत्यपूर्ण प्रयत्न केले. त्याच धतवर क्रीडाक्षेत्रालाही प्राधान्य देण्यात आले. देशपातळीवरही केंद्र सरकारच्या प्रयत्नांतून होत असलेला, क्रीडाक्षेत्रातील पायाभूत सुविधांचा विस्तार हा अभूतपूर्व असाच. विविध राज्यांत आधुनिक स्टेडियम, बहुउद्देशीय क्रीडासंकुले, प्रशिक्षण अकादमी आणि 'टार्गेट ऑलिम्पिक पोडियम'सारख्या योजनांमुळे, खेळाडूंना आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षण मिळू लागले आहे. परिणामी, भारतीय खेळाडू जागतिक स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करताना दिसत आहेत. ही यशस्वी कामगिरी अचूक नियोजन आणि पायाभूत गुंतवणुकीचाच परिणाम आहे.

'खेलो इंडिया'मुळे ग्रामीण आणि दुर्गम भागातील क्रीडाप्रतिभेला राष्ट्रीय व्यासपीठ उपलब्ध झाले. यातूनच पूव झाकोळलेली गुणवत्ता आता प्रकाशझोतातही आली. क्रीडा-अर्थव्यवस्थेचा परिणाम स्थानिक उद्योगांवरही होतो. स्टेडियम उभारणी, क्रीडासाहित्य निर्मिती, प्रशिक्षण सुविधा, पर्यटन, प्रसारण आणि विपणन या सर्वच क्षेत्रांत रोजगारनिर्मिती होते. काश्मीरसारख्या प्रदेशात तर क्रीडा आणि पर्यटनाचा संगम आर्थिक स्थैर्याला नवे परिमाण देतो. देशविदेशांतून येणारे पर्यटक, अशा स्पर्धांमुळे वाढणारी प्रसिद्धी आणि स्थानिक उत्पादनांना मिळणाऱ्या बाजारपेठेमुळे काश्मीरची अर्थव्यवस्था अधिक सक्षम होण्याची शक्यता आहे.

केंद्र सरकार क्रीडाक्षेत्राला केवळ स्पर्धात्मक क्षेत्र न मानता, सामाजिक आणि आर्थिक परिवर्तनाचे साधन म्हणून पाहिले जात आहे. या क्षेत्रासाठीचे योग्य नियोजन आणि अंमलबजावणीमधील सातत्यामुळे, लवकरच क्रीडा-अर्थव्यवस्थेचे हे नवे पर्व देशाच्या सर्वांगीण विकासाला भक्कम आधार देईल.

## वाहनविक्रीची भरारी

**वेध**
**कौस्तुभ वीरकर**

भारतातील वाहनविक्रीत झालेली अलीकडील वाढ, अर्थव्यवस्थेच्या अंतर्प्रवाहातील बदलांचे द्योतक आहे. जानेवारी महिन्यात प्रवासी वाहनांच्या विक्रीत १३ टक्के, दुचाकी वाहनांत २६ टक्के आणि तीनचाकी वाहनांत ३० टक्क्यांची वाढ नोंदवली गेली. गेल्या वषच्या ५८ हजारम् १६७ युनिट्सची झालेली विक्री, यंदा ७५ हजार, ७२५ युनिट्सपर्यंत पोहोचली. ही आकडेवारी ग्राहकांमधील आत्मविश्वास, बाजारातील चलनवाढीवरील नियंत्रण आणि धोरणात्मक हस्तक्षेपांचे परिणाम यांचे द्योतक ठरते. या वाढीमागील पहिला घटक म्हणजे आर्थिक स्थैर्याची जाणीव. गेल्या काही तिमाहींमध्ये महागाईचा दर तुलनेने नियंत्रित राहिल्याने आणि व्याजदरांतील स्थैर्यामुळे, ग्राहकांनी दीर्घकालीन खरेदीचे निर्णय पुढे ढकलण्याऐवजी अमलात आणले. वाहनखरेदी ही भावनिक नसून आर्थिक निर्णय असतो; तो उत्पन्नावरील विश्वास आणि भविष्यातील स्थैर्याच्या अपेक्षांवर आधारलेला असतो. त्यामुळे प्रवासी वाहनविक्रीतील वाढ ही मध्यमवगय आशावादाची खूण आहे.

दुसरा महत्त्वाचा पैलू म्हणजे सरकारी धोरणांचे परिणाम. वाहनांवरील जीएसटी कमी केल्याने, अंतिम ग्राहकांवरील किमतीचा ताण कमी झाला. विशेषतः दुचाकी व लहान प्रवासी वाहनांच्या श्रेणीत या करसवलतींचा अप्रत्यक्ष परिणाम दिसून आला. शिवाय, पायाभूत सुविधांवरील सार्वजनिक गुंतवणुकीमुळेही वाहनांची गरज आणि उपयुक्तताही वाढली. वाहन हे केवळ चैनीचे साधन न राहता, दैनंदिन व्यवहाराचे आवश्यक साधन बनले. दुचाकी विक्रीतील २६ टक्क्यांची वाढ ग्रामीण आणि निमशहरी अर्थव्यवस्थेतील खरेदीक्षमता दर्शवते. कृषी उत्पन्नातील सुधारणा, ग्रामीण रोजगार हमी योजनांचा प्रभाव, तसेच सूक्ष्म वित्तपुरवठ्याची उपलब्धतेमुळे ग्रामीण ग्राहक बाजारात सक्रिय झाले.

तीनचाकी विक्रीतील झेपही सेवाक्षेत्रातील हालचालींचे द्योतक म्हणावे लागेल. ई-कॉमर्स वितरण, लघुव्यवसाय, प्रवासी वाहतूक या क्षेत्रांत वाढलेली मागणी यामागे आहे. वाहन उद्योग हा बहुआयामी परिसंस्थेचा केंद्रबिंदू असल्याने, त्यातील वाढीचा प्रतिध्वनी पोलाद, रबर, इलेक्ट्रॉनिक्स, लॉजिस्टिक्स, विमा, बँकिंग अशा अनेक क्षेत्रांत उमटतो. उत्पादनवाढ म्हणजे रोजगारवाढ; रोजगारवाढ म्हणजे क्रयशक्तीवाढ असा सकारात्मक चक्राकार परिणाम यातून दिसतो. एकंदरीत, वाहनविक्रीतील वाढ ही भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासाची खूण आहे.

# तापलेला हिवाळा



**जगाच्या पाठीवर**
**मुकुल आव्हाड**

समाजाच्या जीवनव्यवहारातून तंटे, वितंडवाद आपण समूळ नष्ट करु शकत नाही. किंबहुना, तसे केल्यास स्वर्गलोकीचचे नंदनवन आपण इथेच अनुभवू. परंतु, माणसांचे वेगवेगळे समूह, त्यांच्या धारणा यांमधूनच सातत्याने मानवजातीत विविध संघर्ष जन्माला येतात. काळाच्या ओघात माणसाची भांडण करण्याची क्षमता नुसती वाढलीच नाही, तर बदललीसुद्धा! दगड-धोंड्यापासून, पृथ्वीचा सर्वनाश करण्याऱ्या अणुबॉम्बपर्यंत माणसाने चमत्कारिक प्रगती केली. असे असले तरी, काळाच्या ओघात या संघर्षातून मुक्ती मिळवण्यासाठी समन्वय झाला पाहिजे, असा विचारही अनेकांनी केला. सातासमुद्रापार जाणारी एखादी कला, किमान दोन राष्ट्रांना जोडते. अशाच पद्धतीने जेव्हा आंतरराष्ट्रीय क्रीडा महोत्सवांचे आयोजन होते, तेव्हा खेळाप्रति असलेल्या निष्ठेतून एका प्रकारचा सकारात्मक संघर्ष आपल्याला अनुभवायला मिळतो. अशा क्रीडा महोत्सवांच्या संगमातील केंद्रबिंदू म्हणजे ऑलिम्पिक्स. सध्या ईशान्य इटलीमध्ये २०२६ हिवाळी ऑलिम्पिकचे आयोजन करण्यात आले आहे. 'मिलानो कोर्तिना २०२६' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या स्पर्धेत, ६ फेब्रुवारी ते २२ फेब्रुवारीदरम्यान इटलीच्या अनेक भागांमध्ये विविध खेळांचे आयोजन करण्यात आले आहे. मात्र, काही वादग्रस्त घटनांमुळे या क्रीडा महोत्सवाला वेगळेच वळण लागले आहे.

स्केलेटन रेसिंग या स्पर्धेमध्ये मागच्या काही दिवसांमध्ये घडलेल्या एका विवादास्पद घटनेने, साऱ्यांचेच लक्ष्य वेधून घेतले. युक्रेनचा स्केलेटन रेसर व्लादिस्लाव हेरास्केविच याने त्याच्या हेलमेटवर, रशिया-युक्रेन युद्धात मृत्युमुखी पडलेल्या २४ युक्रेनियन खेळाडू आणि मुलांचे स्मृतिप्रीत्यार्थ फोटो लावले होते. 'आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समिती'ने याला 'राजकीय' मानून, 'ऑलिम्पिक चार्टर'च्या कलमानुसार खेळाडूवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला. त्याला हेलमेट बदलण्यास सांगण्यात आले होते, पण त्याने नकार दिल्याने त्याच्यावर कारवाई करण्यात आली. आपल्या राजकीय मतांचे प्रदर्शन केल्यामुळे, या कारवाईला खेळाडूला सामोरं जावं लागलं. युक्रेनचे राष्ट्रपती व्होल्दोमीर झेलेन्सकी यांनी अर्थातच यावर नाराजी व्यक्त केली. यासंदर्भात माध्यमांशी संवाद साधताना ते म्हणाले की, ''ऑलिम्पिकसारख्या संस्थांनी आक्रमणकर्त्यांच्या कारस्थनाला बळी न पडता, युद्ध थांबवण्याच्या दिशेने प्रयत्न करायला हवे.''

बब्सले, स्केलेटन आणि लुज यांसारख्या खेळांसाठी स्लायडिंग ट्रॅक बांधावा लागतो. हा ट्रॅक बांधण्यासाठी सुमारे ११८ दशलक्ष युरो (जवळपास १ हजार, १०० कोटी रुपये) खर्च करण्यात आला. इतक्या मोठ्या प्रमाणात ज्या ठिकाणी खर्च होतो, तिथे अर्थातच काही समाजघटकांना हा पैशाचा अपव्यय वाटू शकतो, त्याअनुषंगानेही याचा विरोध करण्यात आला. सोबतच, ट्रॅकसाठी मोठ्या प्रमाणात होणाऱ्या वृक्षांच्या कत्तलीमुळेही इटली सरकारने चांगलाच रोष ओढावून घेतला आहे. स्की-जम्पिंग या खेळामध्ये विजयी होण्यासाठी, काही खेळाडू सूटच्या मापनात फेरफार करण्यासाठी आणि थोडे मोठे, अधिक वायुगतिकीय सूट मिळवण्यासाठी त्यांच्या जननेंद्रियांमध्ये पॅराफिन किंवा तत्सम इंजेक्शन घेत असल्याचा आरोप करण्यात आला. जर्मनीमध्ये पहिल्यांदाच प्रसिद्ध झालेल्या या अफवांमुळे 'वर्ल्ड ॲण्टी डोपिंग एजन्सी' आणि अनेक संस्था खडबडून जाग्या झाल्या आहेत.

अमेरिकेचे उपराष्ट्रपती जे. डी. व्हान्स आणि त्यांच्या पत्नी उषा यांना ऑलिम्पिकच्या उद्घाटन समारंभाच्यावेळी, लोकांनी 'बू' करून दाम्पत्याचा निषेध नोंदवला. या सगळ्या घटनांमध्ये अगदी हास्यास्पद ठरावी अशी कुठली घटना असेल, तर ती म्हणजे पदकांचं खराब होणं. स्पर्धेच्या पहिल्याच आठवड्यात अनेक दिग्गज खेळाडूंनी त्यांची पदके खराब झाल्याचे समाजमाध्यमांवर दाखवले. अमेरिकेच्या ब्रीझी जॉन्सन यांनी महिलांच्या 'डाऊनहिल स्कीईंग'मध्ये सुवर्णपदक जिंकल्यानंतर, ब्रीझी आनंदाने उड्या मारत असताना तिचे पदक रिबनमधून निखळून खाली पडले. तिने पत्रकारांना तिचे तुटलेले आणि चिरा पडलेले सुवर्णपदक दाखवले. स्वीडनच्या एबा ॲण्डरसन हिचे रौप्यपदक बर्फात पडले आणि त्याचे दोन तुकडे झाले. आता ऑलिम्पिकसारख्या स्पर्धेतसुद्धा अशा गोष्टी घडाव्या, यातून स्थानिक प्रश्नांचे जागतिक महत्त्व लक्षात येते. एकूणच काय, तर वितंडवादाच्या भोवऱ्यात हा तापलेला हिवाळा आपल्या आणखी कुठल्या गोष्टी दाखवणार, याकडे सगळ्यांचं लक्ष्य आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



## एच.एन. कॉलेजच्या आकीब शेख व निहार घाडगे यांची कामगिरी

**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांनी जानेवारी २०२६ मध्ये झालेल्या राज्य कॅम्प व स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करून महाविद्यालयाचा लौकिक उंचावला आहे. आकिब शेख याची राज्य कॅम्पसाठी सोलापूर विद्यापीठ संघात निवड झाली. डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ येथे आयोजित कॅम्पमध्ये त्याने उत्स्फूर्त सहभाग नोंदवून उत्कृष्ट कार्य केले. तसेच निहार घाडगे याची 'उत्कर्ष' राज्यस्तरीय सामाजिक व सांस्कृतिक स्पर्धेसाठी विद्यापीठ संघात निवड झाली. सोलापूर विद्यापीठात झालेल्या राज्य स्पर्धेत त्याने उत्कृष्ट सहभाग नोंदवून आपली गुणवत्ता सिद्ध केली. त्याच बरोबर या विद्यार्थ्यांची निवड सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे संपन्न होत असलेल्या राष्ट्रीय एकात्मता शिबिरासाठी झाली आहे. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. श्रीनिवास जगताप यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सत्यजित शहा यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



## शिवजयंतीनिमित्त महापालिकेतील रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त छत्रपती शिवाजी महाराज जयंती मंडळ (सोमपा) यांच्या वतीने महानगरपालिका परिसरात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिराचे उद्घाटन उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महेश देवकर, नगरसेवक विनोद भोसले, नगरसेवक सत्यजित वाघमोडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी आयुक्त डॉ. सचिन ओम्बेसे, उपायुक्त आशिष लोकरे यांनी शिबिरास भेट दिली. शिबिर यशस्वी करण्यासाठी शिव जन्मोत्सव मंडळाचे संस्थापक माऊली पवार, अध्यक्ष प्रभुलिंग पुजारी, सल्लागार प्रदीप जोशी, सदस्य सोहन माने, मेघराज साळुंखे, सौरभ सांगवे, श्रीकांत घोलप, दत्ता गायकवाड, महादेव ढेकणे, श्रीकांत भडके, श्रीनिवास रामगल, गणेश डेंगळे, विक्रम पाटील, अमृत हावळे आणि सतीश कोळी यांनी परिश्रम घेतले.

## दारूच्या नशेत दोघांना सत्तुरने मारहाण

**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

घरगुती भांडणाच्या कारणावरून दारूच्या नशेत दोघांना सत्तुरने मारहाण करण्यात आल्याची धक्कादायक घटना सोलापूर जिल्ह्यात घडली आहे.याबाबत अधिक माहिती अशी की वडाळा येथील हॉटेल विश्वजीत येथे घरगुती भांडणाच्या कारणावरून दारूच्या नशेत असताना माधवकुमार याने सत्तुरने मारहाण केल्याने राजाराम वय २८ राहणार वडाळा यांना डोक्यास तर नागेश राम वय ४० यांना डाव्या हातास जखम झाल्याने उपचारासाठी सरकारी दवाखाना वडाळा येथे दाखल करण्यात आले होते. तेथून रेफरने पुढील उपचारासाठी मदतनीस प्रवीण जगदाळे यांनी शासकीय रुग्णालय सोलापूर येथे दाखल केले अशी नोंद सिविल पोलीस चौकीत झाली आहे.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**विद्युत काम**

मध्य रेल्वे, सोलापूर येथील वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (TRD) यांनी भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने रेल्वेज ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.Ireps.gov.in वर खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवल्या आहेत. निविदा क्रमांक: SUR/TD/T/2025/18R कामाचे नाव:- दौंड-मोहोळ विभागात 26 बॅरल लांबीचा विस्तार आणि 09 (स्लॅब 05, आरसीसी पाईप 02 आणि आर्च 02) पुलांची पुनर्बांधणी. 2) महत्त्वाच्या पूल क्रमांक 2 च्या मार्गावर जीईओ सेल, जिओ टेक्सटाइल आणि ब्लँकेटिंग मटेरियल वापरून संक्रमण प्रणाली बसवणे. सोलापूर विभागातील दौंड-सोलापूर विभागात किमी 431/5-8 (UPDN) येथे 431/1 आणि किमी 315/0-2 येथे पूल क्रमांक 315/1. (पुनर्निमंत्रण) अंदाजे किंमत:-73,65,625.41 इमारत सुरक्षा:- 1,47,300/- पूर्ण कालावधी:- 12 महिने ऑफरची वैधता:- 60 दिवस वेबसाइटवर निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ:-16/03/2026 दुपारी 3.00 वाजता.
ANJ-13
सुरक्षित प्रवास करा, एव्होल्ड फूटबोर्डने प्रवास करा

# महाशिवरात्रीनिमित्त सरवदे नगरात साकारला रुद्रावतार

## ५०० भक्तांना शाबुदाणा खिचडी आणि भगर महाप्रसाद वाटप

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

प्रत्येक पूर्वंताच्या शरीरावर १० ते १२ रुद्राक्ष माळा, अंगरखा, फेटा, हार यासह कमरेला पितळी कमरपट्टा, दंडाला बाजूबंद, शस्त्र आणि तलवार असा सुमारे २० किलो वजनी साज चढवून आज सरवदे नगरातील पूर्ववंतांनी प्रत्यक्ष रुद्रावतार साकारला. महाशिवरात्रीनिमित्त सोलापुरातील मुळेगाव रोडवरील सरवदे नगरात श्री मल्लिकार्जुन चॅरिटेबल ट्रस्ट आणि साक्षी गणपती तरुण मंडळाच्या वतीने ही वीरभद्र वेषातील भव्य मिरवणूक काढण्यात आली. सोहळ्यानंतर ५०० भक्तांना शाबुदाणा खिचडी आणि भगर महाप्रसाद वाटप करून उत्सवाची सांगता करण्यात आली.

**ऐतिहासिक साज: २० किलो वजन**

या मिरवणुकीत पूर्ववंतांचा पेहराव आकर्षणाचे केंद्र होता. रुद्राक्ष माळांपासून ते तलवारीपर्यंत सर्व अलंकारांचे वजन सुमारे २० किलो होते. या जड वेशभूषेतही पूर्ववंतांनी मोठ्या उत्साहात विधी पार पाडले. लिंगायत धर्मातील गुगुळ ही सांस्कृतिक प्रथा कुलाचार म्हणून पाळली जाते.

हैदराबाद रोडवरील श्री मल्लिकार्जुन मंदिरात पार पडलेल्या या ऐतिहासिक सोहळ्याने सोलापूरकरांचे डोळे दीपवले.

शिवाची भक्ती माणसाला परम समाधान देते, ती स्वतःला समजून घेण्यास मदत करते आणि हीच भक्ती महाशिवरात्रीच्या दिवशी भगवान म हादेवाशी एकरूप होण्याची संधी देते. याच श्रद्धेतून ही परंपरा दरवर्षी हणमंत सराटे यांच्याकडून जपली जात आहे.

लिंगायत किंवा वीरशैव यांची प्रमुख



देवता शिव असून वीरभद्र हे भगवान शिवाचे अत्यंत उग्र आणि बहाद्दूर अवतार मानले जातात.

सतीच्या मृत्यूनंतर शिवाच्या क्रोधाग्नीतून निर्माण झालेल्या वीरभद्राने दक्ष राजाचा यज्ञ उधळून लावला होता. ते शक्ती आणि अन्यायाविरुद्ध लढण्याचे प्रतीक असल्याने, त्यांच्याकडून शिवपूजन करण्याची प्रथा मागील अनेक वर्षांपासून सरवदे नगरात पारंपरिक वेषात सुरू आहे.

**पुरवंत सेवेकरी**

या महापूजेत मुख्य अर्चक तथा पूर्ववंत हनुमंत सराटे यांच्या मार्गदर्शनाखाली शंकर भागेळी, शिवकुमार रेखे, अनिकेत पाटील, इरणा भागेळी आणि हिराणा मुनोळी यांनी पूर्ववंत सेवा दिली, तर मल्लिकार्जुन भागेळी यांनी संबळ वादन केले.

## विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत पालक व शिक्षकांची महत्त्वपूर्ण भूमिका : डॉ. गोपाळकृष्ण जोशी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

कोणत्याही विद्यार्थ्याचे व्यक्तिमत्त्व दोन स्तरांवरुन घडत असते. त्यामध्ये त्याचे कुटुंब व महाविद्यालय यांचा समावेश होतो. यातूनच विद्यार्थ्यांवर मूल्यात्मक संस्कार घडतात आणि विद्यार्थ्याच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होते. त्यामुळे पालक व शिक्षक यांची महत्त्वपूर्ण भूमिका विद्यार्थ्याच्या जडणघडणीत असते असे विचार एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठ सोलापूरचे संस्थापक कुलगुरु डॉ. गोपाळकृष्ण जोशी यांनी मांडले.

संगमेश्वर कॉलेजमध्ये ७३ व्या वार्षिक शैक्षणिक गुणवत्ता पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. या कार्यक्रमास मंचावर संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ॲड. धनंजय माने, संस्थेचे चेअरमन धर्मराज काडादी, सचिव प्रा. ज्योती काडादी, व्यवस्थापन समितीचे



सदस्य पुष्पराज काडादी, ॲड. रा. गो. म्हेत्रस, उमा गोपाळकृष्ण जोशी, शैक्षणिक सल्लगार डॉ. प्रमोद दर्गोपाटील, प्र. प्राचार्य डॉ. ऋतुराज बुवा, उपप्राचार्य प्रसाद कुंटे, संगमेश्वर रात्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीनिवास गोठे, विद्यार्थी प्रतिनिधी विनीत दिनकर तसेच सिध्दाराम चाकोते, महादेव जम्मा, प्रभू मैंदर्गीकर, रतन रिक्के, माजी प्राचार्य डॉ. राजन अन्यापनावर, डॉ. राजेंद्र देसाई व प्रा. आनंद हुली या मान्यवरांची विशेष उपस्थिती होती. सुरुवात संगमेश्वर गीताने झाली. स्वागत व प्रास्ताविक डॉ. ऋतुराज बुवा यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. लीना खमितकर यांनी करुन दिला. विद्यार्थी प्रथमेश पुरुड, श्रुतिका चव्हाण, ऋचा साळुंखे आणि डॉ. ममता बोल्ली यांनी मनोगते व्यक्त केली. कु. तनिष्का गोरख साळुंखे हिचा प्रमाणपत्र देवून गौरव करण्यात आला.

शैक्षणिक गुणवत्ता यादीचे वाचन वरिष्ठ विभाग डॉ. विजयकुमार मुलीमनी, कनिष्ठ विभाग प्रा. सिध्दाराम विजापुरे, तसेच रात्र महाविद्यालयाच्या गुणवत्ता यादीचे वाचन प्रा. गुरुदास घनाते यांनी केले. आभार विद्यार्थी प्रतिनिधी विनीत दिनकर याने मानले. सूत्रसंचालन डॉ. पुष्पांजली मेत्री, प्रा. कोमल कोंडा व प्रा. संतोष पवार यांनी केले.

## बार असोसिएशन यांच्या वतीने संत सेवालाल महाराजांची जयंती साजरी

**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

बार असोसिएशन यांच्या वतीने बार असोसिएशन हॉल येथे संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त तैलचित्रास पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बारचे अध्यक्ष ॲड. बाबासाहेब जाधव तसेच उपाध्यक्ष ॲड. रियाज शेख, सचिव ॲड. बसवराज हिंगमिरे, खजिनदार ॲड.



अरविंद देडे उपस्थित होते. यावेळी बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवाचे विद्यमान सदस्य ॲड. मिलिंद थोबडे, जिल्हा सरकारी वकील ॲड. प्रदीपसिंग रजपूत, म ाजी अध्यक्ष ॲड. संतोष न्हावकर, माजी उपाध्यक्ष ॲड. असीम बांगी आदी मान्यवर यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन बारचे सचिव ॲड. बसवराज हिंगमिरे यांनी केले. ॲड. रमेश राठोड यांनी आभार मानले.

### जाहीर नोटीस उत्तर

आमचे अशिल मीरा सोमनाथ गलांडे, शुभांगी सोमनाथ गलांडे, पल्लवी सोमनाथ गलांडे यांनी दिलेल्या माहितीवरून व ता. २४/०१/२०२६ रोजी दैनिक तरुण भारत मध्ये ॲड. नितीन गजेंद्र शिंदे यांचे मार्फत दिलेल्या जाहीर नोटीसीस उत्तर असे की,

डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे येळंब येथील जमीन गट नं. २२/१/ब क्षेत्र ०३ हे २७ आर, आकार ०४ रु. ९२ पैसे या जमीनीबाबत जी अग्रहक्काची नोटीस दिलेली आहे त्या नोटीसीत अग्रहक्काने जमीन खरेदी करणाऱ्या व्यक्तीचे नाव नमुद नसल्याने सदरची नोटीस ही खरी नाही, कायदेशीर नाही ती आमचे अशिलांना मुळीच मान्य व कबूल नाही, आमचे अशिल हे मयत सोमनाथचे कायदेशीर वारस असल्यामुळे त्यांनी खासेराव गलांडे यांचेसह बार्शी वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालयात स्पे.मु.नं. ०७/२०२६ चा ता. २३/०१/२०२६ रोजी वाटप, मनाई, अग्रहक्काचा व खरेदीखत रद्द होवूनचा दावा दाखल केलेला आहे, आमचे अशिलाची मिळकत हडप करण्याच्या उद्देशाने सदरची नोटीस दिलेली आहे.

त्यामुळे वरिल प्रमाणे वस्तुस्थिती असल्याने ॲड. नितीन गजेंद्र शिंदे यांचे मार्फत ता. २४/०१/२०२६ रोजी प्रसिध्द झालेल्या जाहीर नोटीसीवर कोणीही विश्वास ठेवू नये त्यांनी ता. २४/०१/२०२६ रोजी दिलेली जाहीर नोटिस आमचे अशिलांना मुळीच मान्य व कबूल नाही. वरील वस्तुस्थिती सर्वांसमोर येणेकरीता सदर जाहीर नोटिस उत्तर दिले असे.

कळावे हे जाहीर नोटीस उत्तर दिले असे. ता. १६/०२/२०२६

**सही/-**
**मिरा सोमनाथ गलांडे,**
**शुभांगी सोमनाथ गलांडे,**
**पल्लवी सोमनाथ गलांडे यांच्यातर्फे**
**ॲड. श्री. आर. यु. वैद्य**
उपळाई रोड, आदित्य कृष्णानगर,
वायकुळे प्लॉट, दोन लिंबाजवळ, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर
मोबा.नं. ९८५०२७७९४४

### जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की.

**मिळकतीचे वर्णन** - डिस्ट्रीक्ट व सब डिस्ट्रीक्ट सोलापूर तालुका उत्तर सोलापूर येथील मौजे कसबे सोलापूर येथील जुना सर्व्हे क्रं. १८०/२ यासी नवीन सर्व्हे नं. १७१/१/दक्षिण याचे एकूण क्षेत्र ५ हे. ९६ आर. यापैकी ० हे. ६९.८८ आर. यापैकी गुंटेवारी नकाशाप्रमाणे प्लॉट नं. २१ याचे एकूण क्षेत्र २७८.८१ चौ.मी. खुली प्लॉट जागा यांसी चतुः सिमा पूर्वेस - रस्ता, दक्षिणेस - नरसिंग विडी घरकुल, पश्चिमेस- प्लॉट नं. २४, उत्तरेस - प्लॉट नं. २०, येणेप्रमाणे वर्णन केलेली खुली प्लॉट जागा ही श्री. सुनिल बालराज मादगुंडी आणि अशोक बाळकृष्ण कोंडा यांचे खरेदी, मालकी, कब्जेवहिवाटीचे असून, त्यांनी सदरची खुली प्लॉट जागा विक्रीस काढली आहे आणि आमच्या अशिलाबरोबर खरेदीचा व्यवहार करण्याचे ठरविलेले आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याबाबत सदरच्या मिळकतदारांनी आमच्या अशिलास हमी व खात्री दिली आहे.

तथापि वर नमुद खुली प्लॉट जागेवर कोणाचाही, कोणताही प्रकारचा मालकी हक्क, खरेदी घेण्याचा हक्क, लिज, लीन, जप्ती, टाच, गहाण, दान, बक्षिस, पोटगी, बोजा, चार्ज, कब्जा, कोर्ट वाद, करार मदार इत्यादी किंवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, तत्सम करार मदार असल्यास, त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून सात (७) दिवसांचे आत योग्य त्या कागदपत्रानिशी व पुराव्यानिशी लेखी आमचे खालील पत्यावर कळवावे. मुदतीत कोणाची ही कसली ही तक्रार न आल्यास आमचे अशिल सदरची वर नमूद मिळकतही निर्वेध व निजोखमी असल्याचे समजून पुढील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर येणाऱ्या तक्रारींचा विचार केला जाणार नाही आणि ती तक्रार आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही

याची कृपया नोंद घ्यावी कुणाची फसगत होवू नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली तारीख - १६/०२/२०२६.

**सही/-**
**विक्रम आर. बेदूर**
**बी.एस.एल., एलएल.बी.**
**ॲडव्होकेट**
**२/१५३६, बालाजी गार्डन अपार्टमेंट,**
**बालाजी मंदीर समोर, दाजी पेठ, सोलापूर**
**मो. नं. ९३७९५२९३७१**

### महाराष्ट्र शासन
### कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
**सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर**
**सात रस्ता, कारीगर पेट्रोल पंपासमोर, सोलापूर ४१३००३**
**ई-निविदा सुचना क्रमांक ४३ सन २०२५-२६ (ऑनलाईन)**
**'' बी-१'' निविदा''**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर-४१३००३ निविदा पत्रात नमुद केलेले पात्रतेचे निकष पूर्ण करीत व सा.बां. विभगाकडून नोंदणीकृत असलेल्या कंत्राटदार यांचेकडून खालील कामा करिता ''बी-१'' नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहोत. निविदा कागदोपत्र शासनाच्या संकेतस्थळावर : http://mahatenders.gov.in येवून डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर, ४१३००३ यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्रं. | कामाचे नाव | निविदेचा प्रकार | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम | ठेकेदाराचा अधीकृत वर्ग |
|---|---|---|---|---|
| १ | केंद्रीय मार्ग निधी अंतर्गतः मंद्रुप निंबर्गी भंडारकवठे रस्ता प्र.जि.मा.६ कि.मी.०/०० ते ८/५५० मध्ये सुधारणा करणे. ता. दक्षिण सोलापूर. जि. सोलापूर | बी-१ निविदा | ७,७२,६७,३८८/- | सार्वजनिक बांधकाम विभागा कडील नोंदणी अनिवार्य नाही |
| २ | केंद्रीय मार्ग निधी अंतर्गतः रा.मा.-५२ ते कुरघोट माळकवठे निंबर्गी विचूर कुसूर रस्ता प्र.जि.मा.६१ कि.मी.०/०० ते ०/७०० आणि कि.मी. ४/०० ते ८/०० मध्ये सुधारणा करणे, ता. दक्षिण सोलापूर. जि. सोलापूर | बी-१ निविदा | ४,७५,०४,४८२/- | सार्वजनिक बांधकाम विभागा कडील नोंदणी अनिवार्य नाही |

| | | |
|---|---|---|
| ई-निविदा उपलब्ध कालावधी | :- | दि. १७/०२/२०२६ (वेळ सकाळी १०.०० वा. पासून) ते २४/०२/२०२६ (सायं.१८.१५ पर्यंत) |
| निविदा पूर्व बैठक | :- | निविदा पूर्व बैठक २०/०२/२०२६ मा. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नविन मध्यवर्ती इमारत पुणे-१ यांचे कार्यालयात १२.३० वा. सदर निविदा पूर्व बैठक (online via link generated). व्दारे होणार आहे. |
| तांत्रिक व आर्थिक निविदा सादर करणेचा अखेरचा दिनांक | :- | दि. २४/०२/२०२६ (सायं.१८.१५ पर्यंत) |
| मूळ दस्तऐवज सादर करण्याचा अंतिम दिनांक (निविदा शर्त ८.१) | :- | ई-निविदा पोर्टलवर '**बीड लॉक**' झाल्यानंतर ७२ तासात '**हार्ड कॉपी**' १ प्रतीत कंत्राटदारांनी खालील कार्यालयामध्ये सादर करणे अनिवार्य आहे. १. मा. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर |
| निविदा उघडण्याचा कालावधी ठिकाण व वेळ | :- | २५/०२/२०२६ मा. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सोलापूर यांचे कार्यालयात सकाळी ११.०० वाजता. |

निविदा सुचनाबाबतची सविस्तर माहिती खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
१) www.mahapwd.gov.in २) www.mahatenders.gov.in
(सदर निविदेसुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
३) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर ४१३००३ कार्यालयात सुचना फलक

**सही/-**
**(मनोज रा. ठाकरे)**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर**

डीजीआयपीआर/आरओसी-२०२५-२६/क्र. ५/सी ५९०३

अुत्तम सेवा
मंगळवार
दि. १७ फेब्रुवारी २०२६

## नोकरीच्या शोधात

**उमेदवारांसाठी अत्यंत महत्त्वाची सूचना- खालील विविध स्पर्धा परीक्षांचे फॉर्म योग्य त्या विहीत नमुन्यात नसल्यास रद्द होऊ शकतात. तरी हे टाळण्यासाठी नोकरीविषयक स्पर्धा परीक्षा फॉर्म विक्रीचे सोलापुरातील एकमेव, अचूक फॉर्म विक्री केंद्र, अुत्तम सेवा, पार्क चौक, सोलापूर येथूनच फॉर्म खरेदी करावेत व संभाव्य नुकसान टाळावे.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| १) | इंडियन आर्मी, (सैन्य भरती मेळावा - सोलापूर) | | | |
| १ | अग्निवीर GD | दहावी (४५%) गुणांसह उत्तीर्ण असावे | २२ पर्यंत | ०१/०४/२६ |
| २ | अग्निवीर ट्रेड्समन | दहावी उत्तीर्ण असावे | २२ पर्यंत | |
| ३ | अग्निवीर क्लार्क | बारावी (६०%) गुणासह उत्तीर्ण असावे | २२ पर्यंत | |
| ४ | अग्निवीर टेक्निकल | बारावी (६०%) गुणासह उत्तीर्ण असावे | २२ पर्यंत | |
| २) | रिझर्व बँक ऑफ इंडिया, RBI | | | |
| १ | असिस्टंट (६५० पदे) | पदवी (५०%) गुणासह उत्तीर्ण असावे | २८ पर्यंत | ०८/०३/२६ |

**✻ मोफत सरकारी अपडेट ✻**
**सर्व सरकारी नोकरींचे व स्पर्धा परिक्षांचे अपडेट आपल्या व्हॉटस्‌अॅपवर मोफत मिळविण्याकरिता ९७६३७४१९९१ या नंबरला ''जॉईन'' असा मेसेज व्हॉटस्‌अॅप करावा.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| ३) | केंद्रीय लोकसेवा आयोग, UPSC | | | |
| १ | नागरी सेवा पूर्व परिक्षा-२०२६ (९३३ पदे) (IAS/IPS) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | ३२ पर्यंत | २४/०२/२६ |
| २ | भारतीय वनसेवा पूर्व परिक्षा -२०२६ (८० पदे) | पदवी (कृषी/वन/गणित/बॉटनी/ केमिस्ट्री/फिजिक्स) उत्तीर्ण असावे | ३२ पर्यंत | |
| ४) | पंजाब नॅशनल बँक, PNB | | | |
| १ | ॲप्रेंटिस (५१३८ पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | २८ पर्यंत | २४/०२/२६ |

सुवर्णसंधी - १) वार्षिक वर्गणी भरल्यास वर्षभर नोकरीविषयक फॉर्म घरपोच मिळतील.
२) नोकरीविषयक फॉर्म संबंधित कार्यालयास सत्वर पोहोच केले जातील. (कुरिअर सर्व्हिस)
३) खाजगी नोकरी (प्रायव्हेट प्लेसमेंट)साठी नाव नोंदणी करा. ४) नोकरीविषयक साप्ताहिकाचे सभासद व्हा.

वरीलपैकी कोणत्याही फॉर्मसाठी वा अचूक माहितीसाठी भेटा वा रु. ५०/- ची मनिऑर्डर करा. MPSC, RRB, BSRB, SET, NET, IAS / IPS, NDA, CDS, LIC, KVS नवोदय, कोर्ट, निवड मंडळ, स्टाफ सिलेक्शन, इंजिनिअरिंग, पोलीस भरती, तलाठी, रेल्वे या स्पर्धा परीक्षांची अद्ययावत पुस्तके फक्त आमच्याकडेच मिळतील.

अुत्तम सेवा
१) २२, डॉ. कोटणीस शॉपिंग सेंटर, सिद्धेश्वर मंदिराजवळ, पार्क चौक, सोलापूर. वेळ स. १० ते सायं ७, फोन नंबर - ९७६३७४१९९१.
www.uttamseva.org

रिझर्व बँक ला.नं.-यु.बी.डी.महाराष्ट्र/१३८४ पी दि. ३ मार्च १९९७
**Neelkanth Co-op. Bank Ltd.**
42-B/3, Samrat Chowk, Budhwar Peth, Solapur-413002.
C.E.O. - 2621454/55, Phone Office : 2728105, 2725011
**नीलकंठ को. ऑप-बँक लि., सोलापूर.**
४२ बी/३, सम्राट चौक, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२.
Email ID - ceo@neelkanthbank.com

### जाहीर लिलाव नोटीस व विक्री सुचना

ज्या अर्थी बँकेने आपल्या प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या माध्यमाद्वारे सिक्युरिटायझेशन अॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेटस् ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट २००२ चे कलम १३(१२) व सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम क्रमांक ८ व ९ मधील तरतुदीस अनुसरुन प्राप्त झालेल्या अधिकारानुसार तमाम लोकांना कळविण्यात येते की, नीलकंठ को-ऑप. बँक लि., सोलापूर शाखा मुख्य येथील खालील थकबाकीदार यांचेकडून बँकेस येणे असलेल्या कर्ज खात्याचे वसुलीपोटी खालील वर्णनाची बँकेने ताब्यात घेतलेल्या स्थावर मिळकतीच्या विक्रीसाठी जाहीर लिलाव करण्यात येत असून, लिलावात भाग घेऊ इच्छुकांनी खालील नमूद दिनांकास बँकेच्या प्रधान कार्यालय, सम्राट चौक, सोलापूर येथे हजर रहावे.

| क्र. | कर्जदाराचे नाव | कर्जखाते क्र. | एकूण येणेबाकी दि. ३१/०१/२०२६ अखेर | बँकेस तारण असलेल्या मालमत्तेचे वर्णन | लिलावाचे ठिकाण | लिलावाची तारीख व वेळ | तारण मालमत्तेची राखीव किंमत | विक्रीमध्ये भाग घेणेसाठी भरावयाची बयाणा रक्कम | मालमत्ता पाहणी तारीख व वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मिनाक्षी कांतीलाल तोडकरमाळी | २/६०१/६८४ | रु. ४१,७३,६७३/- | डि. व सब डि सोलापूर तालुका उत्तर सोलापूर सो.म.पा. हद्दीतील पूर्व मंगळवार पेठ, सि.स.नं. ३५१६/सी/१/ए/१ एकूण क्षेत्र ४६२.८९ चौ.मी. यापैकी पश्चिमेकडील क्षेत्र २९५.६१ चौ.मी. ''शिवरत्न गोल्ड प्लेस'' ऑफिस नं. ८ पहिला मजला, कारपेट क्षेत्र ९.७८ चौ.मी. बिल्टअप क्षेत्र ११.२५ चौ.मी. जागा याची चतुःसिमा - पूर्वेस- पॅसेज, पश्चिमेस- रस्ता, दक्षिणेस- ऑफिस ७, उत्तरेस- ऑफिस नं. ९ | नीलकंठ को-ऑप. बँक लि., सोलापूर प्रधान कार्यालय, सोलापूर | दि. २३/०३/२०२६ सकाळी ११.०० वा. | रु. ८,४९,३७५/- | रु. ४३,०००/- | दि. २०/०३/२०२६ सकाळी ११ ते दु. ४ |
| २ | मैनोद्दीन मोमीन अली शेख | २/६०१/६५२ | रु. ३१,४३,४३८/- | डि. व सब डि सोलापूर तालुका उत्तर सोलापूर सो.म.पा. हद्दीतील पूर्व मंगळवार पेठ, सि.स.नं. ३५१६/सी/१/ए/१ एकूण क्षेत्र ४६२.८९ चौ.मी. यापैकी पश्चिमेकडील क्षेत्र २९५.६१ चौ.मी. ''शिवरत्न गोल्ड प्लेस'' ऑफिस नं. ४ पहिला मजला, कारपेट क्षेत्र ८.७५ चौ.मी. बिल्टअप क्षेत्र १०.१६ चौ.मी. जागा याची चतुःसिमा - पूर्वेस- सी.स.नं. ३५१६/सी/१/ए/१/बी, पश्चिमेस- पॅसेज, दक्षिणेस- ऑफिस नं. ५, उत्तरेस- ऑफिस नं. ३ | नीलकंठ को-ऑप. बँक लि., सोलापूर प्रधान कार्यालय, सोलापूर | दि. २३/०३/२०२६ सकाळी ११.३० वा. | रु. ७,७३,२००/- | रु. ३९,०००/- | दि. २०/०३/२०२६ सकाळी ११ ते दु. ४ |

**अटी व शर्ती -** १) सदर मालमत्ता ''जशी व जेथे असेल तशी'' आणि ''जे आहे ते आणि जे काही आहे ते'' आणि ''ज्ञात व अज्ञात बोजासह'' या तत्वावर लिलाव करणेत येईल. २) लिलाव तारखेपूर्वी कर्जदाराने संपूर्ण व्याजासह रक्कम भरल्यास लिलाव रद्द करणेत येईल. ३) लिलावात सहभागी होण्यासाठी वर नमूद बयाणा रक्कम लिलावापूर्वी बँकेत जमा करावी लागेल. ४) यशस्वी खरेदीदार म्हणून जाहीर झालेल्या व्यक्तीस तसे जाहीर झाल्याबरोबर विक्री किंमतीच्या २५ टक्के रक्कम रोख, डीडी, पे-ऑर्डर, किंवा RTGS/NEFT द्वारे लेगच जमा करावी लागेल व उर्वरित ७५% रक्कम बँकेद्वारे विक्रीची निश्चिती मिळाल्याच्या तारखेपासून १५ दिवसात किंवा बँकेने दिलेल्या मुदतीच्या तारखेच्या आत भरावी लागेल. ५) लिलावाच्या उर्वरित अटी व शर्ती लिलावाच्या वेळी वाचून दाखविण्यात येतील.

**ठिकाण - सोलापूर**
**दिनांक - १७/०२/२०२६**

**प्राधिकृत अधिकारी**
नीलकंठ को-ऑप. बँक लि., सोलापूर

श्री स्वामी समर्थ ॲडस्

टी-२० विश्वचषकाचा थरार



# इटलीला नमवून इंग्लंडचा सुपर-८ मध्ये प्रवेश

## टी-२० विश्वचषक: विल जॅक्सचा झंझावात आणि ओव्हरटनची फिरकी

**कोलकता, दि. १६ फेब्रुवारी-**

गतविजेत्या इंग्लंडने टी-२० विश्वचषकाच्या साखळी फेरीत इटलीवर २४ धावांनी विजय मिळवत सुपर-८ फेरीतील आपले स्थान निश्चित केले आहे. मात्र, ईडन गार्डन्सवर झालेला हा विजय इंग्लंडसाठी म्हणावा तितका सोपा नव्हता. शेवटच्या षटकापर्यंत रंगलेल्या या सामन्यात इटलीच्या संघाने इंग्लंडच्या नाकी नऊ आणले होते. विल जॅक्सची ऐतिहासिक फटकेबाजी आणि जेमी ओव्हरटनची अचूक गोलंदाजी यांच्या जोरावर हॅरी ब्रूकच्या नेतृत्वाखालील इंग्लंड संघाने हा अडथळा पार केला.

**इंग्लंडची अडखळती सुरुवात आणि जॅक्सचे वादळ**

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेणाऱ्या इंग्लंडची सुरुवात अत्यंत खराब झाली. सलामीवीर जोस बटलर अवघ्या ३ धावांवर बाद झाला, तर ठराविक अंतराने विकेट्स पडत गेल्यामुळे १०.३ षटकांत इंग्लंडची अवस्था ४ बाद ९२ अशी झाली होती. टॉम बँटन (३०) आणि फिल सॉल्ट (२८) यांनी डाव सावरण्याचा प्रयत्न केला, पण इटलीच्या शिस्तबद्ध गोलंदाजीसमोर इंग्लंडचे वरच्या फळीतील फलंदाज पुन्हा एकदा अपयशी ठरले.जेव्हा इंग्लंड ५ बाद १०५ अशा बिकट अवस्थेत होता,

**इंग्लंडसाठी सर्वात वेगवान अर्धशतक**

सातव्या क्रमांकावर विल जॅक्स मैदानावर आला. जॅक्सने इटालियन गोलंदाजांवर प्रतिहल्ला चढवत अवघ्या २२ चेंडूत नाबाद ५३ धावा कुटल्या. हे इंग्लंडसाठी टी-२० विश्वचषकातील सर्वात वेगवान अर्धशतक ठरले. जॅक्सला सॅम करन (२५) आणि जेमी ओव्हरटन (१५) यांनी मोलाची साथ दिली. या त्रिकुटाने शेवटच्या ५ षटकांत तब्बल ७८ धावा वसूल केल्या, ज्यामुळे इंग्लंडला २० षटकांत ७ बाद २०२ या आव्हानात्मक धावसंख्येपर्यंत पोहोचता आले.

**इटलीचा थरारक पाठलाग: ऑस्ट्रेलिया-पुत्र चमकले**

२०३ धावांच्या विशाल लक्ष्याचा पाठलाग करताना इटलीची अवस्था पहिल्याच षटकात २ बाद १ धाव अशी झाली होती. जोफ्रा आर्चरने आपल्या पहिल्याच षटकात दोन धक्के दिले. मात्र, येथूनच खऱ्या अर्थाने सामन्यात नाट्यमय वळण आले. इटलीच्या संघात असलेल्या ऑस्ट्रेलियन वंशाच्या खेळाडूंनी इंग्लंडच्या गोलंदाजांना घाम फोडला. बेन मानेंटी आणि जस्टिन मोस्का यांनी चौथ्या विकेटसाठी ९२ धावांची भागीदारी करून इंग्लंडच्या गोटात घबराट निर्माण केली.बेन मानेंटीने २५ चेंडूत ६० धावांची तुफानी खेळी केली, ज्यात त्याने ६ गगनभेदी षटकार ठोकले. मानेंटी बाद झाल्यानंतर ग्रँट स्टुअर्टने मोर्चा सांभाळला. स्टुअर्टने आदिल रशीदच्या एकाच षटकात सलग दोन षटकार खेचत २१ धावा वसूल केल्या आणि सामन्यात पुन्हा एकदा जिवंतपणा आणला. स्टुअर्ट आणि मानेंटी या जोडीने मिळून तब्बल ११ षटकार खेचले, ज्यामुळे एकवेळ इटली हा चमत्कार घडवणार असे वाटत होते.

**शेवटची दोन षटके आणि इंग्लंडचा सुटकेचा निश्वास**

सामन्याच्या शेवटच्या दोन षटकांत इटलीला विजयासाठी ३० धावांची गरज होती आणि ग्रँट स्टुअर्ट खेळपट्टीवर होता. मात्र, मोक्याच्या क्षणी सॅम करनने अनुभवाचा वापर करत स्टुअर्टला (४५ धावा) बाद केले आणि इटलीच्या उरल्यासुरल्या आशा संपुष्टात आल्या. शेवटच्या षटकात जेमी ओव्हरटनने दोन बळी घेत इटलीचा डाव १७८ धावांवर रोखला. ओव्हरटनने ४ षटकांत केवळ १८ धावा देत ३ बळी घेण्याची महत्त्वपूर्ण कामगिरी केली.

**सुपर-८ साठी आव्हान कायम**

हा विजय इंग्लंडसाठी सुपर-८ चे तिकीट देणारा ठरला असला तरी, त्यांच्या चिंतेत भर टाकणाराही आहे. नेपाळविरुद्धचा ४ धावांचा निसटता विजय आणि आता इटलीविरुद्ध झालेली ओढाताण, यामुळे इंग्लंडचा संघ मोठ्या संघांसमोर टिकणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. हॅरी ब्रूकच्या नेतृत्वाखालील इंग्लंड संघाने हा अडथळा पार केला. विल जॅक्सची ऐतिहासिक फटकेबाजी हॅरी ब्रूकच्या संघाला जर तिसऱ्यांदा विश्वविजेतेपद पटकावायचे असेल, तर त्यांना आपल्या फलंदाजीतील सातत्य आणि मधल्या फळीतील त्रुटी दूर कराव्या लागतील.आता इंग्लंडचा संघ दुसऱ्या फेरीसाठी श्रीलंकेला रवाना होईल. साखळी फेरीत असोसिएट संघांनी दिलेली झुंज इंग्लंडसाठी धोक्याची घंटा असून, आगामी सामन्यांमध्ये त्यांना अधिक ताकदीने उतरावे लागणार आहे.

## महत्वाचे...



### पंचाक्षरी लोणार नगराध्यक्ष श्रीचा उपविजेता

**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

सांगली जिल्ह्यातील कडेगांव ठिकाणी लाईक फिटनेसतर्फे नगराध्यक्ष श्री या पश्चिम महाराष्ट्र स्तरीय स्पर्धेत कोल्हापूरचा अजिंक्य रेडेकर विजेता तर सोलापूरचा पंचाक्षरी लोणार उपविजेता ठरला. लोणार येथील इलिजियम क्लबचा खेळाडू आहे. सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर व रत्नागिरी या जिल्ह्यातील १०३ स्पर्धकांनी स्पर्धेत सहभाग नोंदविला. यात येथील युनूस शेख ने ७० किलो गटात द्वितीय क्रमांक प्राप्त केला. युनूस हा मॅकझिमम जिमचा खेळाडू आहे. त्यांचे सोलापूर जिल्हा बॉडी बिल्डिंग अँड फिटनेस फेडरेशन अध्यक्ष संतोष पवार व सरचिटणीस विशाल गायकवाड यांनी अभिनंदन केले.



### 'युनायटेड'तर्फे खेळाडूंना स्पोर्ट्स जर्सी वाटप

**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

येथील युनायटेड क्रिकेट क्लबने बारा वर्षाखालील मुलांचे मास्टर क्रिकेट स्पर्धेमध्ये उपविजेतेपद मिळवले. तसेच १९ वर्षाखालील मुलांनी पै. नजीर शेख (पैलवान) चषक स्पर्धेत विजेचे पद मिळवले आहे. यासाठी युनायटेड क्रिकेट क्लबचे ज्येष्ठ खेळाडू विक्रांत पवार यांनी मुलांचे कौतुक करण्यासाठी मुलांना स्पोर्ट्स जर्सी त्यांच्यातर्फे दिली आहे. ज्येष्ठ क्रिकेटपटू के.टी. पवार यांच्या हस्ते ही जर्सी देण्यात आली. यावेळी क्लबचे उपाध्यक्ष चंद्रकांत रेंबरसो, जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे खजिनदार संतोष बडवे, युनायटेड क्रिकेट क्लबचे सचिव सुनील मालप, युनायटेड क्रिकेट क्लबचे प्रशिक्षक चंद्रकांत लोखंडे व खेळाडूचे पालक सुनील शिंदे हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विक्रांत पवार यांनी केले. सोलापूर येथील इंदिरा गांधी स्टेडियम येथे युनायटेड क्रिकेट क्लबचा नियमित सराव सकाळी व दुपारी दोन वेळेस सुरू असून सकाळच्या सत्रात संजय मोरे व दुपारच्या सत्रात चंद्रकांत लोखंडे हे सराव घेत असतात. उन्हाळी प्रशिक्षण शिबिर १ एप्रिल २०२६ पासून सुरू होणार आहे.



### शरीरसौष्ठव स्पर्धेत शिवाजी महाविद्यालयाचा योगेश जाधव प्रथम

**बार्शी, दि. १६ फेब्रुवारी-**

सोलापूर येथील छत्रपती शिवाजी रात्र महाविद्यालयात झालेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ आंतर महाविद्यालयीन शरीरसौष्ठव स्पर्धेमध्ये शिवाजी महाविद्यालय बार्शीच्या योगेश जाधव यांनी ६० किलो वजन गटात प्रथम क्रमांक पटकाविला. त्यास शारीरिक शिक्षण संचालक डॉ. हरिदास बारसकर, डॉ. विजयानंद निंबाळकर, डॉ. रामहरी नागटिळक, प्रा. संजय पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, सचिव पी.टी. पाटील, सहसचिव अरुण देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे, कार्यकारिणी सदस्य, प्राचार्य डॉ.ए.बी. शेख, प्रमोद जाधव, संतोष कवडे आदींनी अभिनंदन केले.





## श्री कृष्ण स्पोर्टस्, स्वामी विवेकानंद प्रशालेस विजेतेपद

### शिवजन्मोत्सव महामंडळाच्या कबड्डी आणि खो-खो स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने शिवजयंती उत्सवाचे निमित्त आयोजित केलेल्या कबड्डी स्पर्धेत श्री. कृष्ण स्पोर्टस् व खो-खो स्पर्धेत स्वामी विवेकानंद प्रशालेने विजेतेपद पटकाविले.

शिंदे चौकातील डाळिंबी आड मैदानावर झालेल्या या स्पर्धेत कबड्डीच्या अंतिम सामन्यात श्रीकृष्ण संघाने स्वराज्य स्पोर्टस्चा पराभव केला. दोन्ही संघाचे समान गुण झाल्याने प्रत्येकी पाच चढाईवर श्रीकृष्णने बाजी मारली. खोखोच्या अंतिम सामन्यात स्वामी विवेकानंद प्रशालेने दमाणी प्रशालेचा एका गुणाने पराभव केला. तृतीय स्थानासाठी झालेल्या सामन्यात शरदचंद्र पवार हायस्कूलने शरदचंद्र पवार प्राथमिक शाळेवर दोन मिनिटे राखून विजय मिळविला. कबड्डी स्पर्धेत एमजी स्पोर्ट्स, विघ्नहर्ता स्पोर्ट्स, सुभाष तरुण मंडळ, अंजुमन क्रीडा मंडळ, स्वराज्य स्पोर्ट्स क्लब, ईगल स्पोर्ट्स क्लब, एकता स्पोर्ट्स क्लब, कृष्णा स्पोर्ट्स क्लब, जय भवानी स्पोर्ट्स क्लब, श्रीराम स्पोर्ट्स क्लब, माता स्वरूप राणे स्पोर्ट्स क्लब आदी संघांनी दमदार खेळ सादर केला. खो-खो स्पर्धेत शरदचंद्र पवार प्रशाला, दमाणी प्रशाला, व्हॅलेन्टाईन स्कूल, भारती विद्यालय, स्वामी विवेकानंद विद्यालय, राज मेमोरियल, विष्णुपंत कोठे स्कूल, तसेच ज्ञान ज्योती प्राथमिक प्रशाला यांचा समावेश होता.

स्पर्धेचे उद्घाटन भाजपच्या शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विद्यापीठाचे सहाय्यक कुलसचिव सोमनाथ सोनकांबळे, निवृत्त तालुका क्रीडाधिकारी सत्येन जाधव, खो- खो असोसिएशनचे सचिव उमाकांत गायकवाड, खजिनदार श्रीरंग बनसोडे, पंच मंडळ सदस्य अजित शिंदे, तांत्रिक समिती सचिव शिवशंकर राठोड, कबड्डी असोसिएशनचे सहसचिव जयंत मोरे, भक्तराज जाधव, स्वाती पुंजाल आदी उपस्थित होते. कबड्डी स्पर्धेसाठी पंच म्हणून विनोद जाधव, संतोष जाधव, योगेश माने, सुवर्णा कांबळे, समीर विजापुरे यांनी तर खो-खो स्पर्धेसाठी जुबेर शेख, अक्षय पवार, समर्थ मेगे यांनी काम पाहिले.

पारितोषिके पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य राजाभाऊ सरवदे यांच्या हस्ते देण्यात आली. यावेळी शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाचे प्रशांत पाटील, दत्ता मुळे, हरीदास जाधव, बाळासाहेब वाघमारे, देवा उघडे, समाधान हावळे, पिंटू डावरे, नाना काळे, जयंवत सलगर, श्रीकांत घाडगे, अजित गायकवाड,राजाभाऊ काकडे उपस्थित होते. सामने यशस्वी करण्यासाठी कबड्डी आणि खो-खो असोसिएशन आणि सचिन स्वामी व देविदास घुले यांनी परिश्रम घेतले.

## पश्चिम महाराष्ट्र शरीरसौष्ठव स्पर्धा गुरुवारी पंढरपुरात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

महर्षी वाल्मिकी संघ आयोजित छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्तआदय क्रांतिकारक ''राघोजी भांगरे श्री २०२६'' पश्चिम महाराष्ट्र स्तरीय शरीरसौष्ठव स्पर्धा पंढरपूर येथे १९ फेब्रुवारी रोजी वाजता होईल.

या स्पर्धा पै. यश अंकुशराव यांच्या पुढाकाराने शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते डॉ. संजय मोरे सर, सोलापूर जिल्हा शरीर सौष्ठव संघटना अध्यक्ष राजकुमार सूरवसे यांच्या मार्गदर्शनाखाली व सोलापूर जिल्हा शरीरसौष्ठव संघटना यांच्या सहकार्याने आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धा ६ वजनी गटात घेण्यात येणार आहेत. प्रत्येक वजनी गटात ५ बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. प्रत्येक विजयी खेळाडूंना रोख बक्षीस, सन्मान चिन्हे, व सन्मान पत्र देवून गौरविण्यात येणार आहे. स्पर्धेत भाग घेणाऱ्या प्रत्येक स्पर्धकाला सन्मान चिन्हे, सन्मानपत्र व एका बाजूचा एस टी प्रवास खर्च देण्यात येणार आहे.. नोंदणीसाठी प्रमोद काटे ( ९४२२३८००३३), गणेश साळुंखे (९०२८८४२०००) अथवा नजीर शेख (९३२५२३८६१८) यांच्याशी संपर्क साधावा.

## आज भारत आणि नेपाळ महिला संघांत मुकाबला

**बँकॉक, दि. १६ फेब्रुवारी-**

बँकॉक येथे सुरू असलेल्या विमेन्स एशिया कप रायझिंग स्टार्स स्पर्धेत उद्या, १७ फेब्रुवारी रोजी अ गटातील नवव्या साखळी सामन्यात भारत अ महिला संघ आणि नेपाळ महिला संघ एकमेकांशी भिडणार आहेत. भारतीय प्रमाणवेळेनुसार सकाळी ८:०० वाजता या सामन्याला सुरुवात होईल.

भारत अ संघ या स्पर्धेत प्रबळ दावेदार मानला जात आहे. आपल्या युवा आणि आक्रमक खेळाडूंच्या जोरावर भारतीय संघ गुणतालिकेत अव्वल स्थान राखण्यासाठी मैदानात उतरेल. दुसरीकडे, नेपाळच्या महिला संघासाठी हा सामना मोठ्या आव्हानासोबतच आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी असेल. नेपाळने गेल्या काही काळातील आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये चांगली प्रगती केली असून, भारताच्या तगड्या संघाला रोखण्यासाठी त्यांना सर्वस्व पणाला लावावे लागेल.

या स्पर्धेतील साखळी फेरीचे सामने अंतिम टप्प्यात पोहोचत असल्याने, दोन्ही संघांसाठी हा विजय उपांत्य फेरीच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरणार आहे.

## सोनाक्षी माडे सलग १२ तास दांडपट्टा फिरवून करणार विश्वविक्रम

**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**



स्वातंत्र्यसैनिक सिद्रामप्पा फुलारी प्रतिष्ठान व रुद्रशक्ती गुरुकुल मर्दानी प्रशिक्षण केंद्रतर्फे येथील १५ वर्षीय सोनाक्षी माडे हिने १९ फेब्रुवारी रोजी सलग १२ तास दांडपट्टा फिरवून विश्वविक्रम करणार आहे, अशी माहिती तुकाराम भुसारे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सोनाली ही जुना विडी घरकुल येथील संभाजीराव शिंदे विद्या मंदिरची इयत्ता नववीची विद्यार्थिनी आहे. ती सुशील रसिक सभागृह, मुरारजी पेठ येथे हा 'दांडपट्टा' या साहसी शस्त्राच्या जोरावर विश्वविक्रमाला गवसणी घालणार आहे. सकाळी ६ वाजता प्रारंभ होऊन सायंकाळी ६:१५ वाजता सांगता होणार आहे. शिवजयंतीचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या या मोहिमेत सोनाक्षी सलग १२ तास, १२ मिनिटे आणि १२ सेकंद दांडपट्टा फिरवणार आहे.

सोनाक्षी गेल्या अनेक महिन्यांपासून या विक्रमासाठी कठोर सराव करत आहे. तिच्या या साहसाला प्रोत्साहन देण्यासाठी सोलापूरकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन रुद्रशक्ती गुरुकुल मर्दानी प्रशिक्षण केंद्राने केले आहे. या पत्रकार परिषदेला सोनाक्षी माडे, सतीश मल्लाव, संगीता फुलारी, विवेक मिस्किन आदी उपस्थित होते.



## दमाणी अंधशाळेतर्फे राजीव देसाई यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

रोटरी क्लब सोलापूर संचलित दमाणी अंधशाळेच्या वतीने शुभम हॉस्पिटेलिटी येथे गंगा कदम हिच्या सत्काराप्रित्यर्थ आयोजित कार्यक्रमात जामश्री रिअल्टी लिमिटेड व्यवस्थापकीय संचालक राजेश दमाणी यांच्या हस्ते जामश्री क्रिकेट अकादमीचे तत्कालीन व्यवस्थापक राजीव देसाई यांचा सुरवातीच्या काळात क्रिकेटपटू गंगाला क्रिकेट खेळण्याकरिता प्रशिक्षणाची सोय करून दिल्याबद्दल प्रेमरतनजी दमाणी, बिमलादेवी दमाणी यांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला.

गंगा हिने भारताच्या अंध महिला क्रिकेट संघाच्या उपकर्णधार म्हणून प्रतिनिधित्व केले आहे. या संघाने २०२५ मध्ये श्रीलंकेतील कोलंबो येथे झालेल्या २० विश्वचषक स्पर्धेत विजय मिळवला होता. या प्रसंगी संतोष भंडारी, सिद्धेश्वर वाले, अनिल सांब्राणी, संतोष सपकाळ, राजगोपाल झंवर, प्रकाश दर्शनाळे, क्षितिजा गाताडे, वनिता भोसले आदी उपस्थित होते.

## ओमरझाईचा अष्टपैलू धमाका; अफगाणिस्तानचा थरारक विजय

**नवी दिल्ली, दि. १६ फेब्रुवारी-**



टी-२० विश्वचषक २०२६ च्या २८ व्या साखळी सामन्यात अफगाणिस्तानने संयुक्त अरब अमिरातीवर ५ गडी राखून मात करत स्पर्धेत आपली आगेकूच कायम ठेवली आहे. अरुण जेटली स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात अजमतुल्लाह ओमरझाई अफगाणिस्तानसाठी संकटमोचक ठरला. त्याने प्रथम चेंडूने ४ बळी घेत अमिरातीला रोखले आणि नंतर फलंदाजीत नाबाद ४० धावांची खेळी करत अफगाणिस्तानला विजयाचा उंबरठा ओलांडून दिला. या विजयामुळे अफगाणिस्तानने गुणतालिकेत आपली स्थिती मजबूत केली आहे. अजमतुल्लाह ओमरझाईच्या अष्टपैलू कामगिरीमुळे अफगाणिस्तानला आगामी सामन्यांसाठी मोठे बळ मिळाले आहे.

**ओमरझाईचा भेदक मारा; अमिरातीची झुंज**

नाणेफेक हारल्यानंतर प्रथम फलंदाजीसाठी उतरलेल्या यूएईची सुरुवात अत्यंत खराब झाली. डावाच्या पहिल्याच षटकात ओमरझाईने आर्यन शर्माला शून्यावर बाद करून धक्का दिला. पाठोपाठ मुजीब उर रहमानने कर्णधार मोहम्मद वसीमचा (१०) अडथळा दूर केला. १३ धावांत २ गडी गमावल्यानंतर अमिरातीचा संघ अडचणीत सापडला होता. मात्र, सोहेब खान आणि अलिशान शराफु यांनी तिसऱ्या विकेटसाठी ८४ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी करून डाव सावरला. शराफुने ३१ चेंडूत ४० धावांचे योगदान दिले. सोहेब खानने एकाकी झुंज देत ४८ चेंडूत ६८ धावांची उत्कृष्ट खेळी केली, ज्यामध्ये त्याने ७ चौकार आणि ४ षटकार ठोकले. मात्र, पुन्हा एकदा अजमतुल्लाह ओमरझाई गोलंदाजीला आला आणि त्याने मध्यफळीतील फलंदाजांना खेळपट्टीवर टिकू दिले नाही. ओमरझाईने ४ षटकांत केवळ १५ धावा देत ४ महत्त्वाचे बळी घेतले. मुजीबने २, तर रशिद खानने १ बळी मिळवला. यामुळे अमिरातीचा संघ २० षटकांत ९ बाद १६० धावांपर्यंत मजल मारू शकला.

**अफगाणिस्तानचा पाठलाग: इब्राहिम झाद्रान आणि ओमरझाईची फटकेबाजी**

१६१ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना अफगाणिस्तानची सुरुवातही हादरवणारी ठरली. स्टार फलंदाज रहमानुल्लाह गुरबाज डावाच्या दुसऱ्याच चेंडूवर खाते न उघडता बाद झाला. त्यानंतर इब्राहिम झाद्रान आणि गुलबदिन नाइब यांनी सावध फलंदाजी केली. नाइब (१३) आणि सेदिकुल्लाह अटल (१६) स्वस्तात बाद झाल्यामुळे अफगाणिस्तानवर दडपण वाढले होते.

अनुभवी इब्राहिम झाद्रानने मात्र एक बाजू लावून धरली आणि ४१ चेंडूत ५३ धावांची संयमी खेळी केली. त्याला दरविश रसुलीने २३ चेंडूत ३३ धावा करून चांगली साथ दिली.

रसुली बाद झाल्यानंतर सामन्यात पुन्हा एकदा रंगत आली होती. शेवटच्या काही षटकांत विजयासाठी वेगाने धावांची गरज असताना अजमतुल्लाह ओमरझाईने पुन्हा आपली जादू दाखवली.



त्याने अवघ्या २१ चेंडूत ३ चौकार आणि २ षटकारांच्या मदतीने ४० धावांची खेळी केली. नबीने त्याला साथ दिली आणि अफगाणिस्तानने ४ चेंडू राखून १६२ धावांचे लक्ष्य गाठले.

**अमिरातीची गोलंदाजी अपुरी पडली**

अमिरातीने आपल्या गोलंदाजीने अफगाणिस्तानला शेवटपर्यंत झुंजवले. मोहम्मद अरफानने ४ षटकांत ३० धावा देत २ बळी घेतले, तर जुनैद सिद्दीकीने २३ धावांच्या मोबदल्यात २ फलंदाजांना तंबूत धाडले. मात्र, मोक्याच्या क्षणी ओमरझाईची आक्रमक फलंदाजी रोखण्यात त्यांना अपयश आले, ज्यामुळे त्यांना पराभवाचा सामना करावा लागला.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# संत नामदेव स्मारकाचे भूमिपूजन लवकरच

## ॲड. महेश ढवळे; अधिकारी, आर्किटेक्ट, नामदास महाराज व शिंपी समाज बांधवांनी केली जागेची पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १६ फेब्रुवारी-**

पंढरपूर येथील ६५ एकर परिसरात उभारण्यात येणाऱ्या संत नामदेवांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकासाठी प्रशासकीय हालचाली गतीमान झाल्या असून येत्या दोन महिन्यात स्मारक उभारणीचे भूमीपूजन करण्यात येणार असल्याची माहिती अ.भा. संत नामदेव क्षत्रिय एकसंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. महेश ढवळे यांनी दिली.

गुरुवार दि. १२ फेब्रुवारी शासकीय अधिकारी, आर्किटेक्ट यांच्यासह जागेची पाहणी करण्यात आली. यावेळी प्रांताधिकारी सचिन इथापे, तहसीलदार सचिन लंगुटे, श्री संत नामदेवांचे वंशज ह.भ.प. माधव महाराज, मुकुंद महाराज, एकनाथ महाराज, भावार्थ महाराज, अ.भा.संत नामदेव क्षत्रिय एकसंघ, नामदेव समाजोन्नती परिषदचे पदाधिकारी व शिंपी समाज बांधव उपस्थित होते. ॲड. ढवळे म्हणाले, पंढरपूर येथे हे आंतरराष्ट्रीय स्मारक उभारणीचा मार्ग मोकळा झाला



असून शासनाने ९० कोटी रुपये मंजूर केले आहेत. या स्मारकासाठी रेल्वे विभागाची जागा शासनाकडे हस्तांतरीत झाली आहे. दहा एकर जागेवर स्मारक उभारले जाणार आहे. याबाबत वेळोवेळी पाठपुरावा करण्यात आला. विभागीय आयुक्त, पुणे यांनी मंजूर कामांकरिता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार पॅनल गठीत केले आहे. यामध्ये पुणे येथील क्रिएशन इंजिनिअर कंपनीचा समावेश आहे. सदर स्मारक उभारण्यासाठी या कंपनीची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्ती आहे. सदर स्मारकाचा आराखडा तयार करण्याच्या दृष्टीने सविस्तर प्रकल्प अहवाल व अंदाजपत्रक तयार करून तांत्रिक मान्यतेकरिता कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पंढरपूर यांच्याकडे सादर करावे, अशा सुचना देण्यात आल्या आहेत. सदर पत्राच्या प्रती विभागीय आयुक्त, पुणे, विशेष कार्य अधिकारी (तीक्षेवि), उपविभागीय अधिकारी, पंढरपूर, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पंढरपूर, मुख्याधिकारी न. प. पंढरपूर यांना देण्यात आल्या आहेत. सदर पाहणीवेळी प्रांताधिकारी सचिन इथापे, तहसीलदार सचिन लंगुटे यांनी जागेसंदर्भात तर आर्किटेक्ट काळभैरव यांनी स्मारक उभारणीच्या कामाची माहिती दिली.

यावेळी राष्ट्रीय उपाध्यक्ष नंदकुमार कोसतवार, धनंजय गोंदकर, हर्ष कपडेकर, अनिल गचके, गणेश उंडाळे, विलास पोरे, बाबासाहेब महिंद्रकर, राजेश धोकटे, अनिल निकते, पुरुषोत्तम निकते, राहुल महाडिक, जयवंत कांबळे, शैलेश धट, दत्तात्रय चांडोले, अक्षय महिंद्रकर, आप्पासाहेब बंगाळे, भरत चांडोले, अनिल धट,गणेश महिंद्रकर, शिवकुमार भावलेकर, निलेश धोकटे, राजेंद्र निकते, दत्तात्रय निपाणकर, सतीश निपाणकर, संजय निपाणकर, सचिन बुरांडे, देविदास बोधे, रत्नाकर पिसे, संतोष पतंगे, प्रसाद निकते, कृष्णा चांडोले, माऊली निकते, प्रशांत काकडे, नाना जवंजाळ, बुलबुले, गणेश पतंगे, अक्षय जवंजाळ, कृष्णा जवंजाळ, गजानन खटावकर, गजानन जवंजाळ, सचिन केकडे, सुनील पोरे, अशोक खैरनार, महेश मांढरे, वसंतराव खुर्द, राजन उरणकर, बाळासाहेब काकडे, राजाभाऊ पोरे, अक्षय मांढरे, प्रमोद शिंपी, काळभैरव, प्रदीप खोले, पूजा वादवणे, वैभव सदावर्ते, ॲड. सागर मांढरे आदीसह समाजातील बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महत्वाचे...



### कवठेकर प्रशालेत सॅनिटरी पॅड व्हेंडर व डिसपोझल मशीनचे वितरण

**पंढरपूर, दि. १६ फेब्रुवारी-**

पंढरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित द.ह.कवठेकर प्रशाला पंढरपूर येथे .रोटरी क्लब जुन्नरचे धनंजय राजूरकर, सागर ताजणे,डिसेंट फौंडेशनचे अध्यक्ष जितेंद्र बिडवई , सचिव एफ.बी.आतार, संचालक चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत व सहकार्याने सॅनिटरी पॅड व्हेंडर व डिस्पॉसिबल मशीन दिले. कार्यक्रमासाठी पंढरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष नाना कवठेकर, मानद सचिव सुधीर पटवर्धन, एस. पी. कुलकर्णी, संजय कुलकर्णी, डॉ. मिलिंद जोशी उपस्थित होते. कवठेकर प्रशाला नाथ चौकचे मुख्याध्यापक व्ही. वाय. पाटील, उपमुख्याध्यापिका विश्वासे, पर्यवेक्षक गडदे, शेलार, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष लेंगरे, लेंगरे उपस्थित होते. प्रास्ताविक मुख्याध्यापक व्ही.एम. कुलकर्णी यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय समीर दिवाण यांनी केला. आभार पर्यवेक्षक आर.एस. कुलकर्णी यांनी केले.सूत्रसंचालन जेष्ठ शिक्षक एस. एम. कुलकर्णी व फडके यांनी केले. हा कार्यक्रम प्रमुख अभ्यागत धनंजय राजूरकर, सागर ताजणे, डिसेंट फौंडेशनचे अध्यक्ष जितेंद्र बिडवई, सचिव एफ.बी.आतार, संचालक चव्हाण यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

### डॉ. सागर कांबळे यांची कॉस्मेटिक अँड टेक्नॉलॉजी अभ्यास मंडळावर निवड

**बार्शी, दि.१६ फेब्रुवारी-**



आखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे कार्यकर्ते डॉ. सागर कांबळे यांची पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ सोलापूरच्या कॉस्मेटिक टेकनॉलॉजी अभ्यास मंडळावर निवड करण्यात आली. त्यांची गेल्या वर्षीच शासकीय आयटीआयच्या मॅनेजमेंट कौन्सिलवर निवड झाली होती. त्यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी आंदोलन, मोर्चे काढलेले आहेत. त्यांनी शैक्षणिक दर्जा वाढवण्याकरिता काही कॉन्फरन्स स्वतः आयोजित केल्या आहेत. गेल्या वर्षी त्यांनी डॉ. तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोनेरे येथून फार्मसी विषयातील पहिली PhD डिग्री प्राप्त केली आहे. त्यांच्या नावे तंत्रशास्त्र विद्यापीठात तसे रेकॉर्ड देखील आहे. सदर निवडीबद्दल त्यांचे शैक्षणिक स्तरातून कौतुक होत आहे. त्यांनी पुढे युवकांच्या शैक्षणिक प्रश्नाकरीता व शैक्षणिक दर्जा वाढवण्यासाठी काम करणार असल्याचे सांगितले.

### जिल्ह्यात उद्या ग्राहक तक्रार निवारण दिन

**पंढरपूर, दि. १६ फेब्रुवारी-**

महावितरणतर्फे जिल्ह्यातील सर्व विभागीय कार्यालयांमध्ये दि. १८ फेब्रुवारी रोजी ग्राहक तक्रार निवारण दिनाचे आयोजन केले असल्याची माहिती अ. भा. ग्राहक पंचायतीचे जिल्हाध्यक्ष शशिकांत हरिदास यांनी दिली. वीज ग्राहकांच्या विविध प्रकारच्या तक्रारी निवारण्यासाठी महावितरणतर्फे दर महिन्याच्या तिसऱ्या बुधवारी आयोजन करण्यात येते. त्याप्रमाणे १८ रोजी ग्राहक तक्रार निवारण दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी १८ फेब्रुवारी रोजी जिल्ह्यातील पंढरपूर, बार्शी, अकलूज, सोलापूर शहर व सोलापूर ग्रामीण अशा सर्व विभागीय कार्यालयांमध्ये सकाळी ११ ते दुपारी १ वा.पर्यंत ग्राहकांनी उपस्थित राहून आपल्या तक्रारी मांडून त्यांची सोडवणूक करून घ्यावी, असे आवाहन महावितरण सोलापूर मंडलचे अधिक्षक अभियंता सुनिल माने, अ.भा.ग्राहक पंचायतीचे प्रांत सहसचिव दीपक इरकल, सदस्य विनोद भरते, सुभाष सरदेशमुख, जिल्हा उपाध्यक्ष विनय उपाध्ये, जिल्हा सचिव सुहास निकते, जिल्हा महिला प्रमुख माधुरी परदेशी, जिल्हा कोषाध्यक्ष ललिता वांगडे, जिल्हा सदस्य पांडुरंग अल्लापूरकर, अण्णा ऐतवाडकर, जिल्हा मध्यस्थता कक्षाचे सदस्य संभाजी लंगोटे यांनी केले आहे.

## निधन वृत्त...

### सुशीलसिंग बायस



**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

लक्ष्मी मार्केट पाणी वेस येथील सुशीलसिंग दिलीपसिंग बायस-हजारी (वय-५२) यांचे सोमवारी दि.१६ फेब्रुवारी रोजी दुपारी तीन वाजता आकस्मित निधन झाले. त्यांच्यावर मंगळवारी दि.१७ फेब्रुवारीला सकाळी दहा वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. लक्ष्मी मार्केट येथील घरापासून त्यांची अंत्ययात्रा निघेल. त्यांच्या पश्चात वडील, पत्नी, बहिणी, दोन मुली आणि एक मुलगा असा परिवार आहे. शिवयोगी श्री सिद्धरामेश्वर यात्रेतील ते विड्याचे मानकरी होते. ते पाथरी येथील सधन शेतकरी असून राजपूत समाजाचे ते पंच होते.

### प्रकाश दोशी



**माळशिरस, दि. १६ फेब्रुवारी-**

येथील व्यापारी प्रकाश भिकुदास दोशी यांचे अल्पशा आजाराने निधन झाले मृत्यू समयी त्यांचे वय वर्ष ७५ होते त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी , सून,जावई असा परिवार आहे

### अजय धुमाळ



**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

पानमंगरूळ (ता. अक्कलकोट) येथील शेतकरी अजय काशीनाथराव धुमाळ (वय ५९) यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यामागे पत्नी, दोन मुले, १ भाऊ असा परिवार आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे सेवानिवृत्त उपअभियांता भाऊसाहेब धुमाळ यांचे ते धाकटे बंधू होत.

### प्रभू लोंढे



**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

वालचंद कला व शास्त्र महाविद्यालय समाजकार्य विभागातील निवृत्त चतुर्थश्रेणी कर्मचारी आणि सेटलमेंट फ्री कॉलनी येथील प्रभू सदू लोंढे (वय ७५) यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्यामागे पत्नी, ५ मुले, ३ मुली, सूना व नातवंडे असा परिवार आहे.



# गुंफण सामाजिक पुरस्काराने सांगोल्याच्या आपुलकी प्रतिष्ठानचा झाला सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १६ फेब्रुवारी-**

सांगोल्यातील आपुलकी प्रतिष्ठानला कराड येथील गुंफण अकादमीतर्फे देण्यात येणारा गुंफण सामाजिक पुरस्कार नुकताच देण्यात आला. पुणे येथे संपन्न झालेल्या २१ व्या गुंफण सद्भावना साहित्य संमेलनात प्रतिष्ठानला सन्मानित करण्यात आले.

संमेलनाध्यक्ष गझलकार सुनंदा शेळके, भारती विद्यापीठ पुणेचे सह-कार्यवाह डॉ.महादेव सगरे, माजी जिल्हा न्यायाधीश सुनील वेदपाठक यांच्या हस्ते व ज्येष्ठ साहित्यिक डॉ.संजय बोरुडे, बबन पोतदार, जयसिंग कळके, गुंफण अकादमीचे अध्यक्ष बसवेश्वर चेणगे, गजानन चेणगे यांच्या उपस्थितीत सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल, बुके देऊन आपुलकी सदस्यांना गौरविण्यात आले. यावेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र यादव, सचिव संतोष महिमकर, प्रभाकर सरगर, अच्युत फुले, महादेव दिवटे, सुरेश चौगुले, अरविंद डोंबे, प्रा.बाळासाहेब शेंडे, दिपक बंदरे, विश्वासराव पाटील, दत्तात्रय नवले, श्रीकांत देशपांडे, वसंत सुपेकर, प्रथमेश यादव, जितेंद्र बोत्रे, श्रीयश नवले उपस्थित होते.

# बार्शीकरांची घरपट्टीवरील शास्ती होणार माफ

## सभागृहात सत्ताधारी-विरोधकांचे एकमत; शासनाकडे मंजुरीसाठी पाठवणार ठराव

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१६ फेब्रुवारी-**

बार्शी नगरपरिषदेच्या आज सोमवार दि. १६ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत बार्शीकरांकडून वार्षिक २४ टक्के आकारल्या जाणाऱ्या शास्तीच्या माफीबाबत सभागृहात दोन्हीही बाजूकडून ठरावावर सखोल चर्चा होऊन ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला. हा ठराव आता शासनाकडे पाठवला जाणार असून घरपट्टीवरील दंडव्याज लवकरच माफ होणार आहे. सभेच्या पिठासन अधिकारी म्हणून नगराध्यक्षा सौ. तेजस्विनी कथले यांनी काम पाहिले.

बार्शीकरांसाठी सध्या नगरपरिषदेकडून शासनाच्या अभय योजनेमधून जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार ५० टक्के पर्यंत घरपट्टीवरील शास्ती माफ केली जात होती. परंतू ५० टक्क्यापेक्षा जास्त सवलत पाहिजे असेल तर नगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेच्या ठरावाची आवश्यकता असते. त्याप्रमाणे आजचा सभागृहाचा झालेला ऐतिहासिक निर्णय शासनाकडे मंजुरीसाठी पाठवला जाणार आहे. त्यामुळे बार्शीतील हजारो करदात्यांची आता दंडातून सुटका होणार आहे. शासनाने यापूर्वी ३० एप्रिल २०२५ च्या शासन निर्णयाप्रमाणे १९ मे २०२५ पूर्वीच्या घरपट्टीवरील शास्ती माफ व्हावी, यासाठीच हा निर्णय घेतला होता. बार्शी नगरपरिषदेकडील २०२४-२५ अखेर थकीत कराची रक्कम २४ कोटी ६५ लाख २० हजार १६ इतकी आहे. ती सर्व रक्कम नगरपरिषदेच्या तिजोरीत जमा होणार आहे. तर करावरील एकूण शास्तीची १६ कोटी ८४ लाख १० हजार ४८२ रुपये इतकी रक्कम माफ होण्याचा मार्ग सुकर झाला आहे. सत्ताधारी नगरसेवक संदेश काकडे व दीपक राऊत यांनी मांडलेल्या या ठरावावर सत्ताधारी विजय राऊत, दीपक राऊत, संदेश काकडे, विजय चव्हाण, भारत पवार यांच्यासह विरोधी पक्षनेते नागेश अक्कलकोटे, कृष्णराज बारबोले, अन्वर लांडगे, ज्योतिर्लिंग कसबे यांनी चर्चेत सहभाग नोंदवला. यावेळी माजी नगरसेविका विद्या पवार यांचे पती चंद्रकांत पवार व नगरसेवक महादेव घबाडे यांचे निधन झाल्याबद्दल शोक प्रस्ताव मांडून सभागृहात श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

# निरगुडीच्या रथोत्सवात लाखो भाविकांचा जयघोष

## 'भारतमाता की जय', 'वंदे मातरम्', 'हर हर महादेव' चा गजर

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.१६ फेब्रुवारी-**

निरगुडी (ता. आळंद) येथील रथोत्सवात सहभागी झालेल्या दशभरातील लाखो भाविकांनी भारतमाता की जय, वंदे मातरम्, हर हर महादेव, राष्ट्रीय संत हवा मल्लिनाथ महाराज की जय चा एकच जयघोष करत महाशिवरात्री यात्रा महोत्सव व रथोत्सव कार्यक्रम मोठ्या जल्लोषात साजरा झाला.



जय भारत माता सेवा समिती नवी दिल्लीचे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष तथा राष्ट्रीय संत हवा मल्लिनाथ महाराज यांचे दिव्य सानिध्यात महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागातील निरगुडी (ता. आळंद) येथे महाशिवरात्री यात्रा महोत्सवानिमित्त विविध धार्मिक, सामाजिक आणि देशभक्तीपर कार्यक्रम झाले. देश वाचला तर आम्ही सारे जण वाचणार असून देशच माझा घर, देशच माझा परिवार असे समजून प्रत्येक शिवभक्तानी आपले जिवन सार्थक करून घेण्यासाठी देशभक्ती मार्गाकडे वळावे म्हणून श्री ॐ हवा मल्लीनाथ महाराजांनी संपूर्ण देशभरात सहा हजारोहून अधिक शिवलिंगाची स्थापना करून चिरंतर प्रसाद सर्वासमोर ठेवला आहे. यापैकी रेवणसिद्धश्वरलिंग देवस्थान हे मुळ व सर्वोच्च स्थान असल्याने या महाशिवरात्री यात्रा महोत्सवास महाराष्ट्र, आंध्र, कर्नाटक, गुजरात आदी राज्यासह देशभरातील लाखो भाविक या ठिकाणी मोठ्या प्रमाणात जमले होते. आळंद, अक्कलकोट आणि उमरगा तालुक्यातील तसेच महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील भाविक भक्तांकडून यात्रेची जय्यत तयारी करण्यात आली होती. बुधवार दि. १५ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्रीच्या दिवशी शिवस्तुती आणि देश भक्तिचा जयजयकार करीत रात्रभर विविध वाद्यसह फट्याक्यांची आतषबाजी करीत निरगुडी गावातून देवस्थान पर्यत 'श्रीची' भव्य पालखी व कुंभ मिरवणूक काढण्यात आली. सोमवार दि.१६ रोजी पहाटे श्रीस महाभिषेक, सकाळी अग्नी पूजा आदी कार्यक्रम झाले.

दुपारी ५ वाजता राष्ट्रीय संत सद्गुरु श्री ॐ हवा मल्लिनाथ महाराज यांच्या दिव्य सानिध्यात दहीहंडी फोडत, खारीक बदामाची मुक्त उधळण करीत , फट्याक्यांची आतषबाजी करीत रथोत्सव झाला. त्यानंतर जंगी कुस्ती स्पर्धा झाली. दरवर्षीप्रमाणे यंदाही मोफत महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती. भाविक भक्तांनी सद्गुरू दर्शन आणि महाप्रसदाचा लाभ घेऊन जल्लोष साजरा केला.

# महाशिवरात्र निमित्त अर्धनारी नटेश्वरच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि.१६ फेब्रुवारी-**

वेळापूर येथे महाशिवरात्रीनिमित्त अर्धनारी नटेश्वराच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. महाशिवरात्रीनिमित्त हजारो वर्षांची परंपरा असलेल्या श्री अर्धनारी नटेश्वराच्या मंदिरात देवाचे पुजारी रविराज गुरव यांनी पहाटे जलाभिषेक महापूजा व आरती केली. त्यानंतर अर्धनारी नटेश्वराच्या दर्शनासाठी मंदिर खुले करण्यात आले.

देवाच्या समोर नंदीजवळ ग्राम जोशी विवेक जोशी, मन्मथ स्वामी व महेश स्वामी यांनी भाविकांचे अभिषेक घातले. आमदार उत्तमराव जानकर यांच्या सुविद्य पत्नी व नूतन पं. स. सदस्या विमलताई जानकर यांनी अर्धनारी नटेश्वराचे दर्शन घेतले. अर्धनारी नटेश्वराच्या मंदिरामध्ये देवाच्या गाभाऱ्यात व बाहेर फुलांची सजावट करण्यात आली होती. त्याचबरोबर मंदिर परिसरामध्ये आकर्षक अशी रांगोळी व मंदिरावर विद्युत रोषणाई करण्यात आली होती. पहाटेपासून भाविकांनी दर्शनासाठी मोठी रांग लावली होती. रात्री उशिरापर्यंत हजारो भाविकांनी अर्धनारी नटेश्वराचे दर्शन घेतले. भाविकांना अर्धनारी नटेश्वर



अन्नछत्र मंडळाच्यावतिने भाविकांना खिचडी, सरबत, चहाचे वाटप करण्यात आले. महाशिवरात्री उत्सवानिमित्त मंदिर परिसरामध्ये वेळापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी आशिष कांबळे यांनी बंदोबस्त चोख ठेवला होता. महाशिवरात्र उत्सव सोहळा पार पाडण्यासाठी गौरीहर गुरव, सतीश गुरव, रविराज गुरव, मयूर गुरव, प्रणव गुरव, पार्थ करमाळकर, सोहम वाघे, अनिकेत शिंदे, अभिराज होडगे, वैभव वाघे, अविनाश खराडे, ओंकार होडगे, बाळू खंडागळे, करन उरणे, गणेश मेहत्रे, विनोद रणवरे, अतुल गोडसे, पप्पू पिसे, आदींनी परिश्रम घेतले.

# सेवा, संस्कार, समर्पण हेच भारत विकास परिषदेचे कार्य : परिचारक

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १६ फेब्रुवारी-**

सेवा, संस्कार, समर्पण अशा उदात्त भावनेतून केवळ लोकांचे कल्याण हाच एकमेव हेतू ध्यानात घेऊन पंढरपूर येथील भारत विकास परिषद शाखेचे काम असल्याचे प्रतिपादन माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी केले.

येथील काणे यांच्या डॉ. गायत्री सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल मध्ये शनिवार दि.१४ फेब्रुवारी रोजी भारत विकास परिषद शाखा पंढरपूर, दिव्यांग केंद्र पुणे, महाराष्ट्र नॅचरल गॅस, लि.पुणे, कै.महादेवराव आवताडे प्रतिष्ठान, मंगळवेढा यांच्या सहकार्याने दिव्यांग शिबिर झाले. यावेळी आमदार समाधान आवताडे, भारत विकास परिषद शाखा पंढरपूरचे संस्थापक अध्यक्ष डॉ. सुरेन्द्र काणे, अध्यक्षा स्मिता कोर्टीकर, विजयसिंह नाना देशमुख, सचिव मंदार केसकर, कोषाध्यक्ष सुनील परळीकर, दत्ताजी चितळे, दिव्यांग केंद्र पुणेचे विनय खटावकर, डॉ. वर्षा काणे, महावीर गांधी आदी मान्यवर उपस्थित होते.

या शिबिरात ३०८ रुग्णांनी सहभाग घेतला. त्यांना २२ मार्च रोजी कृत्रिम हातपाय बसविण्यात येणार आहेत. आमदार आवताडे यांनी दिव्यांग व्यक्तीची सेवा महत्वाची असल्याचे सांगितले. संस्थापक अध्यक्ष डॉ सुरेन्द्र काणे यांनी प्रास्ताविक केले.

## पंढरपूरमध्ये दिव्यांग शिबिर; ३०८ रूग्णांना लाभ



देशभरात भारत विकास परिषदेच्या १८ हजार शाखा व ७२ हजार कुटुंबीय असल्याचे ते म्हणाले. श्री.खटावकर यांनी दिव्यांगांची सेवा हा भारत विकास परिषदेचा आत्मा असल्याचे सांगितले. समाजाने समाजासाठी चालवलेला हा उपक्रम असून येथून कोणीही विन्मुख परत जाणार नसल्याचे श्री.चितळे यांनी सांगितले. यावेळी कर्मयोगी नर्सिंग कॉलेजचे विद्यार्थी व पुणे येथील स्वयंसेवकांचा सत्कार करण्यात आला.

मिलिंद वाघ यांनी सूत्रसंचालन केले. अध्यक्ष स्मिता कोर्टीकर यांनी स्वागत केले. सचिव मंदार केसकर यांनी आभार मानले. युवा नेते प्रणव परिचारक, लक्ष्मण भाऊ शिरसट, आदित्य फत्तेपूरकर, नगरसेविका स्मिता फत्तेपूरकर, उच्च न्यायालयातील सरकारी वकील ॲड. सारंग आराध्ये, जिल्हा कार्यवाहक डॉ. रमेश सिद, डॉ. सचिन लादे, श्रीकांत बडवे यांनी दिव्यांग शिबिरास भेट दिली.

डॉ सुरेन्द्र काणे, स्मिता कोर्टीकर, डॉ. वर्षा काणे, मंदार केसकर, कोषाध्यक्ष सुनील परळीकर, माधुरी जोशी, मिलिंद वाघ,,राजेंद्र केसकर, डॉ. अनिल पवार, अजित कुलकर्णी, आर. डी. देशपांडे, अमित शिरगावकर, भाग्यश्री लिहिणे, डॉ मृणाल गांधी, अनुराधा हरिदास, प्रीती वाघ, सीमा कुलकर्णी, सुरेखा कुलकर्णी, रेखाकिशोरी टाक, माधुरी पवार, मंजुषा वाघ, विवेक परदेशी, सचिन पंढरपूरकर, भारत गदगे, सतीश कोर्टिकर, दत्तात्रय तरळगट्टी, विश्वास पाटील, चैतन्य उत्पात, मनोज कुलकर्णी, सचिन बेणारे, शार्दुल नलबिलवार व काणे हॉस्पिटल स्टाफ, सर्व सदस्यांनी शिबिर यशस्वी करण्यासाठी विशेष प्रयत्न केले.

अपघात किंवा अन्य कारणाने दिव्यांग झालेल्यांना या शिबिराचा मोठा फायदा झाला.

# सोलापूर महापालिकेत राष्ट्रवादीचा सत्तेत सहभाग

## ▸ विरोधातून सत्तेकडे
## ▸ नगरसेवक वैभव हत्तुरेंना लॉटरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

सोलापूर महापालिकेत स्पष्ट बहुमत मिळवलेल्या 'भाजपा'ने आता राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजितदादा गट) यांनाही सत्तेत सहभागी करून घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे राष्ट्रवादीचे एकमेव निवडून आलेले नगरसेवक वैभव हत्तुरे हेही महापालिकेच्या सत्तेचा भाग असणार आहेत. पालकमंत्री जयकुमार गोरे, प्रदेश आणि स्थानिक पातळीवर चर्चेअंती हा निर्णय झाला आहे. महापालिका निवडणुकीत भाजपाने ८७ नगरसेवक निवडून आणत एकहाती सत्ता मिळवली होती.

राष्ट्रवादीकडून केवळ वैभव हत्तुरे हे एकमेव नगरसेवक निवडून आले होते. राज्याप्रमाणे सोलापुरातही भाजप आणि राष्ट्रवादी हे विरोधात लढले होते. मात्र, निवडणुकीनंतर राज्य पातळीवर झालेल्या वरिष्ठ नेत्यांच्या बैठकीत सोलापूरविषयी चर्चा झाली.

सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी रविवारी वैभव हत्तुरे यांना चर्चेसाठी आमंत्रित केले होते. या बैठकीत शहरातील विकासकामे, प्रलंबित प्रश्न तसेच निधी वाटपाबाबत सविस्तर चर्चा झाली. हत्तुरे यांना भाजप नगरसेवकांप्रमाणेच समान निधी देण्याचे तसेच सत्तेतील समित्यांमध्ये योग्य प्रतिनिधित्व देण्याचे आश्वासन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिले.



**वरिष्ठ पातळीवर बोलणे झाले : वैभव हत्तुरे**

पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याशी भेट झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रदेश पातळीवरही यासंदर्भात चर्चा झाली. राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष संतोष पवार यांच्याशी चर्चा झाली आहे. त्यांचे वरिष्ठ पातळीवर बोलणे झाले आहे. पालकमंत्र्यांनी राष्ट्रवादी सत्तेचा भाग असल्याचे सांगितले आहे, असे नगरसेवक वैभव हत्तुरे यांनी स्पष्ट केले आहे.

### हत्तुरे मुळचे भाजपाचेच...

नगरसेवक वैभव हत्तुरे मागच्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीच्या तिकिटावर निवडून आले होते. यंदाच्या निवडणुकीतही त्यांनी पक्षाकडे उमेदवारी मागितली होती. परंतु माजी नगरसेवक नागेश ताकमोगे यांना यांना भाजपने उमेदवारी देत हत्तुरे यांना डावलले होते. आपल्याच पक्षाकडून डावलले गेल्यामुळे हत्तुरे समर्थकांमध्ये मोठा असंतोष निर्माण झाला होता. याच संधीचा फायदा घेत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) ने हत्तुरे यांना आपल्या पक्षात प्रवेश देऊन उमेदवारी दिली. 'निष्ठावंत कार्यकर्त्यांची किंमत पक्षाला राहिली नाही,' असा आरोप करत हत्तुरे यांनी ही निवडणूक प्रतिष्ठेची केली होती. हत्तुरे हे मुळचे भाजपाचेच असून त्यांच्या कामाला आणि वैयक्तिक जनसंपर्काला मतदारांनी पसंती दिल्याचे या निकालावरून स्पष्ट झाले.

# तामलवाडीच्या श्री विष्णू महादेव मंदिरात भक्तांची मांदियाळी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथील श्री विष्णू-महादेव मंदिरात महाशिवरात्रीनिमित्त तामलवाडीसह पंचक्रोशीतील भाविकांची दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती.

मराठवाड्याच्या प्रवेशद्वारावर असलेल्या या मंदिरात विष्णुंची मुर्ती आणि महादेवाची पिंड समोरासमोर आहे. काशी विश्वेश्वरानंतर तामलवाडी येथेच अशा समोरासमोर मुर्ती दिसून येत असल्याने या देवाचा महिमा अगाध मानला जातो, असे पुजारी केशव गुरव यांनी सांगितले. महाशिवरात्रीनिमित्त अभिषेक, महापुजा, महाआरती



करण्यात आली. ह.भ.प.विनायक पाटील यांच्या नेतृत्वाखाली शिवलिलामृत ग्रंथाचे पारायण करण्यात आले. तसेच कीर्तन, हरिजागर आदी कार्यक्रम झाले. महाप्रसाद वाटपाने उत्सवाची सांगता करण्यात आली.




# राष्ट्रीयकृत बँकात निवृत्तीवेतन अद्ययावतकरण करा

## ▸▸ सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी केले आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या धर्तीवर काही राष्ट्रीयकृत बँकात निवृत्तीवेतन धारकांसाठी निवृत्तीवेतन अद्ययावतीकरण करण्याची दीर्घकाळ प्रलंबित मागणी पूर्ण करावी, शासन सेवेतील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना जीएसटी लावू नये आणि वाढीव पेन्शन मिळावी, यासाठी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी एक दिवशीय आंदोलन करून आपल्या मागण्यांचे निवेदन जिल्हा प्रशासनाकडे दिले.

शासनाच्या अधिसूचनेनुसार ३१.१०.२०२२ पर्यंत निवृत्त झालेल्या सर्व रिझर्व्ह बँकेच्या निवृत्तीवेतनधारकांना निवृत्तीवेतन अद्ययावतीकरण मंजूर करण्याच्या भारत सरकारने सुचना नुकत्याच केल्या आहेत. भारतीय रिझर्व्ह बँकेने निवृत्तीवेतन अद्ययावतीकरणाची ही तिसरी प्रक्रिया आहे- यापूर्वी २०१९ आणि २०२३ मध्ये लागू करण्यात आली होती आणि सध्या २०२५ मध्ये ही प्रक्रिया राबवण्यात येत आहे.

प्रत्येक अद्ययावतीकरण प्रक्रियेत, महागाई दिलासा देण्याचे मान्य निर्देशांकात विलीनीकरण केल्यानंतर मूळ निवृत्ती वेतनात १०% वाढ करण्यात आली आहे. सध्याच्या प्रक्रियेत, निर्देशांक आधार देखील १९६० वरून २०१६ पर्यंत हलवण्यात आला आहे, जो व्यावसायिक बँक कर्मचारी आणि निवृत्तीवेतनधारकांसाठी द्विपक्षीय समझोता करताना अवलंबलेल्या पद्धतीशी संरेखित करतो.

रिझर्व्ह बँकेच्या निवृत्तीवेतनधारकांसाठी या प्रगतीशील आणि लोककल्याणकारी निर्णयाचे स्वागत करताना, आम्हाला हे सांगावे लागेल की आयबीए निवृत्तीवेतन योजनेद्वारे शासित बँक निवृत्तीवेतनधारकांना जवळपास तीन दशकांपासून कोणत्याही प्रकारचे निवृत्तीवेतन अद्ययावतीकरण नाकारले गेले आहे, ज्यामुळे वृद्ध निवृत्तीवेतनधारकांना तीव्र आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे. यामुळे वरील मागण्यांचा विचार करून आम्हाला न्याय मिळावा, अशी अपेक्षा या निवृत्तीधारकांची आहे.

या मागण्यांमध्ये बँकिंग उद्योग पेन्शन योजना १९९५ मध्ये आरबीआय पेनच्या मॉडेलवर सुरू करण्यात आली, आरबीआय ही बँकिंग प्रणालीची नियामक आहे आणि तिची सेवा आणि निवृत्तीवेतन संरचना पारंपारिकपणे बँकिंग उद्योगासाठी बेंचमार्क म्हणून काम करत आहेत. रिझर्व्ह बँकेच्या तुलनेत, ही योजना सुरू झाल्यापासून बँक पेन्शनधारकांना निवृत्तीवेतन अद्ययावतीकरणाचा विस्तार करण्यात आलेला नाही. जुन्या बँक पेन्शनधारक केवळ महागाई सवलतीवर जगत आहेत, स्थिर मूलभूत पेन्शन आणि क्रयशक्तीत गंभीर घट होत आहे, विशेषतः वृद्ध सेवानिवृत्त आणि कौटुंबिक पेन्शनधारकांवर परिणाम होत आहे. आदींसह इतर मागण्या नमूद केल्या आहेत. यावेळी शंतनू गायकवाड, उल्हास देसाई, असद किल्लेदार, सुहास मार्डीकर, गोवर्धन आवाशंक, आबरी अलमेडा, विरभद्र माळगी, अध्यक्ष भास्कर भावे, शतनू गायकवाड, उल्हास देसाई, असद किलेदार, सुहास मार्डीकर, गोवर्धन आवाशंक, आबरी अलमेडा, विरभद्र माळगी, प्रकाश जाधव, जिल्हा परिषद लिपीक संघटना व महासंघ दिनेश बनसोडे, अविनाश गोडसे, सिव्हील संघटना पंकज जाधव प्रतिक शिवशरण, एलआयसी संघटनेचे सुनिल टेकाळे, राज्य सरकारी मध्यवर्ती संघटनेचे अमृत कोकाटे, किशोर साळवे, महसुल सघटनेचे रविराज नष्टे आदींची उपस्थिती होती.

## मोदी कब्रस्तानात आज उरूस

**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

हजरत पीर मैनोद्दीन चिषती कादरी नक्षबंदी यांच्या ४७ वा उरूस सात रस्ता येथील मोदी कब्रस्तान येथे साजरा होणार आहे. १७ फेब्रुवारी मंगळवार रोजी बाद नमाचे मगरीब मौलाली चौक साहेब पीरजादे निवास येथून संदल मिरवणूक निघणार असून त्या संदल मिरवणुकीच्या समारोप मोदी कब्रस्तान येथे होणार आहे. तसेच बुधवारी चिरागाचे कार्यक्रम होणार आहे. बुधवारी उरूस निमित्त गुरवारी महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार असल्याची माहिती मुख्य संयोजक युसुफ पिरजादे यांनी दिली आहे.

# 'विकासाच्या आड राजकारण येणार नाही'

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

नुकत्याच पार पडलेल्या सोलापूर महानगरपालिका व जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये शिवसेना ला शहर-जिल्ह्यात लक्षणीय यश मिळाल्यानंतर सोलापूरातील शिवसेना युवा नेते श्रीनिवास संगा यांनी मुंबई येथे राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांची भेट घेतली.



या भेटीत निवडणुकीतील यश, आगामी राजकीय दिशा आणि सोलापूरच्या सर्वांगीण विकासावर सखोल चर्चा झाली. सोलापूरमधील बेरोजगार युवकांना आयटी पार्कसह विविध औद्योगिक प्रकल्पांच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध करून देण्यावर विशेष भर देण्यात आला. टेक्स्टाईल हब म्हणून ओळख असलेल्या सोलापूरचे प्रभावी ब्रॅण्डिंग, कष्टकरी कामगारांचे प्रश्न, तसेच औद्योगिक, शैक्षणिक, साहित्यिक आणि क्रीडा क्षेत्रातील प्रगती यासाठी ठोस पावले उचलण्याची मागणी श्रीनिवास संगा यांनी केली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विकासासाठी राजकारण आड येणार नाही. सोलापूरचा विकास हाच आमचा दृष्टिकोन आहे, असे स्पष्ट करत आवश्यक निधी व सहकार्य देण्याची ग्वाही दिली. युवकांचे संघटन कौशल्य, आक्रमक नेतृत्वशैली आणि युवकांच्या प्रश्नांवर सातत्याने लढा देणारे व्यक्तिमत्व म्हणून श्रीनिवास संगा यांची ओळख निर्माण झाली आहे.

विकासाच्या मुद्द्यावर ते सातत्याने आग्रही भूमिका घेत आहेत. सोलापूरच्या सर्वांगीण विकासासाठी शिवसेनेच्या माध्यमातून ठोस आणि प्रभावी कृती आराखडा राबवला जाईल, असा विश्वास या भेटीनंतर राजकीय वर्तुळात व्यक्त होत आहे.




सोलापूर : होम मैदानावर सुरु असलेल्या इलेक्ट्रो प्रदर्शनाला सोलापूरकर प्रचंड गर्दी करत आहेत. या प्रदर्शनाच्या माध्यमातून लाखोंच्या उलाढाली होत असतात.

# उपमहापौर देवकर यांची पर्यावरणाप्रती कार्यतत्परता



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ फेब्रुवारी-**

सोलापूर महानगरपालिका शिक्षण मंडळ आवारातील एका मोठ्या शेलवट वृक्षाला अचानक आग लागल्याची घटना घडली. परिसरात दुकाने असल्याने भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मनपा अग्निशामक दलाने तातडीने ही आग विझवली.

ही बाब उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांना समजताच तात्काळ घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. पर्यावरणाप्रती उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांची तत्परता दिसून आली.

घटनेची गंभीरता ओळखून त्यांनी अग्निशमन व उद्यान विभागाच्या अधिकाऱ्यांना त्वरित संपर्क साधून आग नियंत्रणात आणण्याच्या स्पष्ट सूचना उपमहापौरांनी दिल्या. अग्निशमन पथकाने तत्काळ पोहोचून आग विझवली आणि संभाव्य मोठी हानी टळली. याप्रसंगी कर्मचारी गणेश कोळी, पर्यावरण दूत मनोज देवकर उपस्थित होते.

उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर म्हणाल्या, हे शेलवटचे आयुर्वेदिक व प्राचीन झाड असून सुमारे ३० वर्षे जुने आहे. अशा झाडांभोवती पक्षी, खारुताई यांचे वास्तव्य असते. जैवविविधता जपण्यासाठी प्रत्येक झाडाचे रक्षण करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.

# शिक्षण अधिक लवचिक, बहुविषयक, कौशल्याधारित होणार : डॉ.दामा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ फेब्रुवारी-**

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० हे भारतीय शिक्षण व्यवस्थेला नवी दिशा देणारे आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त असे परिवर्तनशील धोरण आहे. या नव्या धोरणामुळे शिक्षण अधिक लवचिक, बहुविषयक आणि कौशल्याधारित होणार आहे, असे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्र.-कुलगुरु डॉ. लक्ष्मीकांत दामा यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेच्या सोलापुरातील सात रस्ता येथील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयातील वाणिज्य विभागाच्या वतीने 'बी.कॉम. अभ्यासक्रमाची पुनर्रचना' या विषयावर आयोजित कार्यशाळेत



बोलताना ते पुढे म्हणाले, वाणिज्य शिक्षणात बँकिंग, वित्तीय व्यवस्थापन, उद्योजकता आणि डिजिटल अर्थव्यवस्था यांसारख्या क्षेत्रांशी निगडित कौशल्यांचा समावेश करणे अत्यावश्यक आहे.

वाणिज्य विभागाचे अधिष्ठाता डॉ.शिवाजी शिंदे यांनी आपल्या मनोगतातून क्रेडिट प्रणाली, मल्टी-एंट्री, मल्टी-एग्झिट, कौशल्याधारित अभ्यासक्रम, मूल्यवर्धित कोर्सेस, संशोधनाभिमुख शिक्षण आदी बाबींवर प्रकाशझोत टाकला. यावेळी प्राचार्य डॉ.सुरेश ढेरे, डॉ.अमोल बोबडे, डॉ.श्रीकांत दुधाळ, डॉ.सुनील पाटील, डॉ. शिवानंद भांजे, डॉ.जैनौद्दिन मुल्ला यांनीही मार्गदर्शन केले. डॉ.इंदुमती गंगन्नवार यांनी प्रास्ताविक केले. प्रा.मृदुला मोहोळकर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ.देवराव मुंडे यांनी आभार मानले.

## दिवसा ऊन; रात्री गारवा, पहाटे थंडी

**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

सध्या वातावरणात कमालीचा लपंडाव सुरू झाला आहे. दिवसभर कडक ऊन्ह, रात्री उकाडा आणि पहाटे थंडी अशी त्रिद्धावस्था परिस्थिती सोलापुरात निर्माण झाली आहे. त्यामुळे सोलापूरकर पुरते हैराण झाले आहेत. गेल्या आठ ते दहा दिवसांपासून सातत्याने तापमानामध्ये काही अंशी वाढ होत चालली आहे.

दिवभर उन्हाच्या झळा आणि रात्री थंडीचा सामना करण्याची वेळ सोलापूरकरांवर आली आहे. फेब्रुवारीमध्ये सोलापूरच्या तापमानाचा पारा ३४ अंशांच्या आसपास पोहोचला आहे. तर गेल्या ८ फेब्रुवारीपासून ते आजतागायत तापमानाचा पारा ३४ ते ३५ अंशांपर्यंतच स्थिरावला आहे. दिवसभरात उन्हाच्या झळा जाणवत आहेत तर रात्री उकाड्याचा त्रास सहन करावा लागत आहे.



# मराठीतून शिका 'तेलुगू' लिहायला अन् वाचायला

## मोफत कार्यशाळेला नागरिकांचा मोठा प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ फेब्रुवारी-**

पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालय सोलापूर सुवर्ण महोत्सवानिमित्त, पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालय आणि हृदयस्पर्श बहुउद्देशीय समाजसेवी संस्था, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मराठीतून शिका तेलुगू लिहायला वाचायला ही मोफत कार्यशाळा उत्स्फूर्त प्रतिसादात यशस्वीरीत्या पार पडली.

भाषिक समन्वय, सांस्कृतिक जाणीव वाढवणे, तेलुगू वाचन-लेखनाची प्राथमिक ओळख करुन देण्याच्या उद्देशाने ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली. कन्ना चौक येथील पूर्वविभाग सार्वजनिक वाचनालय येथे १९ एप्रिल २०२६ पर्यंत दर रविवारी सकाळी ९.३० ते ११ यावेळेत ही कार्यशाळा चालणार आहे. काशीनाथ गंजी यांनी प्रशिक्षक म्हणून काम पाहत आहेत. कार्यशाळेच्या पहिल्या दिवशी तेलुगू वर्णमाला परिचय, स्वर-व्यंजन लेखन सराव, उच्चार व लेखन पध्दतीचे मार्गदर्शन करण्यात आले. मराठी माध्यमातून शिकवण्यामुळे तेलुगु भाषा समजायला लिहायला व वाचायला सोपे जात असल्याचे शिबीरार्थीकडून सांगण्यात आले.

प्रारंभी श्रीनिवास बुरा व पांडुरंग दिड्डी यांच्या हस्ते दीपप्रज्ज्वलन करण्यात आले. यावेळी गौरीशंकर दिकोंडा, देवीदास गोटीपामूल, अरविंद चिन्नी, गणपत कुरापाटी, रमा इप्पलपल्ली, वनिता कायत, नर्मदा गंजी, सिध्दाराम वाघमारे, सिध्दलिंगेश्वर विजापुरे, श्रीनिवास वंगारी, उमेश नक्का, श्रीरंग रेगोटी आदी उपस्थित होते.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## अ.भा. बालकुमार संस्थेच्या लातूर अध्यक्षपदी भारत सातपुते

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १६ फेब्रुवारी :** अ.भा. बालसाहित्य संस्थेच्या लातूर अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक भारत सातपुते, उपाध्यक्ष जी.जी. कांबळे, सचिव डॉ. नागेश पाटील, सहसचिव वृषाली पाटील,कोषाध्यक्ष डॉ. नयन भादुले-राजमाने, प्रसिद्धी प्रमुख उदय दाभाडे,तर केंद्रीय कार्यकारणीवर प्रतिनिधी म्हणून शैलजा कारंडे यांची निवड झाली आहे. तर डॉ. सुनीता मोरे,रमेश हनमंते, सुलक्षणा सरवदे, कल्याण राऊत ,सविता धर्माधिकारी, सतीश सुरवसे, वैशाली महालिंगे यांचीही



कार्यकारणी सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

या कार्यकारिणीचे सल्लागार म्हणून प्रकाश घादगिने, रमेश चिल्ले हे राहतील. पुढील तीन वर्षासाठी ही कार्यकारणी असून यावेळी या साहित्य शाखेच्या वतीने शिक्षण क्षेत्रातील सर्व घटकांसाठी अनेक उपक्रम घेतले जाणारे असल्याची माहिती या नवनियुक्त कार्यकारिणीने दिली. या बाल साहित्य संघाचे मुख्य कार्यालय पुणे येथे असून राज्यभर या साहित्य चळवळीच्या शाखा कार्यरत आहेत



## विविध वृत्त...

### भूकंपविषयक आपत्ती व्यवस्थापनाची आज रंगीत तालीम; नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन

**लातूर :** भूकंपासारख्या आपत्तीच्या व्यवस्थापनासाठी करावयाच्या उपाययोजनांची रंगीत तालीम मंगळवार, १७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता लातूर जिल्हा क्रीडा संकुल येथे आयोजित करण्यात आली आहे. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे (एनडीआरएफ) पथक व जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्यावतीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले असून जिल्ह्यातील स्वयंसेवी संस्था, प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी, महाविद्यालयीन विद्यार्थी व नागरिकांनी यावेळी उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा आपत्ती प्राधिकरणच्यावतीने करण्यात आले आहे.भूकंपामुळे निर्माण होणाऱ्या आपत्तीत कशाप्रकारे प्रतिसाद द्यावा, काय करावे व काय करू नये, याबाबतची माहिती एनडीआरएफ पथकामार्फत यावेळी दिली जाणार आहे. जिल्ह्यातील आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित सर्व शासकीय यंत्रणांचे अधिकारी-कर्मचारी, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, शोध व बचाव पथके यामध्ये सहभागी होणार आहेत. तसेच आपत्ती व्यवस्थापनातील महत्वाच्या बाबींची माहिती यावेळी देण्यात येणार आहे.

### चिवडे पाटील यांनी पुन्हा वाचवले हरीनाचे प्राण

**लातूर :** लातूर तालुक्यातील गंगापूर येथील भाजप कामगार मोर्चाचे शहर जिल्हाध्यक्ष ज्योतीराम चिवडे पाटील हे राजकारणात राहूनही मनाने हळवे असणारे नेतृत्व. प्राणी पक्षी कधीही अडचणीत आले, संकटात सापडले की त्यांच्या मदतीला पहिल्यांदा धावून जाणारे.. वॅलेंटाईन डे दिवशी एक घटना घडली. गंगापूर शिवारात काही मोकाट कुत्र्याने एका कळविटास जखमी केल्याची गंगापूर येथील बिपीन कटारे या शेतकऱ्याने यांनी चिवडे पाटील यांना दिली. चिवडे पाटील यांनी क्षणाचाही विलंब न करता त्यांचे शेत गाठले आणि जखमी हरीनावर प्रथमोपचार करून वनविभागाचे वनक्षेत्र अधिकारी निलेश बिराजदार, वनरक्षक पवार यांना माहिती दिली. त्यांनी कांबळे यांना जीप्सी घेऊन पाठवली. त्यांनी जखमी हरिणास पुढील उपचारासाठी घेऊन गेले.आणि त्या हरीनाचे प्राण वाचले. यावेळी चिवडे पाटील यांच्यासह शेतकरी बिपीन साळुंके, सगर कटारे, धीरज कटारे, बालाजी साळुंके, सुभाष साळुंके, शिवाजी साळुंके, विरेश केळेयांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

### अनुष्का पाटोळे मृत्यू प्रकरणातील आरोपीस अटक करण्याची मागणी

**लातूर :** नवोदय विद्यालय लातूर येथे शिकणारी कु. अनुष्का किरण पाटोळे या विद्यार्थिनीच्या मृत्यूची सखोल चौकशी झाली पाहिजे व आरोपीवर कठोरात कठोर कारवाई झाली पाहिजे. या मागणीसाठी आज सोमवार रोजी सकाळी ११ वाजता साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे चौक लातूर येथून जिल्हाधिकारी कार्यालय लातूरवर विराट मोर्चाचे आयोजन करण्यात आले असून या मोर्चात ओबीसी बहुजन आघाडीच्या व ओबीसी जनमोर्चाचे कार्यकर्ते सहभागी होणार असून अनुष्का किरण पाटोळेच्या मृत्यूस कारणीभूत असणाऱ्या आरोपीस त्वरित अटक करण्यात यावी अशी मागणी ओबीसी बहूजन आघाडी तर्फे करण्यात येत असून मोर्चात ओबीसी बहूजन आघाडी सक्रिय सहभाग घेणार आहे. अशी माहिती जिल्ह्याचे समन्वयक लक्ष्मण दावणकर यांनी दिली आहे.

### दुचाकीची चोरी; गुन्हा दाखल

**लातूर :** गांधीनगर भागातून जुनी वापरात असलेली दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना बुधवारी रात्री घडली. याप्रकरणी गांधी चौक पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपीविरोधात गुरुवारी गुन्हा दाखल आहे. नागेश लिंबराज घडे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार बुधवारी फिर्यादीचा मावसभाऊ प्रवीण विलास सूर्यवंशी यांच्या मालकीची दुचाकी गांधीनगर येथून चोरट्याने चोरून नेली. याप्रकरणी गांधी चौक पोलिसात गुन्हा दाखल आहे.

### एम एस बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयात कॅम्पस इंटरव्यू

**लातूर :** येथील एम एस बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलच्या पुढाकाराने सेडमॅक मेकॅट्रॉनिक्स कंपनीमार्फत घेण्यात आलेल्या इंटर्नशिप ड्राईव्हमध्ये तब्बल ४५ विद्यार्थ्यांची निवड झाली त्यामध्ये इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगचे २५ विद्यार्थी आणि इलेक्ट्रॉनिक्स इंजीनियरिंगच्या २० विद्यार्थ्यांचा समावेश आहे. लेखी परीक्षा तसेच वैयक्तिक मुलाखत घेऊन विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. तसेच इंटर्नशिपच्या कालावधीत या सर्व विद्यार्थ्यांना कंपनीतर्फे मानधन देण्यात येणार आहे. यावेळी प्लेसमेंट विभागाचे प्रमुख प्रा. श्रीकांत नागूरे, प्रा. ओमप्रकाश शिवपुजे,श्री संतोष सांगवे तसेच इतर समन्वयक प्रा.राहुल व्यवहारे, प्रा. शंकर तोडकरी,प्रा.पंकज कोकणे यांनी सर्व प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडली. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, उपाध्यक्ष श्री माधवराव पाटील चिंचोलीकर, सचिव श्री माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव श्री सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष श्री विजय रेवडकर,कार्यकारी संचालक श्री प्रदीप दिंडेगावे,.संचालक श्री राजेश्र्वर बुके, श्री बसवराज येरटे, श्री काशिनाथ साखरे, सौ ललिता ताई पांढरे, श्री महेश हलगे, श्री बाबुराव तरगुडे, श्री प्रा. गुरुलिंग धाराशिवे यांनी सर्व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.

# वृद्ध कलावंतांचे मानधन ३ वर्षांपासून अडवले

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १६ फेब्रुवारी :** राजर्षी शाहू महाराज वृद्ध साहित्यिक व कलावंत मानधन योजनेंतर्गत वृद्ध कलावंतांना देण्यात येणारे मानधन सन २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ या तीन वर्षांचे मानधन जिल्हा प्रशासनाकडून देण्यात न आल्याने वृद्ध कलावंतांचे हाल होताहेत. तेंव्हा वृद्ध कलावंतांचे मानधन का रोखण्यात आले याची प्रशासनाच्या वतीने योग्य ती चौकशी करून वृद्ध कलावंतांना लवकरात लवकर न्याय द्यावा, अन्यथा हे सर्व वृद्ध कलावंत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनात ठिय्या आंदोलन करतील असा इशारा, उपजिल्हाधिकारी, जि. प. चे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात आलेल्या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. दरम्यान, वृद्ध कलावंतांच्या वतीने आज पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनाही आपल्या मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

### सीईओ दालनात ठिय्या आंदोलनाचा इशारा

जिल्हाधिकारी तथा समिती अध्यक्षा यांच्या आदेशानुसार ७ ते ९ ऑक्टोबर २०२४ दरम्यान पात्र वृद्ध कलावंतांच्या मुलाखती व सादरीकरण प्रक्रिया पूर्ण करण्यात आली होती. मात्र त्यानंतर १४ ते १५ महिने उलटूनही निवड यादी जाहीर न होणे, हे केवळ प्रशासकीय दिरंगाई नसून थंड डोक्याने राबवलेली अमानवी उदासीनता असल्याचा आरोप कलावंतांनी केला. हे संपूर्ण कामकाज जिल्हा परिषद पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब वाघ यांच्याकडे असताना, गेल्या दीड वर्षांपासून वृद्ध कलावंतांना खोटी कारणे देऊन त्यांना



मानधनापासून दूर ठेवले जात आहे. त्यात कधी अशासकीय सदस्यांचे एकमत होत नाही, कधी शासनाचे परिपत्रक बदलले, कधी हे जुने प्रकरण माझे नाही, तर कधी आमदारांचे पत्र आले आहे, अशी उत्तरे देत वृद्ध कलावंतांना मानधन दिले जात नाही,असाही आरोप निवेदनाद्वारे करण्यात आला आहे.

या योजनेतील बहुतेक कलावंत हे ७०-८० वर्षांचे, विविध आजारांनी ग्रस्त, उपचारासाठी पैसे नसलेले आहेत. अनेकांचे जीवन हे केवळ या मानधनावर अवलंबून आहे. मात्र जि.प. प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे त्यांना उपासमार, मानसिक छळ आणि अपमानास्पद प्रतीक्षा सहन करावी लागत आहे. विशेष म्हणजे यातील बहुतांश कलावंत हे मागासवर्गीय, असंघटित, अशिक्षित लोककलावंत, तमाशा कलावंत, वादक, गायक असून, शासनाच्या नावाने त्यांच्यावर अन्याय केला जात असल्याचा संताप व्यक्त होत आहे.

तीन वर्षांचे प्रलंबित प्रकरण तातडीने निकाली काढले नाही, तर लातूर जिल्ह्यातील सर्व कलावंत, जिल्हा परिषदेचे नूतन सदस्य यांच्यासह मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनात ठिय्या आंदोलन करतील असा इशारा शाहीर सुभाष साबळे, शाहीर वामन हजारे, शाहीर बळीराम घोगरे, शाहीर सुलचंद माळी, मारोतीराव पाटील, दिनकर येडुळे, दिनेश ढोबळे, नवनाथ महाराज म्हेत्रे, शाहीर उत्तम कांबळे, शाहीर धम्मपाल सावंत, लोककलावंत संजय मुंडे, शाहीर अशोक कांबळे, तमाशा कलावंत प्रल्हाद सुरवसे व भीम गायिका जयश्री कांबळे यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

## दयानंद वाणिज्य मध्ये 'कला आणि कौशल्य' कार्यशाळेला प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १६ फेब्रुवारी :** दयानंद शिक्षण संस्था अंतर्गत कार्यरत असलेल्या दयानंद वाणिज्य महाविद्यालयात युवती कल्याण मंडळाच्या वतीने ''कला आणि कौशल्य'' या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली. विद्यार्थिनींमधील सर्जनशीलता, आत्मविश्वास आणि विविध कलागुणांना वाव देण्याच्या उद्देशाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर यांनी मार्गदर्शन करताना कला आणि कौशल्य यांचे वैयक्तिक तसेच व्यावसायिक आयुष्यातील महत्त्व अधोरेखित केले. आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ शैक्षणिक ज्ञान पुरेसे नसून विविध कौशल्ये आत्मसात करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. या दोन दिवसीय कार्यशाळेत चॉकलेट बुके, फोटो बुके, रेझिन आर्ट वर्क, उलन पॅच रांगोळी अशा उपक्रमांवर तज्ज्ञ मार्गदर्शकांनी प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण दिले. एकूण ७० विद्यार्थिनींनी या कार्यशाळेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवून उपक्रमांचा लाभ घेतला.

### युवती कल्याण मंडळाचा पुढाकार; ७० विद्यार्थिनींचा सहभाग

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर उपस्थित होते. यावेळी उपप्राचार्य गणेश लहाने, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. मनीषा अष्टेकर, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. विशाल वर्मा, बीबीए-एमबीए विभाग प्रमुख वैशाली सातपुते,




बीसीए-एमसीए विभाग प्रमुख डॉ. शशिकांत स्वामी तसेच युवती कल्याण मंडळाच्या प्रभारी डॉ. प्रिया वर्मा मंचावर उपस्थित होते. समारोपप्रसंगी सहभागी विद्यार्थिनींना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. स्वप्नाली शरणार्थी यांनी केले, तर प्रा. कृष्णाई पाचंगे यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. गीतांजली जोशी, प्रा. दिपाली शेख, प्रा. स्नेहल पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले. ही कार्यशाळा विद्यार्थिनींसाठी प्रेरणादायी व उपयुक्त ठरली असून, भविष्यात अशाच प्रकारचे उपक्रम राबविण्याचा मानस संस्थेतर्फे व्यक्त करण्यात आला आहे.

## 'महा निर्यात इग्नाईट कन्व्हेंशन २०२६' अंतर्गत लातूरमध्ये एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १६ फेब्रुवारी :** राज्यातील सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग (एमएसएमई) क्षेत्राच्या विकासाला चालना देण्यासाठी आणि निर्यात वृद्धीस प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या उद्योग विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या 'महा निर्यात इग्नाईट कन्व्हेंशन २०२६' अंतर्गत लातूर जिल्ह्यात एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा दिनांक १८ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ९.३० ते दुपारी २.०० वाजेपर्यंत उद्योग मित्र हॉल, दै.एकमत भवनच्या पाठीमागे, एम.आय.डी.सी., लातूर येथे आयोजित करण्यात येणार आहे.

जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या कार्यशाळेत एमएसएमई उद्योजक, निर्यातदार, निर्यातक्षम उद्योजक, नवउद्योजक, औद्योगिक संस्था व संघटना, शेतकरी सहकारी संस्था, प्रक्रिया उद्योग केंद्रे, बँक प्रतिनिधी, संशोधक तसेच जिल्हा निर्यात प्रचालन समितीचे सदस्य यांना विशेष आमंत्रित करण्यात आले आहे. कार्यशाळेत पुणे येथील 'अपेडा'चे महासंचालक, एमएसएमईचे सहायक संचालक, मैत्री कक्षाचे अधिकारी, इंडियन पोस्टचे अधिकारी, अधिक्षकीय कृषी अधिकारी, एसबीआयचे निर्यात वित्त पुरवठा व्यवस्थापक आदी तज्ज्ञांकडून निर्यात प्रक्रिया, उद्योग विकास, शासकीय योजना, एक जिल्हा एक उत्पादन (जऊजझ) उपक्रम, निर्यात प्रोत्साहन योजना, वित्तपुरवठा सुविधा इत्यादी विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

राज्यातील एमएसएमई क्षेत्राची कार्यक्षमता व उत्पादकता वाढविणे, उद्योजकीय वातावरण अधिक व्यापक करणे, रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करणे तसेच निर्यातवृद्धीला चालना देणे या उद्देशाने राज्य व केंद्र शासनाच्या विविध विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती उद्योजकांना एकाच व्यासपीठावर उपलब्ध करून देण्यासाठी ही कार्यशाळा उपयुक्त ठरणार आहे. सर्व संबंधित उद्योजक, निर्यातदार व घटकांनी या कार्यशाळेत मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक यांनी केले आहे.


## शिवजन्मोत्सव समितीच्या बुध्दीबळ स्पर्धेस उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १६ फेब्रुवारी :** छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने शिवजयंतीनिमित्त रविवारी (दि.१५) घेण्यात आलेल्या बुध्दीबळ स्पर्धेस स्पर्धकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. १७५ स्पर्धकांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवून बुध्दीबळ अन लातूरची जणू वेगळी ओळखच दिली.

आर.एन मोटेगावकर विद्यालयात झालेल्या या स्पर्धेचे उदघाटन मोटेगावकर स्कुलच्या संचालिका मिनल मोटेगावर यांच्या हस्ते छत्रपती शिवरायांच्या प्रतिमा पुजनाने व दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रध्दासुमने अर्पण करुन झाले. अध्यक्षस्थानी आरटीओ प्रमोद सरोदे होते.

शिवजन्मोत्सव समितीचे अध्यक्ष डॉ. हर्षवर्धन राऊत, अॅड. उदय गवारे, अॅड. शिवकुमार जाधव,



डी.एस. पाटील, प्राचार्य नेताजी जाधव, बुध्दीबळ प्रशिक्षक श्रीराम साने, अविनाश देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. मीनल मोटेगावकर यांनी महापुरुषांच्या जयंत्यांना सामाजिक बांधिलकीची जोड देत समिती घेत असलेले कार्यक्रम व राबवत असलेले उपक्रम दिशादर्शक असल्याचे सांगत खेळाडुंनीखिलाडू वृत्ती बाळगळी पाहीजे असे नमुद केले. श्रीराम साने यांनी विद्यार्थ्यांसाठी शिवजन्मोत्सव समिती राबवत असलेल्या उपक्रमाचे कौतूक करीत समितीप्रति कृतज्ञता व्यक्त केली.

आरटीओ सरोदे यांनीही मनोगत व्यक्त केले. परिक्षक म्हणून श्रीराम साने, अमित बियाणी, अण्णासाहेब साठे, श्रीकांत मंत्री, विकी महेंद्रकर, पूजा शेळके यांनी काम पाहिले. प्रास्ताविक अॅड. उदय गवारे यांनी केले सुत्रसंचालन भीम दुनगावे यांनी केले. डी.एस. पाटील यांनी आभार मानले. सकाळी दहा वाजता सुरू झालेल्या स्पर्धा रात्री सात वाजेपर्यंत चालल्या. स्पर्धकांत खूप उत्साह होता.त्यांच्यासाठी त्यांच्या पालकांनीही दिवसभर स्पर्धास्थळी बैठक दिली होती.

## न्यायदान प्रक्रियेत सखोल अभ्यासाची गरज: मुख्य जिल्हा न्यायाधीश संजय भारुका

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १६ फेब्रुवारी :** न्यायदान ही केवळ एक प्रक्रिया नसून ती एक मोठी जबाबदारी आहे. कायद्याच्या गुंतागुंतीच्या चौकटीत सामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी वकिलांनी आणि भावी न्यायाधीशांनी कायद्याचा सखोल अभ्यास करणे ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन मा. संजय भारुका मुख्य जिल्हा न्यायाधीश जिल्हा व सत्र न्यायालय लातूर यांनी दयानंद शिक्षण संस्थेच्या दयानंद विधी महाविद्यालयात राष्ट्रीय स्तरावरील अभिरूप न्यायालय स्पर्धेच्या (नॅशनल मूट कोर्ट कॉम्पिटिशन) समारोप समारंभ प्रसंगी केले. दि. १४ फेब्रुवारी २०२६ रोजी उत्साहात पार पडलेल्या या स्पर्धेसाठी परीक्षक न्यायाधीश म्हणून मा. आर वाय. शेख निवृत्त मुख्य जिल्हा न्यायाधीश, लातूर, ड. शैलेश चपळगावकर मुंबई उच्च न्यायालय, आणि एमआयटी लॉ स्कूल पुणे येथील डॉ. भावना कडू यांनी काम पाहिले. या स्पर्धेमध्ये देशाच्या कानाकोपऱ्यातून संघ सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांचे सादरीकरण, त्यांचे भाषेवरील प्रभुत्व, तथ्य, कायद्याची मांडणी, हजरजबाबीपणा तसेच कोर्टामधील शिस्त, युक्तिवाद, न्यायालयीन प्रश्र्नांना दिली जाणारी उत्तरे, मेमोरियल चे लिखाण इत्यादी गोष्टींचे मूल्यमापन करून विद्यार्थ्यांना एकूण ५५००० रुपयांच्या बक्षिसांचे वितरण करण्यात आले. प्रथम पारितोषिक मराठवाडा मित्र मंडळाचे शंकरराव चव्हाण विधी महाविद्यालय पुणे संघाला त्यांच्या अपवादात्मक वकिली कौशल्यासाठी कायदेशीर युक्तिवादाची स्पष्टता आणि न्यायालयीन शिस्तीसाठी १५००० रुपयांचे रोख बक्षीस, ट्रॉफी आणि उत्कृष्टतेचे प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच दिवंगत डव्होकेट अजय भारतलाल बाजपेयी यांच्या स्मृति प्रित्यर्थ मुंबई उच्च न्यायालयाच्या अधिवक्ता ड. अंजली दुबे यांच्याकडून ११००० रुपयांचे रोख पारितोषिक विजेत्या संघाला देण्यात आले. या स्पर्धेमधील उपविजेता सिम्बॉयसिस लॉ स्कूल पुणे यांना त्यांच्या प्रेरक सबमिशन आणि तथ्ये तसेच कायद्यावर मजबूत प्रभुत्व यासाठी १०००० रुपयांचे रोख बक्षीस, ट्रॉफी आणि उत्कृष्टतेचे प्रमाणपत्र देउन गौरविण्यात आले. दुसऱ्या क्रमांकावर दयानंद लॉ कॉलेज सोलापूर येथील




संघाला प्रशंसनीय कामगिरीबद्दल ३००० रुपये रोख बक्षीस, ट्रॉफी आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले तसेच विशेष पुरस्कारांमध्ये सर्वोत्तम वादी पुरस्कार श्रीमती कमलाबेन गंभीरचंद शहा लॉ स्कूल माटुंगा मुंबई यांना त्यांनी केलेले उत्कृष्ट मसुदा लिखाण तसेच संशोधन आणि अचूक कायदेशीर स्पष्टीकरण यासाठी ५००० रुपये रोख बक्षीस, ट्रॉफी आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. सर्वोत्तम प्रतिवादी पुरस्कार नारायणराव चव्हाण लॉ कॉलेज, नांदेड येथील संघाला अनुकरणीय मेमोरियल तयारीसाठी ५००० रुपये रोख बक्षीस, ट्रॉफी आणि प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. सर्वोत्तम युक्तिवादकर्ता पुरस्कार श्रीमती जैनब बेगम अब्दुल रहीम या विद्यार्थिनीला तिची प्रभावी न्यायालयीन उपस्थिती, सुव्यवस्थित युक्तिवाद आणि न्यायालयीन प्रश्र्नांना आत्मविश्र्वासाने दिलेल्या उत्तरासाठी ५००० रुपये रोख बक्षीस, ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. सर्वोत्तम युक्तिवादकर्ता (रनर-अप) श्रीमती आकांक्षा जमादार, श्री नवलमल फिरोदिया लॉ कॉलेज पुणे यांना त्यांच्या उत्कृष्ट मौखिक वकिली आणि अभिव्यक्तीच्या स्पष्टतेसाठी ३००० रुपये रोख बक्षीस, ट्रॉफी आणि प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. उत्तेजनार्थ पुरस्कारांमध्ये एम एस पी मंडळाचे श्री शिवाजी लॉ कॉलेज परभणी, श्री नवलमल फिरोदिया लॉ कॉलेज पुणे, श्रीमती कमलाबेन गंभीरचंद शहा लॉ स्कूल माटुंगा मुंबई या संघाला प्रत्येकी ३००० रोख बक्षीस ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या स्पर्धेने पुन्हा एकदा दयानंद विधी महाविद्यालय लातूरची व्यावहारिक कायदेशीर शिक्षण, वकिली व्यवसायातील नैतिकता आणि राष्ट्रीय स्तरावरील शैक्षणिक उत्कृष्टतेला प्रोत्साहन देण्याची बांधिलकी अधोरेखित केली आहे.

या सर्व बक्षीसांचे वितरण उपस्थित न्यायाधीशांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी उपस्थित न्यायाधीशांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या भावी करिअरसाठी शुभेच्छा दिल्या व अशा प्रकारच्या स्पर्धांमधून घेतलेला सहभाग विद्यार्थ्यांना त्यांची कायद्याप्रती असलेली जबाबदारी अधोरेखित करतो याची जाणीव करून दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन आदिती बिराजदार व प्रतीक्षा चव्हाण या विद्यार्थिनींनी केले. यावेळी प्राचार्य डॉ. पुनम नाथानी, सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ड.रवींद्र शेट्टी व ड. मुस्तफा पठाण यांनी कठीण परिश्रम घेतले.

## संक्षिप्त...

### लाल बहादुर शास्त्री प्रा. शाळेत प.पू. गोळवलकर गुरुजी यांची जयंती साजरी

**उदगीर :** येथील भारतीय शिक्षण प्रसारक संस्था,अंबाजोगाई द्वारा संचलित लाल बहादुर शास्त्री प्राथमिक विद्यालयात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे द्वितीय सरसंघचालक प.पू.गोळवलकर गुरुजींजी तिथीप्रमाणे जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून सुधाकर पोलवार तर, प्रमुख पाहुणे म्हणून श्याम गौंडगावे, विभाग प्रमुख श्रीमती सुरेखाबाई कुलकर्णी व मुख्याध्यापक अंकुश मिरगुडे यांची विशेष उपस्थिती होती. मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते प्रतिमा पूजन व दिपप्रज्वलन करण्यात आले. सर्व मान्यवरांचे गुलाब पुष्प देऊन शाळेच्या वतीने स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते श्याम गौंडगावे यांनी संघ शताब्दी वर्षानिमित्त आपल्या संस्थेत व शाळेत विविध उपक्रम चालू आहेत, द्वितीय सरसंघचालक प.पू.गोळवलकर गुरुजींविषयी सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना दिली. मुख्याध्यापक अंकुश मिरगुडे यांनी प.पू.गोळवलकर गुरुजी यांच्या जीवनातील प्रसंग सांगितले व सर्व विद्यार्थ्यांनी छोट्या छोट्या कामातून देशभक्ती जोपासावी असे सांगितले. अध्यक्षीय समारोपपर भाषणात सुधाकर पोलावार यांनी सर्व विद्यार्थ्यांनी 'राष्ट्र प्रथम' म्हणून काम केले पाहिजे.प.पू.गोळवलकर गुरुजीकडून आपल्याला खूप काही शिकण्याची प्रेरणा मिळते.सर्वांनी सेवाभाव अंगिकारण्याचे आवाहन केले. वैयक्तिक पद्य श्रीमती सुरेखाबाई कुलकर्णी यांनी गायले, सुत्रसंचलन सौ. सोनिया देशपांडे यांनी तर,आभार सौ.भाग्यश्री स्वामी यांनी मानले.

### चाकूर येथे साई शिवालय मंदिरात भाविकांची गर्दी

**चाकूर :** शिवपिंडच्या आकारातील जगातील एकमेव मोठे मंदिर असलेल्या सुप्रसिद्ध साईनंदनवनम चाकूर येथील जगप्रसिद्ध साईशिवालय मंदिर येथे महाशिवरात्रीनिमित्त भाविक भक्तांनी दिवसभर दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. महाशिवरात्रीच्या एकादशीचा शुभारंभ रात्री १२.०५ वाजता शिवपिंडीच्या मंदीरातील शिवलिंगास महाअभिषेक करण्यात आला, पहाटे ५.३० वाजता श्रीकृष्ण सत्यसाई संस्थानचे सचिव विशाल जाधव यांनी रूद्राभिषेक केला, सकाळी ८ वाजता महाआरती करण्यात आली. यावेळी भाविक भक्त उपस्थित होते. दुपारी १ ते ३ या वेळेत लातूर येथील महिला भजनी मंडळ यांनी भजनाचा कार्यक्रम सादर केला. दर्शनासाठी येणाऱ्या भाविक-भक्तासाठी एकादशीच्या फराळाच्या महाप्रसादाचे आयोजन दिवसभर करण्यात आले होते. सायंकाळी ६ वाजता महाआरती करण्यात आली. यावेळी संस्थानचे अध्यक्ष उत्तमराव जाधव आणि कुटुंबीय, अमोल जाधव, तातेराव शिंदे, दिलीप भदाडे, अमोल पवार यांच्यासह चाकूर पंचक्रोशीतील भाविक-भक्तांची मोठी उपस्थिती होती. अतिशय उत्साहाच्या धार्मिक वातावरणात भक्तिभावाने महाशिवरात्र एकादशी शिवालयात साजरी करण्यात आली आहे

### एक मार्चला बाल वक्ता स्पर्धा

**लातूर :** बालरंगभूमी परिषद ही बालकांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्याचे कार्य करत असून त्याचाच एक भाग म्हणून बाल वक्ता वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन १ मार्च रोजी केले आहे. ही स्पर्धा उद्योग भवन परिसरातील निश्र्चय संस्कृत क्लासेस येथे सकाळी ११ वाजता होणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून लातूरमधील बालरंगभूमी परिषद आणि 'निश्र्चय' यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन केले आहे. ही स्पर्धा तीन गटांमध्ये होणार आहे. यात पहिली ते चौथी या गटासाठी 'बाल शिवाजी' आणि 'माझा आवडता देशभक्त' हे विषय तर पाचवी ते सातवी गटासाठी 'आजी आजोबा माझे गुगल' आणि 'मोबाइल शाप की वरदान' हे विषय असतील. तर आठवी ते दहावी गटासाठी 'डिजिटल युगातही पुस्तकं माझे मित्र' आणि 'आजचा विद्यार्थी उद्याचा भारत' असे विषय स्पर्धेसाठी आहेत. प्रत्येक स्पर्धकासाठी सादरीकरणाचा वेळ किमान ५ व कमाल ६ मिनिटे असेल. स्पर्धेत नाव नोंदणीची शेवटची तारीख २५ फेब्रुवारी असणार आहे. विजेत्यांना सन्मानचिन्ह, प्रशिस्तपत्र दिले जाणार आहे. तसेच सहभागी स्पर्धकास सहभाग प्रमाणपत्र दिले जाईल. विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन बालरंगभूमी परिषदेच्या वतीने करण्यात आले आहे.

### श्री लक्ष्मीपती बालाजी मंदिरचा वर्धापन सोहळा

**जळकोट :** प्रतिनिधी जळकोट येथील बालाजी मंदिरामध्ये १५ वा वर्धापन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त ह. भ. प चक्रीनाथ महाराज पंढरपूर यांच्या अमृतवाणीतून श्रीमद भागवत कथा ऐकावयास मिळणार आहे. दि १८ फेब्रुवारी ते २५ फेब्रुवारी या कालावधीत विविध कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त दि. १८ फेब्रुवारी रोजी अनिरुद्ध महाराज बाराळीकर, दि १९ रोजी शंकर महाराज आळंदीकर, दि २० रोजी किशोर महाराज शिवनीकर, दि २१ रोजी नारायण महाराज पालीमकर, दि २२ रोजी केशव महाराज उखळीकर, दि २३ रोजी चक्रिनाथ महाराज पंढरपूरकर, दि २५ रोजी नामदेव महाराज दापकेकर यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे. दररोज सकाळी ६ ते ९ श्रीचा अभिषेक, दुपारी १ ते ५ श्रीमद् भागवत कथा, दुपारी ५ ते ६ विष्णुसहस्रनाम, रात्री ९ ते ११ हरिकीर्तन आदी दैनंदिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दि २४ रोजी श्री च्या वाढदिवसानिमित्त सायंकाळी ५ ते ६ कल्याण उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे तसेच २३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ ते ७वाजता चक्रीभजन आयोजित करण्यात आले आहे. सकाळी १० ते एक काल्याचे कीर्तन होणार आहे. जळकोट येथील श्री लक्ष्मीपती बालाजी मंदिरात आयोजित विविध धार्मिक कार्यक्रमाचा पंचक्रोशीतील नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# फुलावर नाराज नाही ! फुलाच्या पुजारीवर नारज - धर्मपाल देवशेटे

**तभा वृत्तसेवा/संगम डोंगरे**
**जळकोट , दि. १६ फेब्रुवारी :**

जळकोट भारतीय जनता पक्षामधील काही नेत्यांनी मला जानून बुजून हेतुपुरस्पर दुलक्ष करून तिकीट मिळून नये यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस सोबत युती केली त्यामुळे मला तिकीट मिळाले नाही'. त्यामुळे मी माझ्या मतदार संघातील कार्यकर्तेचा विचार विनिमय करून त्या सर्वाचे मत जाणून घेऊन मी शेवटी कार्यकत्याच्या निर्णया प्रमाणे अंतिम क्षणी निवडणुकीच्या रंणागणार ना ईलाजावास्तर उभे राहिलो. माझ्या जीवा भावाच्या एकनिष्ठ कार्यकर्त्यांच्या जिवावर मी अपक्ष म्हणून वाजरंवाडा जिल्हा परिषद गटात निवडणूकीस बसलो आणि येथील गोर गरिब कष्ठकरी भोळी भाबडी सर्व आठरा पकड जाती धर्मातील मानसाच्या आशिर्वादाने धनशक्ती विरूध अपक्ष उमेदवार म्हणूण निवडनुकीत उभे राहून निवडून येऊन जिल्हा परिषद सदस्य झालो आहे. यापुढेही मी माझ्या सर्व खंबीर कार्यकर्ते व सामान्य जनतेचा विचार घेऊन आगामी काही दिवसात भारतीय जनता पार्टीला माजी जर त्यांना गरज वाटत नसेल तर मला माझा निर्णय घेण्याचा पुर्ण अधिकार असून शिवसेना (शिदे गट) किंवा भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाची

#### पुढचे पाऊल काँग्रेस - शिवसेनेच्या दिशेने

शेवटी वाट धरावी लागेल असे सुचोवात नवनिर्वाचित वांजरवाडा जिल्हा परिषद गटाचे अपक्ष सदस्य धर्पमाल देवशेट्टे यांनी पत्रकार परिषद घेऊन आपली भूमिका मांडली आहे.

प्रत्येक निवडणुकीत मला डावळले जाते

लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक निवडणूक असो की कृषी उत्पन्न बाजार समिती असो प्रत्येकवेळी तुमचा विचार करू असे आश्र्वासन मिळते आणि शेवटी मात्र नकळत तिकिट कापून एकटा पाडण्याचे षडयंत्र केले जाते . सन २०१७ मध्येही मला भाजप पक्षाने शेवटया क्षणी तिकीट नाकरले होते. त्यावेळी पण मी अपक्ष म्हणून याच गटातून निवडणुक लढविली होती. त्यावेळी सातशे मतांनी पराभव झाला. जिल्हा परिषद निवडणूक २०२६ मध्ये मला शेवटच्या क्षणा पर्यंत मला भाजपने बी फार्म देतो असे आश्र्वासन दिले होते. मात्र अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवसी भाजपाने राष्ट्रवादी सोबत युती करुन माझा पत्ता कट करून भाजपा राष्ट्रवादी



रिपाई शिवसेना शिंदे गटाकडून विठ्ठल चव्हाण यांना उमेदवारी दिली.

मी तसुभरही डळमळलो नाही न दार मानली नाही. मला ठाम विश्र्वास होता मी जमीवरच कार्यकर्ता म्हणून काम केले आहे आणि करत राहीन. मला नेता कधीच व्हायच नाही का ? तर नेत्यांना जनतेत जावून खोट आश्र्वासनाची खैरात करावी लागते. जळकोट कृषि उत्पन्न बाजार समिती निवडणुकीत माजी आ. गोविदअण्णा केंद्रे यांनी भाजपचेच पैनल पाडले. असे आरोप करत.

ज्यांना आम्ही सर्व कार्यकर्ते पायावर भिंगरी बांधून जीवाचे रान करून निवडून आनलो तेच आज पक्षाचे मालक बनले आहेत . विद्येमान आमदार कार्यकर्ते नव्हे तर आता पक्षच खरेदी करायला निघाले आहेत असा घणाघात याप्रसंगी बोलताना केला. या पत्रकार परिषदेसाठी जळकोट तालुक्यातील पत्रकार विवेक पोतदार, पत्रकार संघाचे अध्यक्ष शरद पवार, ओमकार सोनटक्के, शिवशंकर काळे, संगम डोंगरे, प्रा डॉ नामदेव राठोड, कैलास पाटील गौड, अजित मोमीन, न्ड अमोल कळसे, माधव होणराव, राजेंद्र धूळशेट्टे, मारुती फुलारी, माधव होणराव, महेश देशमुख, नामदेव केंद्रे, आदी पत्रकार मंडळी उपस्थित होते.

> नाराज आहे. मी स्वभीमानी कार्यकर्ता आहे. मी माझा स्वाभिमान कधीच गहाण ठेवणार नाही. ज्या पक्षात मी माझे गेली पस्तीस वर्ष आयुष्य वेचले आहे. पक्षासाठी अविरत काम केले, दिवस रात्र वेळ दिला. शक्ती वापरली, मी माझ्या जवळचा पैसा खर्च केला एवढे करूनही कुठेच मान सन्मान होत नाही. मी स्वाभिमानी कार्यकर्ता आहे नेत्याचे तळवे चाटणारा नाही आज नेत्याची तळवे चाटणाऱ्या बडण्याची संख्या वाढत आहे. भाजप पार्टीमध्ये गट तट झाले आहेत. जळकोट भाजपा तालुकाध्यक्ष पद मिळवताना चोहोबाजूनी फिल्डीग लावून माझा काटा काढला जातो. मी काय गुन्हा केला आहे. प्रत्येक वेळी मला डावळले जात आहे.
>
> **-धर्मपाल देवशेट्टे**
> **जि.प. सदस्य वांजरवाडा गट**
> **ता. जळकोट**

# रेणापूरच्या बालाजी मंदीरात अखंड हरीनाम सप्ताह

**तभा वृत्तसेवा**
**रेणापूर, दि. १६ फेब्रुवारी :**

येथील श्री बालाजी मंदीरात अखंड हरीनाम सप्ताह बालाजी, ज्ञानेश्र्वर मंदिरातअखंड हरिनाम सप्ताह, रेणापुर पारायणश्रीमद् भागवत कथाज्ञान यज्ञ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या रौप्य महोत्सवी सप्ताह सोहळ्याची सुरुवात बुधवार दि.१८ फेब्रुवारी पासून होत असुन सांगता बुधवार दि. २५ रोजी होणार आहे. बुधवार दि.१८ते मंगळवार दि.२४ पर्यंत दररोज दुपारी१:३० ते ५ या वेळत श्रीमद भागवत कथा ह.भ.प.प्रभाकर महाराज गिरी पानगावकर हे सांगणार आहेत.

तसेच सप्ताह काळात दररोज पाहटे पासुन नित्य कार्यक्रम काकडा, भजन, ज्ञानेश्र्वरी पारायण,हरिपाठ,कीर्तन,हरीजागर



होणार आहे

दरोज रात्री८ते१० या वेळेत नामवंत महाराजांचे किर्तन होणार आहेत बुधवार दि१८रोजी ह.भ.प.पांडुरंग महाराज कोकाटे नांदगावकर ,गुरुवार दि १९ रोजी ह.भ प.संजय महाराज खडकउमरगेकर, शुक्रवार दि.२०रोजी ह.भ.प.उद्धव महाराज रमजानपूरकर, शनिवार दि.२१ रोजी ह.भ.प.वारकरी भूषण ज्ञानेश्र्वर महाराज कदम, रविवार दि२२ रोजी ह.भ.प.ज्ञानसिंधू संदिपान महाराज हासेगावकर, सोमवार दि२३ रोजी ह.भ.प.गाथामूर्ती कृष्णदास महाराज, मंगळवार दि. २४ रोजी ह.भ.प.अच्युत महाराज दस्तापुरकर बुधवार दि२५ रोजी काल्याचे किर्तन सकाळी१० ते१ या वेळत ह.भ.प.जगन्नाथ देशमुख महाराज श्रीक्षेत्र पंढरपूरकर यांचे होणार आहे. याअखंड हरिनाम सप्ताह निमित्त होणाऱ्या श्रीमद भगवत कथाज्ञान यज्ञ, पारायन , हरीपाठ, किर्तन सह सर्व कार्यक्रमाचा लाभ भाविक भक्तांनी घ्यावा असे आवाहन श्रीबालाजी,ज्ञानेश्र्वर मंदिर सप्ताह समिती ग्रामस्थाच्या वतीने करण्यात आले आहे.

# दक्षिण मध्य रेल्वेच्या महाप्रबंधकाचा दौरा

## खासदार व आमदारानाही निमंत्रण : विविध मागण्या मंजुरीकडे लक्ष

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि. १६ फेब्रुवारी :** दक्षिण मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक संजयकुमार श्रीवास्तव हे विभागीय व्यवस्थापक श्री गोपालकृष्णनसह आपल्या सर्व उच्चस्पद अधिकाऱ्यांसोबत दिनांक १७ फेब्रुवारी २०२६ रोजी सुरक्षा पाहणी दौऱ्यावर दुपारी १२ वाजता येणार आहेत.

या दौऱ्यात माजी मंत्री संजय बनसोडे, खासदार डॉ. शिवाजी काळगे यांच्यासह रेल्वे संघर्ष समितीचे अध्यक्ष रमेश आंबरखाने, नगराध्यक्ष स्वाती सचिन हुडे व सामाजिक संस्थांचे पदाधिकारी, पत्रकार उपस्थित राहणार आहेत. संजय कुमार श्रीवास्तव यांनी ११ जुलै २०२५ रोजी दक्षिण मध्य रेलवे (डउठ) च्या महाप्रबंधक (ऋच्) पदाचा पदभार स्वीकारला असून त्यांच्या या भागात पहिल्यांदाच सुरक्षा पाहणी दौऱ्यास येत आहेत.

या दौऱ्यात हैदराबाद-पुणे-मुंबई वंदे भारत स्लीपर वर्जन, हैदराबाद इंटरसिटी सोबत स्टेशन विकासाबाबत चर्चा होईल.

संघर्ष समितीच्या माध्यमातून बेलसकरगा येथे नवीन क्रॉसिंग स्टेशन, लातूर रोड व परळी येथे नवीन बायपास लाईन,विकाराबाद परळी वैजनाथ २६५ किमी दुहेरीकरण लाईन मंजूर असून त्यास गती देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. अनेक रेल्वे प्रस्तावित असून त्या लवकरात लवकर चालू करण्याचा प्रयत्न या दौऱ्यात करण्यात येणार आहे. हैदराबाद - अहमदाबाद, सिकंदराबाद - जम्मूतवी, मछलीपटनम - परळी,अमरावती - तिरुपती रेल्वे सुरू करण्याचा समावेश आहे.

स्टेशन विकास अंतर्गत ठझऋ रेल्वे पोलिस स्टेशन, दुसरा प्लॅटफॉर्म निवारा शेड, वेटींग हॉल, गुड्स गोडाऊन, अमृत भारत स्टेशन योजने मध्ये उदगीर आणि लातूर रोडचा समावेश करावा अशी मागणी होईल.

या महत्वाच्या दौऱ्यात लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत अनेक मागण्याचे निरसन होण्याची शक्यता असून त्या अनुषंगाने दौऱ्याला महत्व आले असल्याची माहिती उदगीर रेल्वे संघर्ष समिती सचिव मोतीलाल डोइजोडे यांनी दिली.

# जल जीवनचे काम अर्ध्यावर सोडून गुत्तेदार फरार

## सामाजिक कार्यकर्त्याचे गट विकास अधिकाऱ्यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि. १६ फेब्रुवारी :** शिरूर अनंतपाळ तालुक्यातील जोगाळा ते थेरगाव जल जीवन मिशन अंतर्गत काम सुरू होवून अडीच ते तीन वर्ष झाली पाइप लाइन अंदाजे चार किलो मीटर अंतर आहे.परंतु संबंधित गुत्तेदाराला तीन -तीन वर्ष कामाला लागत असतील तर थेरगावच्या नागरिकांना जल जिवनचे पाणी मिळणार कधी?असा प्रश्र्न २६जानेवारी २०२६रोजी झालेल्या ग्रामसभेत अजित दिलीप शिंदे यांनी उपस्थित केला होता.परंतु ग्रामविकास अधिकारी किशोर विभुते हे येथे गेल्या काही दिवसांपासून ग्रामपंचायत कार्यालय थेरगाव रुजू झाले असल्यामुळे संबंधित कामासंदर्भात पुरेशी माहिती उपलब्ध नसल्याने या प्रश्र्नावर चर्चा करण्यात आली नसल्याने अजित शिंदे यांनी गटविकास अधिकारी श्रीमती खिंडे मॅडम यांच्याकडे तक्रारी अर्ज दाखल केला आहे.या तक्रारीतील प्रमुख मागणी म्हणजे नवीन पाईपलाईनचे काम अर्धवट सोडल्यामुळे व जल जिवनच्या कामास विलंब केल्यामुळे संबंधित कंत्राटदारावर कठोर कारवाई करण्यात यावी अशी विनंतीवजा मागणी करण्यात आली आहे.

जोगाळा शिवारातील विहिरीतून थेरगाव येथे पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने नवीन पाईपलाईन टाकण्याचे काम २०२१/२२दरम्याण मंजूर केले मात्र सदर काम अद्यापही अपूर्ण आहे . गावातील जुनी यंत्रणा कोलमडल्यामुळे तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली आहे.

गावात सध्या १०-१० दिवस पाणी येत नाही. उन्हाळा तोंडावर अल्याने पिण्याच्या व सांडपाण्याचे प्रचंड हाल होत आहेत. नवीन पाईपलाईनचे काम कोणत्या कारणास्तव रखडले आहे या प्रश्र्नाचे उत्तर कळणे थेरगावकरांना कठीण झाले आहे.का कंत्राटदाराने याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे या पुर्ण गावाचे लक्ष लागले आहे.

दि. २६ जानेवारी रोजी झालेल्या ग्रामसभेमध्ये ग्रामसेवक किशोर विभूते यांनी संबंधित कंत्राटदाराला फोन केला होता. त्यावेळी कंत्राटदाराने तात्काळ कामावर येतो असे आश्र्वासन दिले होते, परंतु आजतागायत कंत्राटदार फिरकले नाहीत किंवा कामही सुरू झाले नाही. जर उन्हाळा सुरू होण्यापूर्वी पाईपलाईनचे काम पूर्ण होवून थेरगावला पाणी पुरवठा कार्यान्वित झाला नाही, तर ग्रामस्थांना पाण्यासाठी वणवण फिरावे लागेल. गुत्तेदाराच्या निष्काळजीपणामुळे गावावर ही वेळ आली आहे.अशी चर्चा गावकऱ्यातुन ऐकावयास मिळत आहे.

सदर गुत्तेदाराने कामात हलगर्जीपणा केल्याबद्दल तात्काळ कठोर कारवाई करण्यात यावी, सात दिवसांत पाईपलाईनचे काम युद्धपातळीवर पूर्ण करून पाणीपुरवठा सुरळीत करावा.या प्रमुख मागण्यांकडे प्रशासनाने लक्ष केंद्रित करून योग्य ती कारवाई करावी अन्यथा

येत्या ७ दिवसांत यावर योग्य ती कार्यवाही न झाल्यास, थेरगाव ग्रामस्थांच्या वतीने आम्ही पंचायत समिती शिरूर अनंतपाळ येथे पाण्याची घागरी घेऊन धरणे आंदोलन करू. याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील असे या निवेदनात म्हटले आहे.

ग्रामसभेत संबंधित गुत्तेदाराला मी फोन केला होता त्यांनी तात्काळ राहिलेले कामाला चार दिवसांत सुरुवात करतो असे बोलले होते परंतु या कामासाठी त्यांच्याकडून कुठलाही प्रतिसाद मिळाला नाही.

**-किशोर विभुते**
**ग्रामविकास अधिकारी**

**राहिलेली अर्धवट कामे**

पाइपलाइनच्या एअर वाल बसवने, नवीन टाकील पाइप बसवून त्याच्या वाल फिटिंग करणे, विहीर चे दहा फूट खोदकामकरणे,आडवे बोअर घेणं, जुन्या पाइपलाइन चे दिड किमी चे पाइपलाइन काम करणे अशी राहिलेली अर्धवट कामे आहेत.

**-औदुंबर पांचाळ**
**ग्रामपंचायत कर्मचारी**

# जवळगा येथील देवणी जातीची गाय महा पशुधन एक्स्पोमध्ये सर्वप्रथम

**तभा वृत्तसेवा/रियाज मोमीन**
**वलांडी, दि. १६ फेब्रुवारी :** देवणी तालुक्यातील जवळगा येथील प्रगतिशील पशुपालक धोंडीराम सुर्यवंशी यांच्या देवणी जातीच्या गायीने प्रथम क्रमांक पटकावत गावाचे नाव पुन्हा एकदा राज्यभर उज्ज्वल केले आहे. परळी वैजनाथ येथे संपन्न झालेल्या महा पशुधन एक्स्पोमध्ये या स्पर्धेत राज्यातील राज्यभरातील नामांकित पशुपालकांनी सहभाग घेतला होता.

कडवी चुरस असतानाही धोंडीराम सुर्यवंशी यांच्या देवणी गायीने आपल्या तंदुरुस्ती, सशक्त पायांची रचना आणि दुधाळ क्षमतेमुळे सर्वांचे लक्ष वेधून घेतले. उत्कृष्ट बांधा, संतुलित शरीररचना, उच्च दूध उत्पादन क्षमता आणि शुद्ध वाण वैशिष्ट्यांच्या आधारे परीक्षकांनी या गायीची निवड केली असल्याचे त्यांनी सांगितले.




विजेत्यांचा सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि रोख पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला. यापूर्वी पशुपालक धोंडीराम सुर्यवंशी यांच्या गायीने देशपातळीवर दिल्ली,मद्रास,बेंगलोर,सिंधुदुर्ग अशा ठिकाणी सहभाग घेत प्रथम क्रमांक पटकाविला आहे.

त्यांना उत्कुष्ठ गोपालक पशुसंवर्धन विषयक आवड म्हणून तत्कालीन जिल्ह परिषद अध्यक्ष दिलीपराव देशमुख व सभापती अण्णासाहेब पाटील यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला होता.

त्यानिमित्ताने जवळगा येथे ग्रामस्थाच्यावतीने पशुपालक धोंडीराम सुर्यवंशी यांचा जेष्ठ नागरिक माजी पंचायत समिती सदस्य वामनराव पाटील यांच्या हस्ते शाल,हार,फेटा बांधून सत्कार करण्यात आला.यावेळी शेतकरी मुरलीधर बोकडे यांनी गायीसाठी शेंगदाणा पेंड दिली.माजी सरपंच ब्रम्हानंद रेड्डी,चेअरमन शेषेराव पाटील, विजयकुमार पाटील,अनिल पाटील, यशवंत सोनकांबळे, यज्ञेश्वर बिरादार, बसवराज स्वामी, राजकुमार मुळे, भागवत मुळजे, विवेकानंद जाधव, माधव गंभीरे, संगाप्पा कुंभार, विलास श्रीमंगले,बालाजी गंभीरे,रंगराव सौदागर आदी उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लिंगाप्पा कुंभार,रामलिंग शिरसे, किशोर सौदागर यांनी प्रयत्न केले. धोंडीराम सुर्यवंशी यांच्या या यशामुळे जवळगा परिसरात आनंदाचे वातावरण असून, देवणी जातीच्या संवर्धनाला नवे बळ मिळाले आहे.

# मोईज सितारी यांना उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि. १६ फेब्रुवारी :** निलंगा जिल्हा लातूर येथील साप्ताहिक जनता एक्सप्रेस चे संपादक मोईज जमिरोद्दीन सितारी यांना नुकताच - पुणे येथे महाराष्ट्र मुस्लिम कॉन्फरन्स तर्फे आयोजित भव्य कार्यक्रमात राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. पुणे येथे झालेल्या महाराष्ट्र मुस्लिम कॉन्फरन्स वतीने झालेल्या कार्यक्रमात राज्यातील मुस्लिम समाजातील नुतन महानगरपालिका नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्यांचे व उत्कृष्ट पत्रकारिता करणारे समाजातील




पत्रकारांचे मान्यवरांची उपस्थितीत पुरस्कार मान्यवरांच्याहस्ते देण्यात आला. सन्मानचिन्ह,, मानपत्र, शाल-फेट - देऊन सत्कार करण्यात आला.

महाराष्ट्रातील नुकत्याच पार पडलेल्या महानगरपालिका, पंचायत आणि जिल्हा परिषद यांच्या निवडणुका पार पडल्या या निवडणुकांमध्ये मुस्लिम समाजातील उमेदवार निवडून आले असून सर्व विजयी उमेदवारांचा पुण्यातील आझम कॅम्पस मध्ये महाराष्ट्र मुस्लिम कॉन्फरन्सच्या वतीने भव्य सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते .कार्यक्रमाचे संयोजन मुस्लिम कॉन्फरन्सचे संस्थापक अध्यक्ष हाजी जुबेर मेमन यांनी केले होते.

याप्रसंगी महाराष्ट्र मुस्लिम कॉन्फरन्सचे संस्थापक अध्यक्ष हाजी जुबेर मेमन, कारी इद्रिस अन्सारी, फरीद खान पुणे शहर अध्यक्ष, महाराष्ट्र मुस्लिम कॉन्फरन्स, कलाकार आसिफ अलबेलामालेगाव कारी मुद्दसिर,अँड. सुलतान शहा, कारी जमील, ईलहाजोद्दीन फारुखी,अखिल भारतीय उर्दू शिक्षक संघटना राष्ट्रीय अध्यक्ष, कामील शेख आदिल पब्लिकेशन इकबाल अन्सारी,मजहर शेख, अक्रम मदारी आदी उपस्थित होते. पुणे, नाशिक, सोलापूर, लातुर कोल्हापूर, मिरज, मुंबई, ठाणे, धाराशिव,अहील्या नगर, रत्नागिरी, संभाजी नगर सह विविध भागातील नगरसेवक आणी पंचायत,जिल्हापरिषद सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इकबाल अन्सारी यांनी केले तर आभार पुणे शहर महिला अध्यक्ष फरहीन सय्यद यांनी मानले.

CMYK

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## गोवंशीय जनावरांची वाहतूक उघड; २ लाख ३३ हजारांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ फेब्रुवारी -**
आरोपी मंगेश राम देशमाने (वय २५ वर्षे, रा. खडकपुरा गल्ली, खर्डा ता. जामखेड जि. अहिल्यानगर) यांनी दि. १३ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ६.४० वाजता छोटा हत्ती (क्र. एमएच १६ डीपी ०२२५) या वाहनातून गोवंशीय जातीची दोन वासरे व एक रेडकू अशी जनावरे बेकायदेशीररित्या वाहतूक करत असल्याचे आढळून आले.

सदर जनावरांची चारा-पाण्याची कोणतीही व्यवस्था न करता निर्दयतेने कत्तलीसाठी वाहतूक केली जात असल्याची माहिती आंबी पोलिसांना मिळाली.



कारवाईदरम्यान जनावरे व वाहनासह एकूण सुमारे २,३३,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी सरकारतर्फे संबंधित व्यक्तीविरुद्ध प्राण्यांशी क्रूरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम कलम ११ (१) (अ), ११ (१) (ड), ११ (१) (ई) तसेच कलम ५(ब) महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

पुढील तपास आंबी पोलीस करीत आहेत.

# ‘आकांक्षित जिल्हा’ ही ओळख पुसण्याचा संकल्प : जिल्हाधिकारी पुजार

### संपूर्णता अभियान २.० चा धाराशिवमध्ये शुभारंभ...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ फेब्रुवारी -**
संपूर्णता अभियानाच्या दुसऱ्या टप्प्याचा अर्थात संपूर्णता अभियान २.० चा शुभारंभ आज जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांच्या हस्ते साईनबोर्डचे अनावरण व दीपप्रज्वलन करून करण्यात आला. या अभियानाचा कालावधी २८ जानेवारी ते १४ एप्रिल २०२६ असा राहणार आहे.

कार्यक्रमास जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी नीलेश काळे, निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर, जिल्हा नियोजन अधिकारी पुंडलिक गोडसे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरिदास, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालविकास) देवदत्त गिरी आदी उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार म्हणाले की, संपूर्णता अभियान २.० अंतर्गत सहा निर्देशांक शंभर टक्के संतृप्त करून यावेळी सुवर्ण पदक मिळविण्याचा निर्धार आहे. ‘आकांक्षित जिल्हा’ ही धाराशिवची ओळख या अभियानाच्या माध्यमातून पुसून टाकण्याचा



संकल्प असून, वरिष्ठ अधिकारी-कर्मचारी ते तळागाळातील घटकांपर्यंत सर्वांचे योगदान महत्त्वाचे आहे.

जिल्ह्यातील ४४० ग्रामपंचायती टी.बी.मुक्त घोषित करण्यात आल्या असून संपूर्ण जिल्हा टी.बी.मुक्त करण्याचा संकल्प असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

आकांक्षित जिल्हा कार्यक्रम हा निती आयोगाद्वारे जानेवारी २०१८ मध्ये सुरू करण्यात आलेला देशातील ११२ मागास जिल्ह्यांच्या जलद विकासासाठीचा महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. महाराष्ट्रातील धाराशिव, नंदूरबार, वाशिम आणि गडचिरोली या जिल्ह्यांचा त्यात समावेश आहे.

आरोग्य, शिक्षण, कृषी आणि मूलभूत सुविधा या क्षेत्रांवर विशेष भर देत ४९ प्रमुख कामगिरी निर्देशांकांच्या आधारे जिल्ह्यांची प्रगती मोजली जाते.

संपूर्णता अभियान १.० हा टप्पा १ जुलै ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीत राबविण्यात आला होता. जिल्हास्तरावरील पाच आणि तालुकास्तरावरील सहा मुख्य निर्देशांक शंभर टक्के संतृप्त करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले. या अभियानाचा शुभारंभ ४ जुलै २०२५ रोजी परंडा येथे झाला होता.

पहिल्या टप्प्यात जिल्ह्यास रौप्य पदक तर तालुका कार्यक्रमांतर्गत परंडा तालुक्याला कांस्य पदक मिळाले. या यशात योगदान देणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा प्रशस्तीपत्र व चषक देऊन गौरव करण्यात आला.

सन्मानित मान्यवरांमध्ये जिल्हा नियोजन अधिकारी पुंडलिक गोडसे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरिदास, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी विनय कुलकर्णी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालविकास) देवदत्त गिरी, महिला व बालविकास प्रकल्प अधिकारी (परंडा) गणेश कुकडे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या जिल्हा अभियान व्यवस्थापक श्रीमती वनिता डोंगरे, शिक्षणाधिकारी, कृषी अधिकारी, आरोग्य सेविका, आशा स्वयंसेविका, ग्रामसखी, कृषी सखी, बँक सखी, आर्थिक साक्षरता सखी, प्रभाग समन्वयक व सहायक कृषी अधिकारी आदींचा समावेश होता.

कार्यक्रमास जिल्ह्यातील सर्व गट विकास अधिकारी, कृषी अधिकारी, आरोग्य कर्मचारी, आशा स्वयंसेविका, मदतनीस व ग्रामसखी उपस्थित होते.

## नळदुर्गात १९ फेब्रुवारीला शिवजन्मोत्सवानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१६ फेब्रुवारी -**
हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती दि.१९ फेब्रुवारी रोजी नळदुर्ग येथे उत्साहात साजरी करण्यात येणार आहे. माजी नगरसेवक विनायक अहंकारी यांच्या निवासस्थानी शिवजन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून सकाळी १० वाजता विविध कार्यक्रम पार पडणार आहेत.

या निमित्ताने शिवजन्मोत्सव पाळणा व दुग्धाभिषेक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. शहरातील शेकडो महिला पाळणा कार्यक्रमात सहभागी होत असतात. गेल्या अनेक वर्षांपासून अहंकारी यांच्या पुढाकाराने घरगुती शिवजन्मोत्सवाला भव्य स्वरूप प्राप्त झाले आहे.

दरम्यान, नळदुर्ग शहरात शिवशाही तरुण मंडळ यांच्या वतीने दि.१७ ते १९ फेब्रुवारीदरम्यान विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सर्व कार्यक्रमांना शिवभक्तांनी उपस्थित राहावे, असे आवाहन विनायक अहंकारी यांनी केले आहे.

## एकलव्य विद्या संकुलात दहावीच्या विद्यार्थ्यांचा स्वयंशासन दिन व निरोप समारंभ संपन्न




**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ फेब्रुवारी -**
तुळजापूर तालुक्यातील यमगरवाडी एकलव्य विद्या संकुल येथे इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा स्वयंशासन दिन व निरोप समारंभ उत्साहात साजरा झाला.

स्वयंशासन दिनाचे मुख्याध्यापक म्हणून विद्यार्थी योगेश पवार सार्थक मालकर हे होते. दिवसभर शाळेचे व वसती गृहाचे व्यवस्थापन विद्यार्थ्यांनी केले. यामध्ये दहावीच्या ५२ मुला-मुलींनी सहभाग घेतला. यानंतर एक छोटीशी सभा संपन्न झाली. या कार्यक्रमात स्वप्नील बंडगर, सृष्टी कोळी, आदिती सुपलकर, प्राची पाटोळे, अजित पाखरे, स्वानंद कोल्हटकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रमुख पाहुणे वक्ते मुख्याध्यापक विठ्ठल म्हेत्रे यांनी दहावीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व शुभेच्छा दिल्या. सहशिक्षक अण्णासाहेब मगर यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमात दहावीच्या विद्यार्थ्यांनी शाळेसाठी साउंड बॉक्सची भेट दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी अस्मिता भोजने रूपाली गिरी हिने केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन संतोष बनसोडे यांनी केले.

या कार्यक्रमास गोविंद सोमानी, सुमन सोमानी, फुलाजी ताटी कुंडलवार, अण्णासाहेब कोल्हटकर, विठ्ठल म्हेत्रे, अण्णासाहेब मगर, संतोष बनसोडे, बालाजी क्षीरसागर, नवनाथ बिराजदार, अनिल घुगे, अशोक बनकर, संगीता पाचंगे, निर्मला हुग्गे, प्रणिता शेटकार तसेच कर्मचारी विद्यार्थी, पालक उपस्थित होते उपस्थित होते.

## संत सद्गुरू शिवरामबुवा यात्रा महोत्सवास प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.१६ फेब्रुवारी -**
तुळजापूर तालुक्यातील दिंडेगाव येथील ग्रामदैवत व लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या संत सद्गुरू शिवरामबुवा यांच्या यात्रा महोत्सवास रविवार दि.१५ फेब्रुवारी २०२६ रोजी महाशिवरात्रीच्या पावन पर्वावर मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला.

यावेळी माजी मंत्री मधुकरराव चव्हाण साहेब यांनी श्री संत सद्गुरू शिवरामबुवा समाधीचे दर्शन घेतले. तुळजापूर, उमरगा, औसा, लातूर, अक्कलकोट, सोलापूर, बार्शी, धाराशिव, लोहारा आदी तालुक्यांतून भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सुमारे तीन शतकांहून अधिक काळ अखंड परंपरेने



सुरू असलेला हा सोहळा गेल्या आठ पिढ्यांपासून दिंडेगावकर घराण्याकडून चालविला जात आहे.

यावर्षी गादीचे विद्यमान सातवे उत्तराधिकारी आप्पासाहेब महाराज दिंडेगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उत्सव पार पडत आहे.

महाशिवरात्री हा दिवस सद्गुरू शिवरामबुवांच्या जीवनातील अत्यंत महत्त्वाचा क्षण मानला जातो. याच दिवशी त्यांना गुरुकृपेचा लाभ झाला, अशी भाविकांची श्रद्धा आहे.

परंपरेनुसार उत्सवकाळात सद्गुरू महादजीबुवा व पंढरीनाथ परमात्म्याचे दैवी सान्निध्य लाभते, असा समज आहे.

सद्गुरू शिवरामबुवांनी सुरू केलेला रात्रभराचा दिंडी जागरण सोहळा आजतागायत अखंड सुरू असून यंदाही तो भाविकांच्या उपस्थितीत पार पडत आहे.



## अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ फेब्रुवारी -**
एका गावातील १७ वर्षीय मुलगी (नाव- गावगोपनीय) हिस गावातील एका तरुणाने त्याचे मोटरसायकलवर फिरायला घेवून जातो असे म्हणून लॉजवर घेवून जावून तिच्यावर लैंगीक अत्याचार केला.

अशा मजकुराच्या पिडीतेची आई यांनी दि.१४.०२.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.न्या. सं.कलम-१३७(२), ६४(२) सह पोक्सो कलम ४, ६ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## श्रीक्षेत्र रामतीर्थ येथे महाशिवरात्री उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१६ फेब्रुवारी -**
नळदुर्ग येथील ऐतिहासिक, प्राचीन व श्री प्रभू रामचंद्रांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या श्रीक्षेत्र रामतीर्थ येथे दि.१५ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्रीचा उत्सव मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. देवस्थानचे महंत श्री विष्णु प्रसाद शर्मा महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या उत्सवासाठी हजारोंच्या संख्येने भाविक उपस्थित होते.

महाशिवरात्रीनिमित्त श्रीक्षेत्र रामतीर्थ येथील श्री राम मंदिर, महादेव मंदिर व हनुमान मंदिर या तिन्ही मंदिरांवर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. तसेच मंदिर परिसरातील वृक्ष व देवस्थानचे पहिले महंत रघुवीर प्रसाद जोशी महाराज यांच्या समाधीस्थळालाही रोषणाईने सजविण्यात आले होते. रात्रीच्या वेळी संपूर्ण परिसर दिव्यांच्या प्रकाशात उजळून निघाला होता. महाशिवरात्रीनिमित्त पहाटेपासूनच



श्री महादेवाच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. सकाळी ७ वाजता महाकाल शृंगार करण्यात आला. त्यानंतर सकाळी ८.३० वाजता मंत्रोच्चारात संगीतमय महारुद्र अभिषेकास प्रारंभ झाला. हैद्राबाद येथील उपेंद्र पांडे व त्यांच्या टीमच्या मार्गदर्शनाखाली हा रुद्राभिषेक पार पडला. यामध्ये १०० हून अधिक भाविकांनी सहभाग घेतला. सकाळी ११ वा. शोभायात्रा काढण्यात आली, तर दुपारी १२.२० वा. महाकाल महाआरती करण्यात आली. या महाआरतीस भाविक उपस्थित होते. त्यानंतर प्रशांत नवगिरे यांच्या वतीने भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यासाठी महंत श्री विष्णु प्रसाद शर्मा महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली श्री शुक्ला महाराज व रामभक्तांनी विशेष परिश्रम घेतले.

## नळदुर्ग : संत सेवालाल महाराज जयंती उत्साहात साजरी




**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१६ फेब्रुवारी -**
संत सेवालाल महाराज हे संपूर्ण समाजासाठी प्रेरणास्थान होते. त्यांनी आयुष्यभर समाजसेवा, त्याग आणि मानवतेचा संदेश दिला. तसेच समाजातील सर्व घटकांना एकत्र आणून शिक्षण, एकता व प्रगतीसाठी प्रयत्न केले. युवकांनी त्यांच्या कार्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून समाजात कार्य करावे, असे मत माजी जिल्हा परिषद सदस्य प्रकाश चव्हाण यांनी व्यक्त केले.

नळदुर्ग येथील वसंतराव नाईक (गोलाई) चौकात संत सेवालाल महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी प्रकाश चव्हाण बोलत होते. कार्यक्रमास माजी मंत्री मधुकरराव चव्हाण, नळदुर्गचे नगराध्यक्ष बसवराज धरणे, उपनगराध्यक्ष नय्यर जहागीरदार तसेच प्रमुख बंजारा बांधव उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते संत सेवालाल महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. जयघोष आणि फटाक्यांच्या आतषबाजीने जयंती सोहळ्याला उत्साहाचे स्वरूप प्राप्त झाले.

यावेळी विद्यानंद राठोड, प्रविण पवार, नगरसेवक निरंजन राठोड, छमाबाई राठोड, शिवाजी नाईक, दामाजी राठोड, दत्ता राठोड, रवि महाराज, वैभव जाधव, कैलास चव्हाण, सुरेश राठोड, विनायक जाधव, सरपंच सुर्यकांत चव्हाण, माजी सरपंच बालाजी राठोड, शिवाजी राठोड, विनायक राठोड, प्रविण चव्हाण, सचिन राठोड यांच्यासह विविध तांड्यातील प्रमुख नाईक, कारभारी व बंजारा बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मार्डी जि.प. शाळेचा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१६ फेब्रुवारी -**
लोहारा तालुक्यातील मार्डी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण, शिस्तबद्ध व दिमाखदार वातावरणात पार पडला. ग्रामस्थ, पालक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम गावाच्या शैक्षणिक इतिहासात स्मरणीय ठरला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री आप्पासाहेब पाटील होते. उद्घाटन श्रीमती उषाताई अशोकराव पाटील यांच्या हस्ते झाले, तर दीपप्रज्वलन डॉ. कर्मवीर नागनाथ कदम यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी मान्यवरांनी शिक्षणासोबत संस्कार, शिस्त आणि सर्वांगीण विकासाचे महत्त्व अधोरेखित




केले. मुख्याध्यापक सुरेश वाघमोडे यांनी प्रभावी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या यशासाठी शिक्षक रमाकांत खटके, माणिक शेट्टी, महानंदा चव्हाण, वर्षा कमलाकर चौधरी, युवराज बनकर यांनी विशेष परिश्रम घेतले. आदर्श शिक्षिका वर्षा चौधरी यांनी शाळेची रंगरंगोटी स्वखर्चातून केल्याबद्दल त्यांचा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत, मराठी-हिंदी गीते व विविध सांस्कृतिक सादरीकरणातून आपल्या कलागुणांचे दर्शन घडविले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी योगेश देवकर यांचे विशेष योगदान लाभले.

# ग्रामीण भागात ग्रंथालय चळवळ अधिक जोमाने वाढावी : अशोक गाडेकर

### वाशी येथे धाराशिव ग्रंथोत्सव-२०२५ उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ फेब्रुवारी -**
आपणाला सर्व प्रकारचे ज्ञान मिळवून देणारे ग्रंथ व साहित्य हेच मुख्य साधन आहे. ग्रामीण भाग हा वाचन चळवळीत पहिल्यापासून सक्रिय असून त्यांची सक्रियता अधिक तीव्र करण्यासाठी ग्रामीण भागात ग्रंथालय चळवळ जोमाने वाढली पाहिजे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संचालनालयाचे संचालक अशोक गाडेकर यांनी १४ फेब्रुवारी रोजी केले.

वाशी शहरात आयोजित धाराशिव ग्रंथोत्सव-२०२५ अंतर्गत बाल वारकऱ्यांची ग्रंथ दिंडी काढण्यात आली. या दिंडीत विठ्ठल-रुक्मिणी, संत तुकाराम, संत मीराबाई यांच्यासह छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ, महात्मा गांधी, महात्मा ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आदी महापुरुषांच्या वेशभूषेतील मिरवणूक हे ग्रंथोत्सवाचे मुख्य आकर्षण ठरले.

वाशी येथील अजिंक्य विद्या मंदिर परिसरात महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत ग्रंथालय





संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, धाराशिव व तालुका ग्रंथालय संघ वाशी यांच्या संयुक्त विद्यमाने या ग्रंथोत्सवाचे आयोजन करण्यात आले. उद्घाटन प्रसंगी जिल्हा ग्रंथालयाचे अध्यक्ष व.ग. सूर्यवंशी अध्यक्षस्थानी होते. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष प्रा.डॉ. गजानन कोटेवार, नगराध्यक्षा विद्या गायकवाड, छत्रपती संभाजीनगर येथील सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे, मराठवाडा विभागाचे प्रमुख कार्यवाहक राम मेकले, विनोद गायकवाड, अजिंक्य विद्या मंदिराचे संस्थापक अध्यक्ष एस.एल. पवार, जिल्हा ग्रंथालय अधिकारी हनुमान ढाकणे, निरीक्षक शिवशंकर कटाळे, सुधाकर बुकन आदी उपस्थित होते.

प्रारंभी वाशी येथील विठ्ठल-रुक्मिणी मंदिरापासून बाल वारकरी विद्यार्थ्यांच्या ग्रंथ दिंडीस प्रारंभ झाला. ढोल, हलगी, मृदुंग व टाळांच्या गजरात आणि जनजागृतीपर गीतांच्या निनादात ही दिंडी छत्रपती शिवाजी महाराज चौक, पारा चौक मार्गे कार्यक्रम स्थळी दाखल झाली. विद्यार्थ्यांनी लेझीम, टिपऱ्या, अभंग सादरीकरणातून वातावरणात चैतन्य निर्माण केले.

ग्रंथोत्सव स्थळी दीपप्रज्वलन करून महामानवांना पुष्पहार अर्पण करण्यात आले आणि धाराशिव ग्रंथोत्सव-२०२५ चे थाटात उद्घाटन झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक हनुमान ढाकणे यांनी केले. सूत्रसंचालन भैरवनाथ कानडे यांनी तर आभार लक्ष्मीकांत पवार यांनी मानले.

कार्यक्रमास ग्रंथालय चळवळीतील पदाधिकारी, कार्यकर्ते, विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## भीषण अपघात : आयशरच्या धडकेत महिलेचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ फेब्रुवारी -**

मयत भारती तुकाराम सुरेश (वय ४५ वर्षे, रा. माळेगाव ता. बार्शी जि. सोलापूर) या दि.१३ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी सुमारे ११ वाजता एनएच-५२ मार्गावर पार्डी फाटा येथील पुलासमोर मोटारसायकल (क्र. एमएच १३ ईझेड ३८३६) वरून जात असताना भीषण अपघात झाला.

दरम्यान आयशर (क्र. एमएच ०४ जीआर ०४८५) वाहनाच्या चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन हायगयी व निष्काळजीपणे चालवून संबंधित मोटारसायकलला पाठीमागून जोराची धडक दिली.




या अपघातात भारती तुकाराम सुरेश या गंभीर जखमी होऊन मृत्युमुखी पडल्या.

याप्रकरणी फिर्यादी सुरेश शंकर गुगळे (वय ७० वर्षे, रा. माळेगाव ता. बार्शी जि. सोलापूर) यांनी दि. १४ फेब्रुवारी २०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास वाशी पोलीस करत आहेत.

## संक्षिप्त वृत्त...



### बेलवाडी येथे संत सेवालाल महाराज जयंती उत्साहात साजरी

**लोहारा, दि.१६ फेब्रुवारी -**

लोहारा तालुक्यातील बेलवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत संत सेवालाल महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त शाळेमध्ये संतांच्या प्रतिमेचे पूजन शाळा अध्यक्ष लहू जाधव, मुख्याध्यापक राजेंद्र माळवदकर तसेच शाळा समिती सदस्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी गावातील बंजारा समाज बांधव व महिला भगिनी उपस्थित होत्या. महिलांनी पारंपारिक वेशभूषेत सहभाग नोंदवत शाळा परिसर व मुख्य चौकात पारंपारिक बंजारा नृत्य सादर केले. ढोल-ताशांच्या गजरात तांडा ते बेलवाडी गाव आणि जिल्हा परिषद शाळा या मार्गावर मिरवणूक काढण्यात आली. लहानांपासून वयोवृद्धांपर्यंत सर्वांनी मिरवणुकीत उत्स्फूर्त सहभाग घेतला. या कार्यक्रमास समाजातील मान्यवर, महिला मंडळ, युवकवर्ग, विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### बेडगा येथे शिक्षक सुभाष पवार यांचा सेवापूर्ती सोहळा संपन्न

**उमरगा, दि.१६ फेब्रुवारी -**

जि.प.प्रा.शा. बेडगा येथील शिक्षक सुभाष भालचंद पवार हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. त्यांच्या गौरवासाठी आयोजित सेवापूर्ती कार्यक्रम आ. प्रवीण स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून माजी गटशिक्षणाधिकारी देविदास बनसोडे, बाबुराव राठोड, आर.एस. चव्हाण तसेच उमरगा केंद्राच्या केंद्रप्रमुख शिला मुदगडे उपस्थित होते. सुभाष पवार यांनी तब्बल ३८ वर्षे आष्टा, आचलेर व बेडगा येथे उल्लेखनीय सेवा बजावली असून त्यांच्या शैक्षणिक कार्याचा यावेळी विशेष गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुभाष वैरागकर यांनी केले. आ. प्रवीण स्वामी व विविध सामाजिक संघटना मित्र परिवार यांच्या वतीने पवार यांचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन आनंद मोरे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राजक्ता राठोड, वर्षा राठोड, ओमकार पवार, महेश राठोड, संजय राठोड, काशिनाथ राठोड व देविदास पवार यांनी विशेष परिश्रम घेतले.



### मेलडी स्टार्सची साल नया गीत पुराणे मैफिल संपन्न

**धारशिव, दि.१६ फेब्रुवारी -**

प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी शहारातील मेघ मल्हार सभागृहात कलाविष्कार अकादमी धाराशिव द्वारा पर्व ११ वे 'साल नया गीत पुराणे' या अविट गीतांची मैफिल मेलडी स्टार्सच्या हौशी छंदी गायकांची उत्साहात संपन्न झाली. प्रथम दिप प्रज्वलन संगीत विशारद आनंद समुद्रे, कलारसिक डॉ. अभय शहापुरकर, शंकरराव नळे, महारुद्र मोरे, मुख्यप्रवर्तक युवराज नळे, समन्वयक मुकुंद पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर २० हौशी गायकांनी बहारदार गीतांचे गायन केले. गणेश वंदना रवींद्र कुलकर्णी, समन्वय मुकुंद पाटील, मल्हारी माने, दत्तप्रसाद जंगम, नितीन बनसोडे, प्रसाद धाबेकर, अनिल मालखरे, क्षितीजा निंबाळकर, महेश उंबर्गीकर, शेषनाथ वाघ, धनंजय कुलकर्णी, अभिमन्यु गायकवाड, युवराज नळे, मुकुंद शिंदे, सविता भोसले, वर्षा नळे, ॲड. विद्युलता दलभंजन, तारा मोरे, उर्मिला कदम, राजश्री निंबाळकर यांनी सुश्राव्य गायन केले. शेवटी आभार शेषनाथ वाघ यांनी मानले.



### जिल्हाध्यक्ष बापू जगदे यांचा सत्कार

**तुळजापूर, दि.१६ फेब्रुवारी -**

येथे संघटनेच्या वार्षिक संयुक्त आढावा बैठकीत महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेच्या धाराशिव मंडळ जिल्हाध्यक्षपदी बी.बी.जगदे यांची निवड झाल्यानंतर शासकीय कंत्राटदार तालुकाध्यक्ष बापू घोंगते यांनी सत्कार केला. याप्रसंगी शिवाजी म्हमाने, सुभाष पाचपुंडे, सुनील पात्रे, योगेश कोरे आदी उपस्थित होते. यावेळी तालुकाध्यक्ष बाबा घोंगते यांनी सत्कार प्रसंगी सांगितले की, बी.बी. जगदे यांची निवड अत्यंत सार्थ आहे. त्यांनी यापुढेही संघटनेतील सर्व घटकांना न्याय देत सर्वसमावेशक भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा असून जगदे हे संघटनेत सक्रिय कार्यकर्ते म्हणून ओळखले जात असून, कर्मचारी प्रश्नांबाबत त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे. त्यांच्या अनुभवाचा आणि नेतृत्वगुणांचा संघटनेला लाभ होईल, असा विश्वास व्यक्त केला.

# भाजपला नव्हे जिल्ह्यातील घराणेशाहीला विरोध

**धाराशिवमध्ये राजकीय वाद तापला... घराणेशाहीवरून आरोप-प्रत्यारोप...**

### शिवसेना जिल्हा प्रमुख दत्ता साळुंके

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ फेब्रुवारी -**

आमदार तानाजीराव सावंत यांच्या बदनामीचे षडयंत्र रचले जात असल्याचा आरोप करत, शिवसेना जिल्हा प्रमुख दत्ता साळुंके यांनी भाजपमधील काही नेत्यांवर टीका केली. आमचा भाजपला नव्हे, तर घराणेशाहीला विरोध आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

साळुंके म्हणाले की, आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांनी भाजप जिल्हाध्यक्ष दत्ता भाऊ कुलकर्णी यांच्या नावाने प्रसिद्धीपत्रक काढून सावंतांवर गंभीर आरोप केले. हिम्मत असेल तर त्यांनी स्वतः पुढे



येऊन बोलावे, इतरांना पुढे करून आरोप करू नयेत, असे साळुंके यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे जो निर्णय घेतील तो मान्य असेल, असेही त्यांनी नमूद केले. सावंत हे घराणेशाहीविरोधी भूमिका घेत असल्याने त्यांना बदनाम करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप त्यांनी केला. आमचा भाजपला विरोध नाही. पक्षाचे धोरण ठरवणारे कोण, हे आम्हाला माहीत आहे; आम्हाला सल्ले देऊ नयेत, असा इशाराही त्यांनी दिला.

साळुंके यांनी स्पष्ट केले की, कोणत्याही ठिकाणी शिवसेनेने उबाठा गटासोबत हातमिळवणी केलेली नाही. उलट भुम-परंडा येथे उबाठासह इतर पक्षांनी एकत्र येऊन नगरपरिषद निवडणूक लढवली, असा दावा त्यांनी केला. अर्चना पाटील यांना अध्यक्ष करण्यासाठी एका व्यक्तीचे मन दुखावले गेले, मात्र इतर कोणाच्या भावना दुखावल्या नाहीत, असेही ते म्हणाले. भाजपचा अध्यक्ष कोणही करा, पण सामान्य कार्यकर्त्याला न्याय मिळू द्या. पक्षश्रेष्ठींनी सांगितले तर आम्ही मान्य करू; मात्र आमचे सदस्य का नेले? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

पदाधिकारी डावलणे आणि संख्याबळ यावरून शिवसेना व भाजपमधील स्थानिक नेत्यांमध्ये आरोप-प्रत्यारोपांची मालिका सुरू झाली आहे. राज्य नेतृत्वाचा निर्णय काय येतो, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

या पत्रकार परिषदेसाठी दत्ता साळुंके, अविनाश खापे, मेघराज पाटील, भारती गायकवाड, शमशुद्दीन शेख, आनंद भक्ते, निखिल घोडके, विशाल देवकर, आदी पदाधिकारी उपस्थित होते.

### 'शिवसेनेत घुसखोर'; अविनाश खापेंचा आरोप...

हा लढा शिवसेना-भाजपमध्ये नाही. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्यात चांगला संवाद आहे. मात्र आमदार-खासदारांच्या घरात उमेदवारी देऊ नये, अशी भूमिका देवेंद्र फडणवीस यांनी घेतली होती. मग प्रतारणा कोण करत आहे? असा सवाल त्यांनी केला. खापे म्हणाले की, भाजपमधील सर्वसाधारण जागांवर काम करणाऱ्यांना भविष्यात स्पर्धक ठरू नयेत म्हणून डावलण्यात आले. घराणेशाहीमुळे पदाधिकाऱ्यांवर अन्याय होत आहे. शिवसेनेचे जे सदस्य नेले, ते परत आणले नाहीत तर लोकशाही मार्गाने आंदोलन करू, असा इशाराही त्यांनी दिला. तुमचे ३६ कोण आहेत ते दाखवा; आम्ही आमचे २८ दाखवू. सावंतांना बाजूला ठेवून सत्ता स्थापन करण्याच्या हालचाली सुरू आहेत. मात्र उपमुख्यमंत्र्यांचा आदेश आला की आम्ही आमचे संख्याबळ दाखवू, असे ते म्हणाले. धाराशिव जिल्ह्याला आकांक्षित ठेवण्यात आले असून २७६ कोटींच्या स्थगितीबाबत का बोलले नाही, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. निवडून आलेले आमचे दोन सदस्य सोडा, मग पुढील चर्चा करू, असे ते म्हणाले. खापे यांनी साळवी यांना बुजगावणे बनविल्याचा आरोप करत, धाराशिव जिल्ह्यात घराणेशाही कशी सुरू आहे, हे तिन्ही पक्षांच्या प्रमुखांना भेटून मांडणार, असे सांगितले.

# लिपीकवर्गीय कर्मचाऱ्यांचे कामबंद आंदोलन

### प्रलंबित वेतन व जुनी पेन्शन योजनेसाठी निवेदन...

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१६ फेब्रुवारी -**

विविध प्रलंबित मागण्यांसाठी शासकीय व निमशासकीय अधिकारी-कर्मचारी संघटना व लोहारा शाखेच्या वतीने लिपीकवर्गीय कर्मचाऱ्यांनी सोमवारी (दि.१६) कामबंद आंदोलन करत गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन सादर केले.

निवेदनात नियुक्ती व वेतनासंदर्भातील प्रलंबित प्रश्न तात्काळ निकाली काढावेत, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. लिपीकवर्गीय कर्मचाऱ्यांच्या वेतनात चौथ्या वेतन आयोगापासून मोठी तफावत



निर्माण झाली असून ती दूर करून सुधारित वेतनश्रेणी लागू करावी, अशी मागणी संघटनेने केली आहे. तसेच १ नोव्हेंबर २००५ नंतर शासकीय सेवेत नियुक्त सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, तसेच १ नोव्हेंबर २००५ पूर्वी अनुकंपा तत्त्वावर प्रतीक्षा यादीत असलेल्या कर्मचाऱ्यांनाही जुनी पेन्शन योजना लागू करण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. या मागण्यांकडे शासनाने गांभीर्याने लक्ष देऊन सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलन तीव्र करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला.

यावेळी एन.व्ही. कुंभार, बी.एस. साळुंखे, उपाध्यक्ष एल.एस. साठे, सचिव भुजबळ, वाय.एच. शेख, एस.एस. लोकरे, ए.जी. सुरवसे, गोपाळ लाळे, सचिन शामराज, नितीन पाटील, रत्नप्रभा पवार, बालाजी कुंभार, मेहताब शेख आदींच्या स्वाक्षऱ्या निवेदनावर आहेत.

# प्रलंबित मागण्यासाठी कर्मचारी संघटनेचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ फेब्रुवारी -**

महाराष्ट्र शासनाच्या अंतर्गत प्रशासनाचा मुख्य आधारस्तंभ मानल्या जाणाऱ्या राज्यातील सर्व ४२६ विभागांतील लिपीक संवर्गाच्या प्रलंबित मागण्यांसाठी दिनांक १६ ते २३ फेब्रुवारी या कालावधीत असहकार आंदोलन पुकारण्यात आले आहे.



तुळजापूर पंचायत समिती येथील कर्मचाऱ्यांनी गटविकास अधिकारी यांना प्रलंबित मागाण्यांचे निवेदन दिले. धाराशिव जिल्हा परिषद युनियन संघटना व जिल्हा परिषद लेखा संवर्ग संघटना यांनी या आंदोलनास जाहीर पाठिंबा दिला आहे. महाराष्ट्र शासकीय निमशासकीय अधिकारी व कर्मचारी संघटना, मुख्यालय धाराशिव यांच्या वतीने मुख्यमंत्री यांना दि.१२ फेब्रुवारी रोजी निवेदन सादर करण्यात आले होते. त्यानुसार चौथ्या वेतन आयोगापासून लिपीक संवर्गाच्या वेतनश्रेणीत निर्माण झालेली तफावत दूर करून सुधारित वेतनश्रेणी लागू करावी, जुनी पेन्शन योजना जशास तशी लागू करावी, तसेच १ नोव्हेंबर २००५ पूर्वी अनुकंपा तत्त्वावर प्रतीक्षायादीत असलेल्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, या प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत.

या मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी सनदशीर मार्गाने असहकार आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला असून जिल्हा परिषद धाराशिव अंतर्गत विविध विभागांतील कर्मचारी या आंदोलनात सहभागी होणार असल्याची माहिती संघटनेच्या वतीने देण्यात आली आहे.

# जिजाऊ पुरस्कार सामाजिक कार्यासाठी ऊर्जा देणारा सन्मान : अर्चना अंबुरे



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ फेब्रुवारी -**

जिजाऊ माँसाहेबांच्या प्रेरणेने सामाजिक कार्य अधिक जबाबदारीने आणि अधिक ताकदीने पुढे नेण्याची ऊर्जा मला या सन्मानातून मिळणार असून हा सन्मान जिजाऊ माँसाहेब यांच्या प्रेरणादायी विचारांची व कर्तृत्वाची आठवण करून देणारा असाच आहे, अशा भावना पुरस्कार स्वीकारल्यानंतर अर्चना अंबुरे यांनी व्यक्त केल्या.

धाराशिव तालुक्यातील तेर येथील प्रेरणा सामाजिक संस्था संचलित लिटल फ्लॉवर्स स्कूलच्या वतीने सामाजिक कार्यकर्त्या अर्चना रवींद्र अंबुरे यांना जिजाऊ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमात अर्चना रवींद्र अंबुरे यांच्यासह संध्या शिंदे, अनिता घोडके, उज्वला शिंदे, सविता कन्हेरे यांना मानपत्र, जिजाऊंची प्रतिमा, शाल व श्रीफळ देऊन गौरविण्यात आले.

# शेतकरी व शेती समृद्ध करायची असेल तर तंत्रज्ञानाचा स्वीकार करा : पद्मश्री डॉ. दादा लाड

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ फेब्रुवारी -**

शेतकरी सुखी आणि समृद्ध झाला तरच राष्ट्र खऱ्या अर्थाने प्रगतीशील ठरते. बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर, वाढते उत्पादनखर्च आणि बाजारपेठेतील स्पर्धा लक्षात घेता शेतकरी व शेती समृद्ध करायची असेल तर पीक पद्धती आणि कृषी तंत्रज्ञानातील बदल स्वीकारणे अत्यावश्यक आहे, असे प्रतिपादन पद्मश्री पुरस्कारप्राप्त कृषितज्ज्ञ डॉ. दादा लाड यांनी केले.

भारतीय किसान संघ, धाराशिव यांच्या वतीने आयोजित शेतकरी अभ्यासवर्गात ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाला जिल्ह्यातील विविध भागांतून मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. पद्मश्री पुरस्काराने सन्मानित झाल्याबद्दल भारतीय किसान संघ, धाराशिवच्या वतीने जिल्हा



संघचालक ॲड. रविंद्र कदम यांनी डॉ. लाड यांचा शाल-श्रीफळ देऊन सत्कार केला. अभ्यासवर्गात गहू, ज्वारी आणि सोयाबीन या प्रमुख पिकांच्या उत्पादनवाढीबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. डॉ. लाड यांनी सांगितले की सुधारित वाणांची निवड, मृदा परीक्षणावर आधारित खत व्यवस्थापन,ठिबक व तुषार सिंचनाचा वापर, एकात्मिक कीड व्यवस्थापन, आंतरपीक व पीक फेरपालट पद्धती या उपाययोजनांमुळे उत्पादन दुप्पट करण्याची क्षमता आहे. परंपरागत शेतीसोबत विज्ञानाधिष्ठित पद्धतींचा अवलंब केल्यास खर्च कमी आणि नफा जास्त होऊ शकतो, असे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या शेवटी शेतकऱ्यांच्या प्रश्नांना तज्ज्ञांनी सविस्तर उत्तरे दिली. शेती अधिक उत्पादनक्षम, नफादायक आणि शाश्वत करण्याचा संकल्प शेतकऱ्यांनी व्यक्त केला.

# 'आपलं घर' बालगृहात गंभीर प्रकार उघड; व्यवस्थापकास प्रवेशबंदी, अधीक्षिकेवर कारवाईचे आदेश

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१६ फेब्रुवारी -**

महिला व बालविकास कार्यालयांतर्गत नळदुर्ग येथील राष्ट्र सेवा दल संचलित 'आपलं घर' बालगृहातील कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. बालगृहातील मुलींनी केलेल्या तक्रारीनंतर नेमण्यात आलेल्या चौकशी समितीच्या अहवालात संस्थेचे व्यवस्थापक विलास वकील यांच्यावर गंभीर आरोप निश्चित झाल्याने जिल्हा महिला व बाल विकास अधिकाऱ्यांनी कडक कारवाईचे आदेश दिले आहेत.




अधिकाऱ्यांनी संबंधित व्यवस्थापकास तत्काळ बालगृहात येण्यास बंदी घालण्याचे निर्देश दिले असून, मुलींच्या विभागाच्या अधीक्षिकेवरही योग्य ती प्रशासकीय कारवाई करण्याचे आदेश नोटीसमार्फत देण्यात आले आहेत. यानंतरही संबंधित व्यक्ती बालगृहात आढळल्यास कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

तसेच भविष्यात अशा प्रकारची घटना पुन्हा घडल्यास संस्थेविरुद्ध थेट प्रशासकीय कारवाई करण्यात येईल, अशी तंबी अध्यक्ष व सचिव, राष्ट्र सेवा दल संचलित 'आपलं घर' बालगृह, नळदुर्ग यांना देण्यात आली आहे.

मुलींनी जिल्हा महिला व बालविकास अधिकाऱ्यांकडे संस्थेत मिळणाऱ्या वागणुकीबाबत तक्रार दाखल केली होती.

तक्रारीची दखल घेत चौकशी समिती नेमण्यात आली. समितीत जिल्हा परिविक्षा अधिकारी आर.एल. जमादार (अध्यक्ष), बालकल्याण समितीच्या सदस्या दीपाली जहागीरदार, मैना भोसले, सुजाता माळी, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी अमोल कोवे, वैशाली पाटील, विधी व परिविक्षा अधिकारी जयश्री भाले, सामाजिक कार्यकर्त्या प्रज्ञा बनसोडे, क्षेत्रीय कार्यकर्ता जयश्री पाटील, प्रकल्प समन्वयक (चाईल्ड लाईन) विकास चव्हाण व समुपदेशक वंदना कांबळे यांचा समावेश होता. समितीने नळदुर्ग येथील बालगृहाला भेट देऊन सखोल चौकशी केली.

समितीच्या अहवालानुसार, व्यवस्थापक विलास वकील यांच्याकडून मुलींना मारहाण करणे, अश्लील भाषेत शिवीगाळ करणे तसेच मानसिक छळाचे प्रकार झाल्याचे निदर्शनास आले आहे. ही बाब अत्यंत गंभीर असल्याचे नमूद करून संबंधित व्यवस्थापकास तात्काळ संस्थेतून काढून टाकण्याची शिफारस करण्यात आली आहे.

अन्यथा भविष्यात प्रवेशितांवर अत्याचार वाढण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचेही अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे.

याशिवाय मुलींच्या विभागाच्या अधीक्षिकेकडून होणाऱ्या प्रकारांकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाल्याचे समितीने नमूद केले आहे.

त्यामुळे विद्यमान अधीक्षिकेला पदावरून दूर करून एम.एस.डब्ल्यू. प्रशिक्षित नवीन अधीक्षिकेची नेमणूक करण्याची शिफारस करण्यात आली आहे.

### प्रशासनाची कडक भूमिका...

चौकशी समितीच्या अहवालावरून जिल्हा महिला व बाल विकास अधिकाऱ्यांनी संस्थेला नोटीस बजावून संबंधितांवर तातडीने कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. या घटनेमुळे नळदुर्ग परिसरात मोठी खळबळ उडाली असून, बालगृहाच्या कामकाजाबाबत सर्वत्र चर्चा सुरू आहे.